# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक






1


2


3


4

१. मंदिरपरिसराच्या विस्तारीकरणाच्या भूमिपूजनप्रसंगी भारताचे राष्ट्रपती श्री. शंकरदयाळ शर्मा, अवघ्या मानवजातीला श्री साईबाबांच्या शिकवणुकीची गरज असल्याचे प्रतिपादन करीत असून डावीकडून संस्थानच्या अध्यक्षा प्रा. डॉ. लेखा पाठक, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार, अर्थ, नियोजन, न्याय व विधी मंत्री श्री. रामराव आदिक

२. श्री साईबाबांच्या समाधीची श्रद्धापूर्वक पूजा करीत असताना राष्ट्रपती श्री. शंकरदयाळ शर्मा

३. राष्ट्रपतींचे ओजस्वी भाषण तन्मयतेने ऐकताना श्रोते

४. राष्ट्रपतींचे आदरयुक्त स्वागत करताना अर्थमंत्री श्री. रामराव आदिक व राष्ट्रपतींच्या मागे मुख्यमंत्री श्री. शरद पवार

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत नियतकालिक

वर्ष ७२ अंक ४-५

जुलै – ऑगस्ट ९३

संपादक
**प्रा. डॉ. लेखा पाठक**

कार्यकारी संपादक
**अरूण ताम्हणकर**

अक्षर जुळवणी व ऑफसेट छपाई
गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई.

**कार्यालय**
'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई–४०० ०१४.
दूरध्वनी: ४१२२५६१

वार्षिक वर्गणी – रु. ५०/-,
आजीव सभासद वर्गणी – रु. १,०००/-,
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी – रु. १,०००/-
(टपाल खर्चासहित)
किरकोळ अंक – रु. ८/-

मुद्रक, प्रकाशक प्रा. डॉ. लेखा पाठक, अध्यक्षा, श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.


या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांविषयीची कोणतीही कायदेशीर कारवाई मुंबईच्या न्यायकक्षेतच होऊ शकते, याची कृपया नोंद घ्यावी.

## मा. 'श्री साईलीला' सभासद....


सप्रेम नमस्कार....

आपण एक निस्सीम **साईभक्त** आहात.... **शिरडीत** आल्यावर आपली **साईभक्ती** बहरते तिथल्या **साईस्पर्शाने** भारलेल्या वातावरणाने.... आपण विसरून जाता आपली जात, आपला धर्म, आपला पंथ, आपला संप्रदाय.... तुटून पडतात सगळ्या श्रृंखला भेदाभेदाच्या दरी निर्माण करणाऱ्या.... आत्म्याचा आत्म्याशी संपर्क होतो.... आणि सगळे **'एक'** होऊन जातात.... कारण सगळ्यांचा **'मालिक'** एक असतो.... **'त्याच्या'**च चरणी लीन व्हायला सगळे एकत्र आलेले असतात.... **साईनामाची** तल्लीनता भक्तांना अपुऱ्या सोयी जाणवू देत नाही.... असं जरी असलं तरी त्या 'मालिक'ने आपल्या देहावतारापासूनच आपल्या भक्तांची काळजी वाहिलेली आहे.... **'त्याच्या'**च आशीर्वादाने भक्तांच्या सोयीसाठी 'साठे वाडा', 'दीक्षित वाडा', 'बुटी वाडा' यांची निर्मिती झाली.... **'त्याच्या'**च कृपेच्या बळावर आणि भक्तांच्या रचनात्मक सहकार्याच्या जोरावर विद्यमान विश्वस्त मंडळाने कार्यभार सांभाळताच भक्तांच्या निवासासाठी एक धाडसी योजना हाती घेतली.... या प्रकल्पाचा प्रारंभ झाला ४ मे, १९९० मध्ये **'साईबाबा भक्त निवास'**च्या भूमीपूजनाने.... त्या भूमीवर आज साकारली आहे एक भव्य 'इमारत'.... सोमवार, दिनांक १६ ऑगस्ट, १९९३ रोजी तिचा उद्‌घाटन समारंभ भारताचे माननीय पंतप्रधान श्री. नरसिंहजी राव यांच्या शुभहस्ते संपन्न झाली.... सर्व तऱ्हेच्या सुखसोयींनी सुसज्ज ही 'इमारत' आपल्या आगमनाची वाट पहाणार आहे **श्री साईबाबांच्या अमृतमहोत्सवी पुण्यतिथीपासून....** आपली यात्रा सुखदायी करण्यासाठी.... शिरडीत आल्यावर आपल्या निवासाची व्यवस्था करण्यात ही 'इमारत' आपल्याला नक्कीच लाभदायी ठरेल या आशेत....

**श्री साईबाबांच्या शुभाशीर्वादासह....**

आपली स्नेहांकित...

**प्रा. डॉ. लेखा पाठक**
अध्यक्षा,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी



# श्री साईंचे सत्य चरित्र

## —अध्याय २७ वा—

गद्य भाष्य टीका–
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

### दीक्षा–अनुग्रह–दानं

(शामाला विष्णुसहस्त्रनामाची दीक्षा देणे आणि खापर्डेंच्या पत्नीवर अनुग्रह करणे)

श्री गणेशाला नमस्कार असो. श्री सरस्वती देवीला नमस्कार असो. श्री गुरु महाराजांना नमस्कार असो. श्री कुलदेवतेला नमस्कार असो. श्री सीता व रामचंद्र यांना नमस्कार असो. श्री सद्‌गुरु साईनाथांना नमस्कार असो.

श्री सद्गुरूचे चरण घट्ट (दृढ) धरले असता ब्रह्मा, विष्णू व महेश ह्या त्रिमूर्तींना नमन केल्यासारखे होते, साक्षात् परब्रह्माला वंदन केल्यासारखे होते आणि स्वानंद (विषयसुखांपासून मन आवरून परमात्म्याचे ध्यान केल्याने होणारा आनंद) सहज मोठ्या प्रमाणात (घन) प्रगट होतो. एका सागरात बुडी मारली म्हणजे जसे सर्वप्रकारच्या आणि सर्वठिकाणच्या तीर्थक्षेत्रांची यात्रा केल्यासारखे होते, तसेच एका सद्गुरूच्या पायाशी विश्वासाने आश्रय घेऊन बसले (बैसता देऊनि दडी), तर त्याठिकाणी सर्व देव सापडतात (आतुडति). हे सद्‌गुरो साईनाथा ! तुझा जयजयकार असो. सायुज्य मुक्ती (चार प्रकारच्या मुक्तींपैकी एक. यात जीव ईश्वराशी एकरूप होतो.) प्राप्त करून देणाऱ्या कल्पवृक्षा ! तुझा जयजयकार असो. हे आत्मज्ञानाच्या सागरा (ठेवा किंवा सांठा) ! तुझा जयजयकार असो. तू श्रोत्यांच्या मनात तुझ्या कथांविषयी पूज्यभाव उत्पन्न कर ! आकाशातील ढगांतून पडणारे पाणी (मेघ+उदक) चातक पक्षी जितक्या आतुरतेने पितात, तितक्याच उत्सुकतेने तुझे सगळे भाविक भक्त या तुझ्या कथामृताचे सेवन करोत आणि सदा सुखी होवोत. तुझ्या पवित्र कथा ऐकून आप्त, इष्टमित्रांसह (स+परिवार) श्रोत्यांच्या शरीराला सर्वत्र (निखळ) घाम (स्वेद) फुटो, डोळ्यांत प्रेमाश्रूंचा पूर येवो (दाटों), प्राण अर्धवटच (पांगुळला) राहो, मनाला गहिंवर येवो (कंठ दाटून येवो), वरचेवर अंगावर रोमांच उठोत आणि वारंवार रडणे व हुंदके देणे (रूदन स्फुंदन वारंवार) घडोत. एकमेकांतील विरोध (प्रतिकुल भाव) आणि लहानमोठ्यांतील भेदभाव (सानथोर भेदाभेद) तुटून जाणे, म्हणजेच गुरूकृपेची जागृती (अवबोध) होय, हे मनाचा नीट शोध केला तर लक्षात येईल. सद्गुरूशिवाय हे देणारा (दाता) तिन्ही लोकांत शोधून मिळत नसतो. काम, क्रोध वगैरे सहा विकार शांत (उपशम) झाल्याशिवाय आणि गुरुचरणी भक्तिभाव, निःसीम प्रेम व श्रद्धा उत्पन्न झाल्याशिवाय अष्टभावांचा उगम होत नसतो. (वर ओवी ५-६ मध्ये बाबांच्या कथा ऐकून भक्तांच्या स्थितीचे केलेले वर्णन हेच अष्टभावाचे जवळजवळ वर्णन आहे.) भक्तांना आपल्यामुळे सुख लाभते म्हणून गुरूला फार हर्ष (हरिख) होत असतो. भक्त जसजसा परमार्थाकडे वळतो (उन्मुख), तसतसे गुरूला कौतुक वाटत असते. हा देह (शरीर) म्हणजे मी आहे आणि हे गेह (घरदार), पुत्र (मुलेमुली) व जाया (पत्नी) इत्यादी माझे आहेत (मी माझे), असे मानणे म्हणजे फुकटचा त्रास (व्याप वायां) अंगावर ओढून घेणे आहे. हीं तर दुपारच्या सावली (छाया) प्रमाणे क्षणभर टिकणारी माया (ममता) असते. या मायेच्या गुंतागुंतीची पीडा होऊ नये, असे मनाला वाटत असेल तर अनन्य भावाने साईबाबांना शरण जावे. मायेचा अंत लावण्यासाठी वेदशास्त्रांनी हात टेकले. जो सर्व सजीव व निर्जीव वस्तूंत ईश्वराला पाहील (भूतीं भगवंत), तोच या मायेला खात्रीने पार करू शकेल. (ओ. १-१३)

निजामशाही (पूर्वीचे निजामाचे हैद्राबाद संस्थान, ज्यात हल्लीच्या मराठवाड्यातील औरंगाबाद वगैरे जिल्हे सामील होते.) सोडून चांदभाई पाटील (औरंगाबाद जिल्ह्यातील

धूप खेड्याचे मुसलमान पाटील. पहा, अ. ५, ओ. २३) साई-फकिराला घेऊन आधी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे गावी आले. (गोदावरी नदीपासून दोन कोसावर प्रवरा नदीच्या काठी असलेल्या याठिकाणी ज्ञानदेवांनी आपली ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे दोन्ही ग्रंथ लिहून पूर्ण केले होते. तसेच येथे अर्धनारीनटेश्वर मोहिनीराजाचे, म्हणजे अर्धांगी लक्ष्मीसह श्री विष्णू भगवानांचे प्रसिद्ध देऊळ आहे.) तेथे सहा महिने किंवा एक वर्ष साई-फकिराचे राहणे झाले. तेथेच त्यांच्याबरोबर कानड गावचे (तालुका राहुरी) कमा सोबतीला राहिले होते. असो. पुढे प्रसिद्ध टाकळी (तालुका श्रीरामपूर) गावच्या दगडू तांबोळीला (खायची पाने विकणारा) घेऊन कमा व साईबाबांसह ही मंडळी तेथून शिरडीला आली. (मागे अध्याय ५च्या ओ. २१-२३ मध्ये हेमाडपंतांनी म्हटले आहे की साईबाबा चांद पाटलाच्या कुटुंबाच्या भाच्याच्या लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर शिरडीला आले व तेथेच राहून गेले. परंतु आता येथे हेमाडपंत म्हणतात की निजामशाहीकडून, म्हणजे औरंगाबाद वगैरेंकडून चांदभाई पाटील साईबाबांना बरोबर घेऊन प्रथम नेवाश्याला आले. तेथे त्यांचे वर्ष-सहा महिने कानड गावच्या कमाच्या सहवासात राहणे झाले. पुढे टाकळीच्या दगडू तांबोळीला बरोबर घेऊन कमा व साईबाबांबरोबर ही मंडळी शिरडीला आली. त्या काळी औरंगाबादेकडून शिरडीला पायी किंवा बैलगाडीने येण्याचा हाच मार्ग असेलही. परंतु लग्नाच्या वऱ्हाडाला प्रवासात वर्ष-सहा महिने लागणे शक्य नाही. तेव्हा साईबाबा शिरडीला चांदभाईमुळे आले हे खरे; परंतु ते लग्नाच्या वऱ्हाडाबरोबर न येता असेही आले असावे, असे काहींचे असलेले मत हेमाडपंत येथे सांगताना दिसतात. ते काहीही व कसेही असो. साईबाबा शिरडीला आले आणि शिरडीकरांचेच नव्हे, तर आपल्या सर्वांचेच भाग्य उदयाला आले, हे मात्र खरे.) ठिकठिकाणी पवित्र तीर्थांची स्थळे पुष्कळ, अगणित (अपरिमित) आहेत, परंतु साईबाबांच्या भक्तांना शिरडी हेच अत्यंत पवित्र क्षेत्र वाटते. जर सुदैवाने हा (साईबाबांचा शिरडीला येण्याचा) योग जुळून आला नसता तर हे महान भाग्य आमच्या वाट्याला कोठून आले असते! आम्हा पामरांना हा साईंचा सहवास (संयोग) कसा लाभला असता! जे जे भक्त आपले कार्य साधून घेण्यासाठी (हितार्थ) साईबाबांना शरण येतात त्यांना साईबाबा त्यांच्या कल्याणासाठी (हितार्थ) योग्य (यथार्थ) मार्ग दाखवितात. तरी श्रोत्यांनी एकाग्र मन करून श्री साईसच्चरिताचे पारायण (आवर्तन) करावे. हे साईंचे पापनाशक (पावन) चरित्र गुरूकृपा प्राप्त करून घेण्याचे उत्तम साधन आहे. (ओ. १४-२०)

मागील अध्यायात एकाला आपल्या गुरूच्या चरणी परत बसविल्याचे, एकाला अक्कलकोट स्वामींची खूण देऊन जागे केल्याचे आणि एकाची अकल्पित युक्ती योजून आत्महत्या चुकविल्याचे व त्यावर ओढवलेला मृत्यू टाळून त्याला जीवदान दिल्याचे वर्णन करणे (निरूपण) झाले. आता या अध्यायात कधीकधी प्रसन्न होऊन साईबाबा आपल्या भक्ताला कृपेची देणगी (अनुग्रह+दान) देऊन कसे सुखी करीत असत, हे सांगितले जाईल. तो दीक्षा देण्याचा अपूर्व (अद्भुत) प्रकार हसत-खेळत विनोदपूर्ण कोणासाठी कसा योजला होता, ते श्रोत्यांनी सावधान चित्ताने ऐकावे. उपदेश करण्याच्या बाबांच्या अनेक रीती याच ग्रंथात पूर्वी वर्णन केल्या आहेत. (पहा, अ. १९, ओ. २२१-२३४) जशी ज्याची ग्रहण करण्याची स्थिती (अधिकार) असेल, तशा मार्गाचा बाबा त्याला उपदेश करीत असत. रोगाच्या स्वरूपाची (निदान) माहिती वैद्याला असते व त्यालाच मात्रेचा (वैद्यकशास्त्राप्रमाणे तयार केलेल्या औषधाचा) गुण (योग्य परिणाम) ठाऊक असतो. रोग्याला त्याची कल्पना नसते. तो आधी गूळ आणा म्हणतो. गूळ गोड खरा, परंतु अपाय करणारा असतो. रोगी त्यासाठीच हट्ट धरतो व गूळ हातावर ठेवल्याशिवाय औषधाची वाटी हातात धरत नाही. रोग्यावर बळजबरी (रूग्णावर सक्ती) चालत नसते, म्हणून वैद्य युक्ती करतात. आधी ते गूळ देतात व मग औषध देतात आणि आपला कार्यभाग साधून घेतात. मात्र औषधाबरोबर किंवा मागाहून घेण्याच्या पदार्थात (अनुपात) बदल करतात की ज्यामुळे गुळाचे दोष नाहीसे होऊन (हरपती) योजलेले औषध कार्यक्षम (उपयोगी) होते. बाबांचीसुद्धा अशीच रीत होती; परंतु बाबांचा हा नियम सर्वांसाठी आणि सर्ववेळी नव्हता. (याबद्दल आणखी एक मनोरम उपमा मागील अ. १९ मध्ये येऊन गेली, ती पहा, "**बाळ मागतां गोडधडू। माता पाजी बोळकडू। बाळ तंडफडू वा रडू। प्रेमनिवाडू हा ऐसा ॥६१॥ बोळाचा तो कडूपणा। योग्य काळें चढणार गुणा। बाळ काय जाणे त्या लक्षणा। मातेच्या खुणा मातेस ॥६२॥**") जसा ज्याचा अधिकार किंवा स्वभाव (मनोधर्म) असेल, जशी ज्याची सेवा व जसे भक्तियुक्त प्रेम असेल त्यानुसार त्यावर त्यांचे अनुग्रह (कृपापूर्वक उपदेश) करणे असे. याबाबतीत बाबांच्या कृती खरोखरच विलक्षण व आश्चर्यकारक असत. ते कोणावर जेव्हा प्रसन्न होत असत तेव्हा त्याला कृपापूर्वक उपदेश (अनुग्रह) कसा व कोणत्या परिस्थितीत करीत असत, ते ऐका! (ओ. २१-३१)

एकदा जर का त्यांच्या मनात आले, तर कोणाच्या ध्यानीमनी नसता सहज थट्टाविनोद करून भक्ताला ते कृतार्थ करीत असत. भक्तांना एखादा ग्रंथ वाचण्याची इच्छा झाली, तर तो ग्रंथ बाबांच्या हाती देऊन प्रसाद म्हणून तो परत घ्यावा, असे सहज त्या भक्तांच्या मनात येत असे. पुढे त्या ग्रंथाचे वाचन केले, तर आपले हित साधले जाईल (श्रेय संपादन होईल) आणि त्याचे मनाच्या पवित्रपणे (प्रसादपूर्ण) श्रवण केले, तर श्रोता व वक्ता ह्या दोघांचेही परम कल्याण होईल (अशी त्या भक्तांची श्रद्धा असे). कोणी दशावताराची चित्रे किंवा स्तोत्रे (हल्ली ती फारशी प्रचलित नाहीत व पाहण्यातही येत नाहीत. "**आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म। भक्त-संकटी नानारूपी स्थापिसी स्वधर्म ॥**" या ध्रुपदाची

दशावताराची आरती मात्र कधीकधी ऐकण्यात येते. हे श्री विष्णूचे दहा अवतार, म्हणजे मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध व अजून होणारा कल्की), तर कोणी पंचरत्नी गीतेसारखी (हे छोटेसे पुस्तक म्हणजे महाभारतातील पुढील पाच रत्ने समाविष्ट केलेले पुस्तक:
(१) श्रीमद्‌भगवद्गीता
(२) श्रीविष्णुसहस्त्रनामस्तोत्र
(३) भीष्मस्तवराज, म्हणजे शांतिपर्वातील अ. ४७ मध्ये भीष्माने केलेली श्रीकृष्णाची स्तुती (४) अनुस्मृति, म्हणजे शांतिपर्व, अ. २०९, श्लो. ३६ नंतर 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राच्या जपाचे महत्त्व आणि नारद देवर्षींनी केलेली विष्णू भगवानाची स्तुती आणि (५) गजेन्द्रमोक्ष, म्हणजे शांतिपर्वातील एका गजेन्द्राला, म्हणजे मोठ्या हत्तीला सरोवरातील एका मोठ्या मगराने पकडले असता त्याचा धावा ऐकून विष्णू भगवानांनी गरूडावर धावत येऊन केलेल्या सुटकेचे वर्णन) पवित्र पुस्तके आणि चरित्रे अर्पण करीत असत. कोणी दासगणूंनी (कै. गणेश दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे) रचलेले संतलीलामृत व भक्तलीलामृतदेखील (पहा, अ. २, ओ. २४ वरील टीका) अर्पण करीत असत, तर कोणी विवेकसिंधु (हा ग्रंथ आद्यकवी मुकुंदराज यांनी इ.स. ११८८ साली, म्हणजे ज्ञानेश्वरीच्या १०२ वर्षेआधी 'मऱ्हाठी' भाषेत लिहिला असून याचा मुख्य विषय अद्वैतवाद आहे **''उपनिषदांचे निमंथन। करोनि ग्रंथ केला निर्माण॥''**) अर्पण करीत असत. परंतु बाबा ते शामाला देत असत व म्हणत, ''शामा, ही पुस्तके तुझ्याजवळ असू देत (तुजला व्हावीं). घरी बांधून ठेव!'' शामा ती आज्ञा शिरसावंद्य करून ती पुस्तके दप्तर बांधून संभाळून ठेवीत असे. बाबांच्या हाती देऊन प्रसाद म्हणून ते परत घ्यावेत, असे मनात आणून भक्त दुकानातून ग्रंथ विकत आणीत असत. बाबांचा स्वभाव जरी उदार होता तरी असले करावयाला धैर्य लागे. म्हणून भक्त माधवरावांना (शामाला) बरोबर नेऊन त्यांना पुढे करीत असत. त्यांच्याकडून संधी पाहून ग्रंथ बाबांच्या हाती देत असत. बाबांना जसे ग्रंथाचे महत्त्व ठाऊक असे तशी भक्ताची (ग्रंथ समजण्याची) योग्यताही ठाऊक असे. भक्तांनी ग्रंथ हातात द्यावेत, बाबांनी ते वरचेवर चाळावेत (पाने उलटून पाहावीत) आणि भक्तांनी ते आपल्याला परत मिळावेत म्हणून हात पुढे धरावेत. परंतु बाबा ते त्यांना न देता माधवरावांकडे देऊन म्हणत, ''शामा, या पुस्तकांच्या प्रती तुझ्याजवळ ठेव! सध्या त्या तुझ्याकडे असू देत.'' शामाने स्पष्ट विचारावे, ''हे भक्त, जे उत्कंठेने (आतुरते) हात पसरत आहेत, त्यांच्या प्रती त्यांना देऊ का?'' तर बाबा ''तूच त्या ठेव!'' असे म्हणत असत. (ओ. ३२-४३)

एकदा भक्त काका महाजनी (कै. लक्ष्मण गणेश महाजनी– पहा, अ. १२, ओ. ३४ वरील टीका), ज्यांना एकनाथी भागवत वाचण्याची फार आवड होती, ते त्याची एक प्रत घेऊन शिरडीत येऊन पोहोचले (पातले). माधवराव त्यांना भेटायला आले असता त्यांनी वाचू म्हणून ते पुस्तक उचलले आणि हातात घेऊन मशिदीत गेले. बाबांनी त्यांना सहज विचारले, ''शामा, हे पुस्तक कसले?'' त्यावर शामाने ते कोणते ते सांगितले. बाबांनी ते हातात घेतले आणि पाहून ते त्यांना परत केले. हेच पुस्तक व हीच एकनाथी भागवताची प्रत महाजनींना पूर्वीच श्री साईबाबांच्या हाताने प्रसाद म्हणून मिळालेली होती. ''हा ग्रंथ माझ्या मालकीचा नव्हे. तो काका महाजनींचा आहे. वाचायची इच्छा झाली म्हणून तात्पुरता वाचायला मी आणला आहे,'' असे स्पष्ट शब्दांत माधवरावांनी बाबांना सांगितले होते, तरी बाबा त्यांना म्हणाले, ''ज्याअर्थी मी तुला हा दिला, त्याअर्थी तूच दप्तरात आपल्या संग्रही ठेव! कामाला येईल.'' असो. काही काळानंतर काका महाजनी पुन्हा शिरडीला आले व बरोबर एकनाथी भागवत आणून साईंच्या हातात ठेवले (ओविले). बाबांनी प्रसाद म्हणून ते परत दिले, ''नीट जीव लाव (प्रेमाने वाच)!'' असे सांगितले आणि ''हेच खरोखर आपल्या उपयोगी (जिवाभावाला) पडेल,'' असे आश्वासन दिले, ''हेच आपल्या कामाला येईल. हे चांगले (वहिले) पुस्तक कोणाला देऊ नकोस,'' असे मोठ्या कळकळीने सांगितले. त्यावर मग काकांनी बाबांना मोठ्या प्रेमाने नमस्कार केला (वंदिले काकांनी). (ओ. ४४-५२)

साईबाबा स्वत: सर्व इच्छित प्राप्त झालेले (अवाप्त+काम) होते. कोणत्याही वस्तूंचा त्यांना लोभ नव्हता. ईश्वराची भक्ती करणे, हीच त्यांची नैसर्गिक प्रवृत्ती होती. मग त्यांनी कोणतीही गोष्ट गोळा करण्याचे किंवा साठविण्याचे श्रम कशाला बरे करावेत (संग्रह+श्रम किमर्थ)? बाबांच्या मनात काय होते कोणास ठाऊक? परंतु ह्या ग्रंथांचे एकत्र येणे (संमेलन), हे व्यवहाराच्या दृष्टीने भक्तांकरिता पापनाशक (पावन) ग्रंथ श्रवण करण्याचे साधन आहे. ''आता शिरडी एक क्षेत्र (पवित्र यात्रेचे स्थान) झालेले आहे. देशोदेशीचे आपले शिष्य (छात्र) वेळोवेळी येथे जमतील आणि ज्ञानसत्र (अध्यात्माचा अभ्यास करण्यासाठी बरेच दिवस चालणारे अधिवेशन) चालवितील, तेव्हा हे ग्रंथ उपयोगाला येतील. आपण स्वत: निजधामाला जाऊ (अवतारी पुरूषांच्या निर्याणाला निजधामी, म्हणजे आपल्या निश्चित कायम जागी परत जाणे म्हणतात. उदाहरणार्थ: श्रीकृष्णाचे वैकुंठी परत जाणे), परंतु शामा आपल्या दप्तरातून हे ग्रंथ त्यांना दाखवेल आणि मग ते जणूकाय माझ्या प्रतिमाच होतील (मी देहधारी असताना जसा मी भक्तांना ज्ञान देत असे, तसे हे ग्रंथ देतील).'' अशा या अत्यंत पापनाशक पवित्र ग्रंथांचे भक्तांना, मग ते कोठेही, शिरडीत वा इतर ठिकाणी असोत, स्मरण व्हावे, हा कदाचित ह्या ग्रंथांचा संग्रह करण्यात बाबांचा उद्देश असेल. रामायण असो की भागवत असो किंवा परमार्थाचा कोणताही ग्रंथ असो, त्यातील रामाचे किंवा कृष्णाचे किंवा इतर कोणत्याही देवाचे चरित्र वाचत असताना मागेपुढे साईबाबाच दिसतात. ह्या ग्रंथांच्या ज्या ज्या विभूती (महापुरूष) आहेत, त्यांचे साईबाबांनी स्वत:च रूप धारण केले आहे (साईच

नटला ते ते स्थिति), असे वाटते. श्रोत्यांना आणि वक्त्यांना डोळ्यांसमोर त्या महापुरुषांऐवजी साईबाबांचीच मूर्ती समोर दिसते. भक्त जे ग्रंथ गुरूला अर्पण करतात किंवा ब्राह्मणाला दान करतात, त्यातही दात्याचे (दान करणाऱ्याचे) कल्याणच असते. याला शास्त्राचा आधार आहे. (पहा, एकनाथी भागवत, अ. ३१, ओ. ४७७) बाबांची शामाला आज्ञा (नियोजन) झाली की हे ग्रंथ घरी नेऊन दप्तरात संभाळून ठेव! हा काय साधासुधा उद्देश (प्रयोजन) म्हणावयाचा! (ओ. ५३-६१)

शामा (माधवराव देशपांडे) जसा बाबांचा नि:सीम भक्त होता, तसेच बाबांचेही त्याच्यावर अनिवार प्रेम होते. त्याला काहीतरी परमार्थाचा नेम (नियम) लावून द्यावा, अशी बाबांच्या मनात इच्छा उत्पन्न झाली. तेव्हा त्यांनी काय केले पहा! शामाची इच्छा नव्हती तरी त्यावर कसा आणि कोणत्या तऱ्हेने अनुग्रह केला, तो ऐका! एके दिवशी एक रामदासी बुवा (श्री समर्थ रामदास स्वामी यांनी स्थापिलेल्या संप्रदायातील साधू) मशिदीत आलेला होता. त्याचा रामायण वाचण्याचा रोजचा नेम होता. प्रात:काळी शौच-मुखमार्जन करून, भस्म वगैरे चोपडून (चर्चन), स्नानसंध्या आटोपून, भगवे वस्त्र नेसून तो विधीपूर्वक आपल्या नेमकार्याला बसत असे (अनुष्ठान मांडावे). आधी विष्णुसहस्त्रनामाचे पठण (आवर्तन) (पहा, अ. २४, ओ. ८० वरील टीका) आणि मग अध्यात्म रामायणाचे (पहा, अ. १९, ओ. २२२ वरील टीका) पारायणावर पारायण श्रद्धापूर्वक त्याचे चालत असे. असा बराच काळ लोटल्यावर माधवरावांची वेळ येता साईसमर्थांच्या मनात काय गोष्ट आली, ती आता श्रोत्यांनी ऐकावी. माधवरावांची सेवा फळाला आली; त्यांच्या आयुष्याला (जीवाला) काही नियम लावावा, भक्तिमार्गाचा त्यांना उपदेशरूपी प्रसाद मिळावा आणि संसारात त्यांना स्वास्थ्य (विसावा) लाभावे, असे बाबांच्या मनात आले. (माधवरावांच्या सेवेचे काय वर्णन करावे! आपल्या वयाच्या १८ व्या वर्षापासून ते बाबांच्या संगतीत आले, ते त्यांच्या थेट समाधीपर्यंत, म्हणजे सुमारे ४२-४३ वर्षे बाबांची ते सेवा करीत राहिले. धिप्पाड व उंच शरीराचा हा शाळामास्तर जणूकाय बाबांच्या अगदी निकटचा सोबतीच होता. बाबा त्याला लडिवाळपणे 'शामा' म्हणून हाक मारीत आणि शामाही त्यांना अरे-तुरे म्हणून प्रेमाने 'देवा' म्हणून संबोधित असत. बरोबर चिलीम पिणे तर सारखेच चालत असे. बाबांचा इतका जवळपणा कोणाच्याच नशिबात नव्हता. कै. दादासाहेब खापर्डे यांनी आपल्या डायरीत (रोजनिशीत) आपला अनुभव सांगताना म्हटले आहे की माधवराव गाढ झोपले असले तरी त्यांच्या श्वासोच्छ्वासांतून ''साईनाथ महाराज, साईनाथ बाबा'' असा स्पष्ट आवाज सारखा ऐकावयास येत असे. अशा सेवेचे, प्रेमाचे आणि भक्तीचे बाबांनी चीज केले असले तर त्यात काय नवल! प्रापंचिकदृष्ट्या आनंदराव पाखाड्याकडून रेशीमकांठी धोतर देवविले (अ. ४५), ग्वाल्हेर, काशी, प्रयाग, अयोध्या व गया येथील फुकट आणि मोठ्या सुखाने यात्रा घडवून दिली (अ. ४६), भावजयीचा ग्रंथिज्वर एका रात्रीत पळविला (अ. ३४), तीन वर्षे विसर पडलेला सप्तशृंगी देवीचा नवस फेडविला (अ. ३०), एवढेच नव्हे, तर सर्पदंश झाला असता ते विष उतरवून मृत्यूच्या दाढेतून वाचविले (अ. २३) आणि स्वत:च्या निर्वाणानंतरही ग्वाल्हेरसारख्या राजेरजवाड्यांकडून आदरसत्कार व मानसन्मान देववून आणि ८० वर्षांचे (इ.स. १९४० पर्यंत) दीर्घ आयुष्य प्राप्त करवून भरपूर सुखी केले. अर्थात, आध्यात्मिक उन्नती करून देण्यास बाबा कसे विसरतील! म्हणूनच शामा नको नको म्हणत असता विष्णुसहस्त्रनामाचा पाठ देण्याचा बाबांचा हा खटाटोप होता. भक्तांची किती काळजी बाबांना! **''सेवा कधी जाई न व्यर्थ। अंती तो कृतार्थ करील ॥१५॥''** असे जे हेमाडपंतांनी अ. ४५ मध्ये म्हटले आहे, ते खोटे नव्हे.) (ओ. ६२-६८)

बाबा त्या रामदाश्याला जवळ बोलावून म्हणाले, ''माझ्या पोटात कळ उठली आहे. जणूकाय आतडी तुटून पडत आहे. पोटाचे दुखणे काही थांबत नाही. लवकर बाजारात जाऊन सोनामुखी (भुईतरवडीचा पाला. हे रेचक म्हणजे जुलाबाचे औषध असते.) घेऊन ये! त्याची थोडीशी फकी (कोरड्या पदार्थाचा तोंडात भरण्याचा लहान घांस) मारल्याशिवाय पोटातील रूखरूख (पोटात बारीक चावल्यासारखे वाटणे किंवा गुरगुरणे) जावयाची नाही.'' रामदास बिचारा भोळाभाबडा, आज्ञेप्रमाणे वागणारा (आज्ञा+वर्ती), त्याने पोथीत खूण घालून ती खाली ठेवली आणि बाजारात धावत गेला. रामदासी बुवा मशिदीखाली उतरले आणि इकडे बाबांनी काय केले? तात्काळ ते आसनावरून (बसण्याच्या जागेवरून) उठले आणि पोथीच्या जवळ गेले. तेथे इतर पोथ्यांजवळ विष्णुसहस्त्रनामाची पोथी होती. ती हातात उचलून घेतली आणि आपण परत आपल्या जागी (स्व+स्थाना) आले. नंतर ते माधवरावांना म्हणाले, ''शामा! ही पोथी की नाही (कर्नी) पहा, फार कल्याणकारी (बहु+गुणी) आहे. म्हणून मी ती तुझ्याकरिता देतो. ती तू वाचून पाहावी. एकदा मला त्रास झाला होता (उपजली नड), काळीज धडधड करू लागले होते, जीवाची चरफड झाली होती (जीव बेचैन झाला होता) आणि माझी मला धडगत (आशा वाटण्यासारखी स्थिती) दिसत नव्हती. अशा त्या प्रसंगाला काय सांगू शामा मी तुला! या विष्णुसहस्त्रनामाच्या पोथीचा उपयोग झाला आणि हा जीव तिच्यामुळे वाचला (तरला तिचेनी). एक क्षण ती पोथी मी छातीला लावली (उरीं विसावा दिला) आणि तात्काळ हा जीव शांत (थार) झाला. वाटले, अल्लाच (परमेश्वर) छातीत (पोटात) उतरला आणि हा जीव त्यामुळे जगला (जिवंत राहिलो). म्हणून म्हणतो शामा, ही पोथी तुझ्यासाठी घेऊन जा! हळूहळू (ओजें ओजें) वाचीत जा! रोज एखादे अक्षर तरी ध्यानात नीट ठेवत जा! ही पोथी मोठी आनंद देणारी आहे.'' शामा म्हणाला, ''ही पोथी मला नको. रामदास माझ्यावर रागावेल आणि त्याच्या मागे हे खोटे (वावगे) कर्म मीच

केले म्हणेल. आधीच तो जातीचा वेडपट (पिसाट) आहे आणि माथेफिरू, तापट व खाष्ट (नेहमी कुरकुर करणारा) माणूस आहे. हे फुकटचे भांडणाचे कारण (कळ) कशाला हवे! ही कटकट मला नको. शिवाय या पोथीची लेखन-पद्धती (लिपी) संस्कृत आणि माझी भाषा तर ओंगळ व अडाणी (वाणी रांगडी कुश्चित) आहे. जीभेतून जोडाक्षरसुद्धा नीट बाहेर पडत नाही (न जिव्हेस उलटत) आणि त्याचा उच्चारदेखील मला स्पष्ट करता येत नाही.'' बाबांचे हे सगळे कृत्य पाहून शामाला वाटले की बाबा (त्याच्यात आणि रामदाश्यात) भांडण लावून देत आहेत. त्याला कल्पना (अटकळ) नव्हती की बाबांना त्याची केवढी मनापासून काळजी (कळकळ) होती! ''माझा शामा असेल खुळा (वेडा), परंतु त्याचा मला फार लळा आहे. तो माझ्यावर आगळेच प्रेम करतो (लोभ लावी जीवा) व त्याच्याप्रती मला दयेचा मोठा उमाळा (कळवळा) आहे. ही विष्णुसहस्त्रनामाची माळा त्याच्या गळ्यात माझ्या स्वत:च्या हाताने मी बांधीन आणि त्याच्या जिभेला नामाचा चाळा (छंद) लावून त्याला संसारातील दु:खांपासून मुक्त करीन.'' (ओ. ६९-८४)

''देवाचे किंवा गुरूचे नाम पापांचे पर्वत फोडते. नाम देहाची आसक्ती (बंधन) तोडते. नाम करोडो (कोटी) वाईट वासना मूळासकट दूर लोटून नाहीशा करते. नाम काळाची (मृत्यूची) मान मोडते (ताकद नाहीशी करते) आणि जन्ममरणाचा हिसका (ओढी) चुकविते. असा हा सहस्त्र (एक हजार) नामाचा ठेवा (जोडी) आहे. त्याची शामाला गोडी लागावी, असे मला वाटते. नाम प्रयत्नपूर्वक मुद्दाम घेतले तर उत्तमच (चोखट), परंतु सहज नकळत घेतले तरी ते वाईट (ओखट) नसते. मनात नसता (अवचट) जीभेवर आले तरी ते आपला प्रभाव प्रगट करील. (उदाहरणार्थ: महापापी अजामिळाने मृत्यूसमयी आपल्या 'नारायण' नावाच्या मुलाचे नाव घेतले तेव्हा त्याचा उद्धार झाला. तसेच वाल्या कोळी 'राम' नाम उलटे, म्हणजे 'मरा मरा' असे म्हणाला तेव्हा वाल्याचा वाल्मिकी ऋषी झाला.) अंत:करणाच्या शुद्धीसाठी नामासारखे सोपे साधन नाही. (तुकोबा म्हणतात, ''यावीण आणीक नाही पैं साधन। वाहातसें आण विठोबाची॥'') नाम जीभेचे भूषण आहे. नाम परमार्थ मार्गाला पोषक (बळकट देणारे) आहे. नाम घेण्यासाठी स्नान करावे लागत नाही. नामाला विधिविधान (शास्त्रांचे नियम पाळणे) नको. (''**बोलता चालता धंदा करिता। खाता जेविता सुखी होता। नाना उपभोग भोगिता। नाम विसरों नयें॥**'' दासबोध, दशक ४, समास ३, ओ. ७) नामाने सगळ्या पापांचा नाश होतो. नाम सदा पवित्र (पावन) असते. (**नाम स्मरे निरंतर। तें जाणावें पुण्यशरीर। महादोषांचे गिरिवर। शमनामे नासती॥२२॥** दासबोध, दशक ४, समास ३) अखंड माझेही (साईचेही) नाम घेता संपूर्णपणे बेडा पार होईल (कार्य सिद्धीस जाईल). इतर कोणत्याही साधनाची जरूरी नाही. केवळ नामस्मरणानेच मोक्ष हाती येईल. ज्याला माझ्या नामाची घोकणी (आवृत्ती, म्हणजे पुन्हापुन्हा म्हणणे) त्याच्या पापाची धुणी (धुऊन जाणे) झालीच म्हणून समजा. जो भक्त माझे नाम सतत व हळूहळू मनात जपत असतो (जया गुणगुणी मत्+नामी), तो मला उत्तम गुणसंपन्नी माणसापेक्षाही अत्यंत गुणी माणूस वाटतो.'' (पहा, मागील अध्याय ३: ''**परी एक सांगतो शामा। प्रेमे घेईल जो मन्नामा। तयाच्या मी सकळ कामा। पुरवी प्रेमा वाढवी॥११॥**'' ''**साई साईति'' नामस्मरण। करील सकल कलिमलदहन॥२०॥**'') हेच बाबांचे मनोगत होते व त्याप्रमाणे मग त्यांचे वागणे होते. (ओ. ८५-९१)

शामा नको नको म्हणत होता तरी बाबांनी ते विष्णुसहस्त्रनाम त्याच्या खिशात टाकलेच. वाडवडिलांची पुण्याई मोठी (सबळ) होती म्हणूनच साईकृपेचे हे फळ शामाला मिळाले. हे पवित्र सहस्त्रनाम शामाच्या प्रपंचातील अस्वस्थता (तळमळ) आता दूर करील. इतर कर्माला विधिविधान (शास्त्रांचे नियम पाळणे) लागते; परंतु नाम कधीही सतत घ्यावे. (**बाळपणीं तारूण्य काळीं। कठिण काळीं वृद्धापकाळीं। सर्वकाळी अंत:काळीं। नामस्मरण असावे॥** दासबोध, दशक ४, समास ३, ओ. १४) नामाला अनध्याय किंवा प्रदोष (सुट्टी: चतुर्थी, सप्तमी व त्रयोदशी, म्हणजे प्रदोषी शिक्षण किंवा वेदपठण केले जात नाही.) याचा अडथळा नसतो (न बाधी). नामासारखी आणखी दुसरी उपासना नाही. (भगवंतांनी स्वत:च एकनाथी भागवतात म्हटले आहे, ''**साधनीं माझी मुख्य भक्ती। त्यांत विशेष नामकीर्ति॥**'') याचप्रमाणे एकनाथ महाराजांनीही आपल्या एका शेजाऱ्याच्या माथी हेच विष्णुसहस्त्रनाम मारले (बळजबरीने दिले) होते आणि त्याला परमार्थाच्या मार्गाकडे वळविले (सूदिले) होते. एकनाथांच्या घरी नित्य पुराणांचे कीर्तन चाले. हा शेजारी जातीचा ब्राह्मण असून स्नानसंध्या न करता, वाईट अनीतीचे वर्तन करण्यात दंग असे (दुराचरण+निमग्न). पुराण कधीही ऐकत नसे आणि तो वाईट माणूस (दुर्जन) नाथांच्या वाड्यात कधीही पाय ठेवत नसे. नाथांना त्याची दया आली आणि त्याला त्यांनी बोलावून घेतले. उच्च ब्राह्मण जातीत जन्म असून तो वाया जात आहे, याचे रहस्य (वर्म) जाणून नाथांना त्याची मोठी दया (परमकृपा) आली, की त्याचे हे दुर्वर्तन कसे थांबेल (उपरम पावेल)? म्हणून तो नको म्हणत होता तरी नाथांनी त्याला सहस्त्रनामाची संथा दिली (उच्चारासह पढविले) आणि एकेक श्लोक पढविता पढविता त्याचा उद्धार झाला. (पहा, केशवस्वामीकृत श्री एकनाथ महाराजांचे चरित्र, अ. ५७, ओ. १४ ते ७१). हे विष्णुसहस्त्रनाम वाचणे किंवा तोंडपाठ म्हणणे, हा चित्तशुद्धीचा सोपा सरळ (धोपट) मार्ग आहे. पूर्वीपासूनची ही लोकमान्य रूढी (परंपरा+गत परि+पाठ) आहे. (पहा, मागील अ. २४, ओ. ८० वरील टीका. विष्णुसहस्त्रनाम महाभारतातील शांतिपर्वात आहे. महाभारताचा काळ ३५८० वर्षांपूर्वीचा आहे, हें सिद्ध आहे. इ.स. पूर्वी ६०० वर्षे, म्हणजे

२५८० वर्षांपूर्वी 'चरक' नामक वैद्यक ग्रंथातही **''स्तुवन्नामसहस्त्रेण ज्वरान्सर्वानपोहति''** असे ज्वरप्रकरणात सांगितलेले आहे. ११८० वर्षांपूर्वी आदिशंकराचार्यांनीही आपल्या प्रसिद्ध 'भज गोविन्दं' या स्तोत्रात श्रीमद्‌भगवद्गीतेप्रमाणे या विष्णुसहस्त्रनामाचा पाठ करण्याचा उपदेश केला आहे. **''गेयं गीता नामसहस्त्रं''**) म्हणूनच जणूकाय बाबांची ते शामाला देण्याची आटाट (धडपड) होती. (ओ. ९२-१००)

इतक्यात रामदासी बाजारातून सोनामुखीचे औषध (अगद) घेऊन लगेच घाईघाईने (जलद) परत आला. कळीचे नारद (भांडण लावून देणारे जणूकाय नारदमुनीच) अण्णा चिंचणीकर (कै. दामोदर घनश्याम बावरे: पहा, अ. २४, ओ. ९२ वरील टीका) तेथे उभेच होते. त्यांनी रामदाश्याला घडलेला सर्व वृत्तांत कळविला. आधीच रामदासी फार रागीट (आततताई) होता. त्यातून या नारदाची संभावितपणाची मध्यस्थी (शिष्टाई). मग त्या अजब प्रसंगाचे यथास्थित वर्णन कोणी करावे! आधीच रामदासी कुतर्काची प्रतिमा (विकल्प+मूर्ति), त्याच्या मनात माधवरावांबद्दल संशय आला व तो त्याला म्हणाला, ''माझी पोथी बळकाविण्यासाठी तूच बाबांना मध्यस्थी घातलेस.'' तो सोनामुखीची गोष्ट विसरला (बाबांसाठी ती बाजारातून आणली होती ना! त्यांना ती देण्याचेच विसरला) आणि माधवरावांवर घसरला. त्याच्या मनाचा संताप (वृत्ति+प्रकोप) अनावर झाला आणि तावातावाने तो खूप शब्द बोलला (उदंड वरसला वाक्+डंबर), ''बाबांच्या पोटदुखीचे हे सगळे ढोंग होते. तूच बाबांना हे करावयाला लावलेस (उद्युक्त केले). माझ्या पोथीवर तुझा डोळा होता. ही अशी चलाखी माझ्यापुढे चालायची नाही (लक्षात ठेव). मी नावाचा बहाद्दूर (निधडा) रामदास आहे. पोथी जर धड्या गुणांनी, म्हणजे चोख मनाने (गुणा+धडा) परत केली नाहीस, तर पहा, हे मस्तक फोडीन आणि तुझ्यापुढे रक्ताचा सडा घालीन (दाट वर्षाव करीन). तुझा माझ्या पोथीवर डोळा होता (ती तुला मिळावी, अशी तुझी इच्छा होती), म्हणून तू स्वत:च कारस्थान (कवटाळा) रचून ते सर्व बाबांच्या गळ्यात घातलेस (त्यांनीच केले, असे दाखविलेस) आणि स्वत: नामानिराळा राहिला आहेस (स्वत:चा काही संबंधच नाही, असे दाखवितोस).'' माधवरावांनी त्याला पुष्कळ समजाविले; परंतु रामदासी काही शांत होई ना. तेव्हा माधवराव त्याला मृदुभाषेने (सौम्य+वृत्ति) म्हणाले, ''मी कपटी आहे, असा आरोप उगीच (प्रवाद वृथा) माझ्यावर करू नकोस. तुझ्या पोथीची गोष्ट ती काय! ती वाटेल तितकी बाजारात मिळते (नाही दुर्मिळता तियेला). या तुझ्याच पोथीला काय सोने किंवा हिरे जडविलेत की तुला बाबांचासुद्धा विश्वास नाही! तुझ्या असल्या जगण्याचा धिक्कार असो.'' अशाप्रकारे त्या रामदासाचा हेका (अट्टाहास) पाहून बाबा त्याला गोड शब्दात म्हणाले, ''काय बिघडले रे रामदाश्या! उगाच का त्रास (सायास) करून घेतोस? अरे, शामा आपलाच पोरगा आहे. तू का उगीच शिरा ताणतोस (जोराने वाद घालतोस) आणि फुकटचा (वाउगा) इतका कष्टी होतोस आणि जगाला तमाशा दाखवितोस? असा कसा तू भांडखोर (कलह+तत्पर)? गोड मधुर शब्दाने उत्तर का देऊ नये? अरे, या पोथ्या सतत (निरु+अंतर) पढूनही तुझे मन (अंतर) अशुद्धच राहिले का? दररोज अध्यात्म रामायण वाचतोस, विष्णुसहस्त्रनामाचे पारायण (आवर्तन) करतोस, तरी हा अविचारी अनिर्बंध स्वभाव (उच्छृंखल वृत्ति) सोडत नाहीस आणि स्वत:ला रामदासी म्हणवितोस? असा कसा तू रामदासी? (समर्थ रामदास स्वामींनी स्थापिलेल्या संप्रदायातील माणूस. **''नको रे मना क्रोध हा खेदकारी॥६॥ नको रे मना वाद हा खेदकारी॥१६०॥ मना बोलणे नीच सोशीत जावें। स्वये सर्वदा नम्र वाचे वदावें। मना सर्व लोकांसि रे नीववावें॥७॥** समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक) तू तर सदा विरक्त (उदास) असावे. परंतु तुला तर पोथीचा लोभ (सोस) सुटत नाही. तुझ्या या वागण्याला काय म्हणावे? रामदाश्याला कसली ममता नसावी. लहान-मोठ्या सर्व माणसांशी एकसारखे वागणे (समता) असावे. पण तू तर या पोराशी भेदभाव (विषमता) धरतोस आणि त्याच्या हाताला पोथीसाठी झोंबतोस! जा, आपल्या जागेवर जाऊन स्वस्थ बैस! पोथ्या तर एक पैशाला पासरीभर (पाच शेर, म्हणजे भरपूर) मिळतील; पण हवे असलेले माणूस कल्पांतीपर्यंत शोधूनही मिळत नसते, हे लक्षात ठेव! तुझ्या पोथीचे किती महत्त्व आहे, हे शामाला (या अडाणी खेडवळ माणसाला) कुठले समजायला (कैंची गती)! मीच आपल्या मताने ती उचलली आणि त्याला दिली. तुला ती तोंडपाठ (मुख+उद्गत) आहे. माझ्या मनात आले की शामाला द्यावी, म्हणजे तो ती वाचील आणि त्याचे आवर्तन करील, म्हणजे त्याचे अत्यंत कल्याण होईल.'' बाबांच्या या बोलाची काय रसाळता (मोहकता), मधुरता (माधुर्य), कनवाळूता (दयेचा उमाळा) आणि आत्मानंदरूपी जलाची शीतलता (गारवा) होती! खरोखरच या बोलाची अपूर्वता (असाधारणता) फार मोठी होती. (ओ. १०१-१२०)

रामदासी मनात समजला (उमगला) व माधवरावांना रागाने तांबडा लाल होऊन (फणफणता) म्हणाला, ''या सहस्त्रनामाच्या पोथीच्या बदली पंचरत्नी गीता घेईन, तुला सांगून ठेवतो.'' (पहा, याच अध्यायातील ओ. ३५ वरील टीका. यात विष्णुसहस्त्रनामस्तोत्र तर आहेच, पण त्याशिवाय आणखी चार रत्नासारखी स्तोत्रे किंवा गीते आहेत. म्हणजे रामदाश्याने विष्णुसहस्त्रनामाऐवजी पंचरत्नी गीता बदली मागून पाचपट लाभ साधून घेतला.) रामदासी इतका शांत झाला (निवळला), हे पाहून माधवरावांना आनंद झाला व ते म्हणाले, ''एकच काय, मी तुला दहा पंचरत्नी गीता बदली देईन.'' असो. पुढे तो तंटा मिटला (निवला) व पंचरत्नी गीता ग्रंथ जामीन (खात्री पटविण्यासाठी

मध्यस्थी) राहिला. पंचरत्नी गीतेतील देवाला (साईबाबांना) ज्याने ओळखले नाही, त्याला पंचरत्नी गीता कशाला! (पंचरत्नी गीतेतील पाचही स्तोत्रांत किंवा गीतांत श्री विष्णू भगवानाची स्तुती, लीला किंवा उपदेश यांचे वर्णन आहे. म्हणून त्यातील देव श्री विष्णू आहे व तो विष्णू म्हणजेच श्री साईबाबा, अशी येथे भावना आहे.) साईबाबांसमोर जो अध्यात्म रामायणाचे पाठावर पाठ करीत असे, त्या रामदाश्याने साईबाबांच्या तोंडाला तोंड देऊन असे भांडण का बरे करावे? पण मी तरी असे कसे म्हणावे! दोष कोणाला कसा द्यावा? झाला हा प्रकार घडला नसता तर श्री विष्णुसहस्त्रनामाचे महत्त्व तरी कसे ठसले असते! ज्या विष्णुसहस्त्रनामाने इतके भांडण लावले (झगडा लावला), बाबांच्या छातीतील दुखणे (नड पीडा) घालविले, ज्याबद्दलची कथा ऐकून माझेही (हेमाडपंतांचे) कल्याण झाले (विष्णुसहस्त्रनामाचे पठण करण्याची बुद्धी झाली), ती साईबाबांची आपल्या भक्तांसाठी एक अलौकिक देणगी आहे. हा इतका त्रास बाबांनी घेतला नसता तर माधवरावांचा विश्वास बसला नसता. त्यांच्या जीभेवर त्या पोथीची अक्षरे चढलीच नसती आणि ती तोंडपाठही झाली नसती. असा हा प्रेमळ साईनाथ परमार्थाचा मिळण्यास कठीण (दुर्मिळ) खेळ खेळवितो. तो केव्हा कशी सूत्रे हालवील (कळ दाबील), ते आपल्याला कळणार नाही (करणी अकळ तयाची). असो. पुढे शामाची या पोथीवर निष्ठा जडली (विश्वास बसला) आणि काकासाहेब दीक्षित व प्रो. गणेश गोविंद नरके (कै. बापूसाहेब बूट्टी यांचे जावई व पुणे येथील इंजीनिअरिंग कॉलेजातील प्राध्यापक) यांनी उच्चारासह ती शिकविली (संथा दिधली). मग माधवरावांना ती वाचता आली (अक्षर-ओळख करून घेतली) आणि पुढे तोंडपाठ झाली (चढली जिव्हेवर). असो. हा माधवरावांचा तंटा (वाद) म्हणजे साईबाबांच्या निर्मळ उपदेशाचे दुसऱ्या शब्दात स्पष्टीकरण (शुद्ध+बोध+अनुवाद) होते. नव्हे, ही अत्यंत श्रेष्ठ, आनंद देणारी व नि:संशय सुखकारक करमणूक होती (विनोद होता). (ओ. १२१-१३०)

जे भक्त अध्यात्म विद्येचा (ब्रह्मविद्येचा) अभ्यास करतात, अशा भक्तांवर साईबाबांची विशेष प्रीति असे व वेळप्रसंगी ती ते कशी उघड करून (अभि+व्यक्ति) दाखवीत असत, ते पहा (अवलोका)! एकदा बापूसाहेब जोगांचे (पहा, अ. १९, ओ. ८२ वरील टीका) शिरडी पोस्टात टपाल मार्गाने एक पार्सल (बंगी) आले म्हणून ते सोडविण्यासाठी लगबगीने ते तिकडे निघाले. कसले म्हणून पाहिले, तर ते लोकमान्य टिळकांचे **'गीतारहस्य'** नावाचे पुस्तक असल्याचे कळले. (**''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे''** या वचनाचे स्फूर्तिस्थान देशभक्त लोकमान्य कै. बाळ गंगाधर टिळक यांचे नाव कोणाला माहीत नाही! त्यांनी हे **'श्रीमद्‌भगवत् गीतारहस्य'** अथवा **'कर्मयोगशास्त्र'** मंडाला (ब्रह्मदेश) येथील कारागृहवासात लिहिले. तेथून त्यांची १९१४ साली सुटका झाली; परंतु या पुस्तकाच्या हस्तलिखित वह्या इंग्रज सरकाराकडे जप्त असल्याने त्या पुढे मिळाल्यावर हे पुस्तक इ.स. १९१५ मध्ये प्रथम प्रसिद्ध झाले. या ग्रंथाबद्दल महान योगी अरविंद घोष यांनी म्हटले आहे.... ''ही टीका केवळ मल्लिनाथी नसून स्वतंत्र प्रबंध आहे व त्यात नैतिक सत्यांचे योग्य निदर्शन आहे. गीतारहस्याचा विषय झालेला गीता ग्रंथ भारतीय आध्यात्मिकतेचे परिपक्व सुमधुर फळ होय!'' महात्मा गांधी यांनी म्हटले आहे, ''कै. लोकमान्य टिळकांना आपल्या अभ्यास व विद्वत्ता यांच्या ज्ञानसागरातून हे दिव्य टीका मौक्तिक मिळाले. त्यांच्या या गीतेवरील टीकेपेक्षा जास्त चांगला ग्रंथ अद्याप झाला नाही व लवकर होणारही नाही.) जोगांनी ते बगलेत मारले आणि मशिदीत बाबांच्या दर्शनाला येऊन पोहोचले. नमस्कार करण्यासाठी मस्तक वाकविले (खालविता डोई), तर ते पार्सल बाबांच्या पायाशी पडले. तेव्हा बाबांनी विचारले, ''बापूसाब! हे पार्सल कसले काय बरे?'' जोगांनी बाबांसमक्षच ते पार्सल फोडले, कसले ते सांगितले आणि पुस्तकासह ते त्यांच्या हाती दिले. बाबांनी ते पार्सल पाहिले, त्यातले पुस्तक हातात घेतले, लगेच चाळून पाहिले आणि खिशातून एक रुपया काढून कौतुकाने त्यावर ठेवला. मग रुपयासकट ते पुस्तक जोगांच्या पदरात घातले आणि म्हणाले, ''हे पुस्तक अथपासून इतिपर्यंत (स+आदि+अंत) वाचा, म्हणजे कल्याण होईल.'' (बाबांनी हे पुस्तक न वाचता आणि त्याबद्दल पूर्वी ऐकलेले नसता त्याचे महत्त्व जाणून कौतुक केले, यावरून त्यांची अंतर्ज्ञानता आपल्याला कळते आणि ते बापूसाहेबांना संपूर्ण नीट वाचण्यास सांगितल्यावरून त्यांची भक्ताबद्दलची कळकळ आपल्या लक्षात येते.) अशा बाबांच्या भक्तांवर अनुग्रह करण्याच्या गोष्टी कितीतरी अगणित (असंख्यात) वर्णन करून सांगता येतील. परंतु मग हा ग्रंथ फार वाढेल म्हणून संक्षिप्तपणा आचरणात आणला. (ओ. १३१-१३८)

(वर लोकमान्यांचे नाव आले म्हणून त्यांच्याबद्दल आणखी एक प्रसंग विस्तारपणाचा दोष पत्करूनही सांगावासा वाटतो. दिनांक १९ मे, १९१७ रोजी लोकमान्य टिळक कै. दादासाहेब खापर्ड्यांबरोबर साईबाबांच्या दर्शनाला शिरडी येथे आले होते. बाबांनी त्यांना माधवरावांकडे जेवण करून, थोडा आराम करून, मग पुढे जाण्यास सांगितले होते. टिळकांनी बाबांना आपल्या देशाच्या स्वराज्याच्या कार्याबद्दल सल्ला विचारला होता आणि अंतर्ज्ञानी बाबांनी त्यांना उत्तर दिले होते, ''तुमचे आता वय झाले आहे. विश्रांतीची जरूर आहे. तुम्ही आता आराम का करीत नाही?'' पुढे खरोखरच लोकमान्यांचे लवकरच, म्हणजे २० जुलै, १९२० रोजी निधन झाले व त्यांचे स्वराज्याचे कार्य अपुरे राहिले. नंतर महात्मा गांधींनी पुढे येऊन ते साकारास आणले.)

एकदा शिरडीत असे झाले. अमरावतीचे (महाराष्ट्रात विदर्भातील एक जिल्ह्याचे शहर) दादासाहेब खापर्डे आले. (दी

ऑनरेबल कै. गणेश श्रीकृष्ण खापर्डे. यांचा उल्लेख पूर्वी अ. ४, ओ. १६३-१६४ व अ. ७, ओ. १०१ मध्ये आलेला आहे. हे त्या काळी अमरावतीचे प्रख्यात व भरभराटीचे वकील होते. ते इंग्रजी व संस्कृत भाषेचे गाढ विद्वान आणि उत्तम वक्ते होते आणि इंग्रज सरकारच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे मेंबर होते. स्वराज्याच्या चळवळीत काँग्रेसच्या जहाल पक्षाकडून त्यांनी मोठ्या हिरहिरीने भाग घेतला होता आणि लोकमान्य टिळकांचे ते अगदी निकटचे सहकारी होते. इंग्रज सरकारने लोकमान्य टिळकांना राजद्रोही म्हणून अटक करून, त्यांच्यावर मुंबई हायकोर्टात खटला चालवून, २२ जुलै, १९०८ रोजी सहा वर्षांची कारागृहवासाची शिक्षा केल्यावर, खापर्डे लगेच १५ ऑगस्ट, १९०८ रोजी स्वतःच्या खर्चाने रवाना झाले होते. तेथे प्रिव्ही कौन्सिलकडे लोकमान्यांच्या सुटकेसाठी मुंबई हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध त्यांनी अपील करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तो असफल झाला व दुसऱ्या कोठूनही प्रतिसाद न मिळाल्याने २॥ वर्षानंतर निराश होऊन ५ नोव्हेंबर, १९१० रोजी ते मायदेशी परत आले होते. येताना ब्रह्मदेशातील मंडाले तुरुंगात १६-१०-१९१० रोजी ते लोकमान्य टिळकांना भेटून आले होते. अर्थात्, ह्या सर्व हालचालींमुळे इंग्रज सरकारचा त्यांच्यावर तीव्र रोष होता व टिळकांप्रमाणे त्यांच्यावरही खटला भरून काहीही कारण काढून कारागृहाची शिक्षा ठोठावण्याचा त्यांचा प्रयत्न होता. असल्या परिस्थितीत इंग्लंडहून परत आल्यावर खापर्ड्यांनी एक महिन्याच्या आतच शिरडीला जाऊन साईबाबांची भेट घेतली होती. त्यावेळी ते ५ डिसेंबर, १९१० ते १२ डिसेंबर, १९१०, म्हणजे एक आठवडाच तेथे राहिले होते. याचा उल्लेख अ. ४, ओ. १६३ व १६४ मध्ये आलेला आहे. यानंतर देशातील परिस्थिती जास्तच चिघळत चालली आणि सरकारने स्वराज्याची चळवळ सक्तीने दाबून टाकण्याचे जोरदार प्रयत्न सुरू केले होते. म्हणून पुन्हा ५ डिसेंबर, १९११ रोजी, म्हणजे सुमारे एक वर्षाने खापर्डे यापुढील ओ. १४७ मध्ये म्हटल्याप्रमाणे सहकुटुंब शिरडीस आले, ते सुमारे चार महिने राहिले. बाबांनी त्यांना जाऊच दिले नाही. खापर्ड्यांचा वकिलीचा धंदा बुडत होता व पैशाची तंगी भासत होती. अमरावतीला परत जाण्यासाठी खापर्ड्यांनी वारंवार विनवणी केली. परंतु बाबांनी ती टाळली. त्याला मोठे कारण होते. खापर्ड्यांना सरकारकडून धोका होता, हे बाबांनी अंतर्ज्ञानाने जाणले होते व त्यांना वाचविण्याचे बाबा प्रयत्न करीत होते. याचा पुरावा खापर्डे यांनी स्वतः लिहिलेल्या 'शिरडी डायरी'त (२९ डिसेंबर, १९११) सापडतो. एकदा बाबा खापर्ड्यांच्या पत्नीला म्हणाले होते, ''माझ्याकडे मुंबईचा गव्हर्नर, म्हणजे राज्यपाल हातात भाला घेऊन आला होता; पण माझ्याजवळ त्रिशूळ होता. त्याने मी त्याला हाकलून लावले. पुढे मी त्याचे मन आपल्याकडे वळविले.'' अशाप्रकारे खापर्ड्यांच्या सुरक्षिततेची खात्री झाल्यावरच बाबांनी त्यांना घरी अमरावतीला जाण्यास १५ मार्च, १९१२ रोजी परवानगी दिली. त्यांच्या पत्नी मात्र मागे थांबल्या आणि ओ. १४७ मध्ये म्हटल्याप्रमाणे आणखी तीन महिने, म्हणजे एकंदर सात महिने बाबांजवळ शिरडीत राहिल्या.) सहकुटुंब शिरडीत राहिले आणि बाबांच्या प्रेमात रंगले. खापर्डे काही सामान्य गृहस्थ नव्हते. ते अति विद्वान व बडे प्रस्थ (संपत्ती, विद्या इत्यादी गोष्टींमुळे असामान्य माणूस) होते. तरीपण साईबाबांसमोर ते हात जोडून पायी मस्तक वाकवीत असत. त्यांनी इंग्रजी भाषेचा सखोल अभ्यास केलेला होता (आंग्ल+विद्या+पारंगत) आणि धारासभेत (त्या काळच्या विधानसभेत) नाव कमाविलेले (कीर्तिमंत) असून वक्तृत्वाने सर्वांना ते हालवून सोडत असत; पण साईंपुढे ते गप्प बसत (मूग गिळत) असत. बाबांचे असंख्य भक्त होते; परंतु त्यांच्यापुढे खापर्डे, नूलकर (पंढरपूरचे सब-जज्ज) किंवा बुट्टी (नागपूरचे धनाढ्य गृहस्थ) याशिवाय मौन (मूक) व्रत पाळणारा आणखी कोणी भक्त आढळला नाही. इतर सर्व बाबांशी बोलत, काही तोंडाशी तोंडही देत (बरोबरीच्या नात्याने बोलत), पूज्यभाव किंवा भीती बाळगत नसत; परंतु हे तिघे मात्र काही बोलत नसत (मूकव्रत ते या तिघां). बोलण्याचीच काय गोष्ट! बाबांसमोर सदा मान डोलवीत (संमती दर्शवीत) असत (तुकविती माथा). खरोखर, त्यांचा नम्रपणा (लीनता) अवर्णनीय होता आणि कोणतीही गोष्ट ऐकण्याचा विनयही (श्रवण+शालीनताही) तसाच होता. महापंडित विद्यारण्यांनी रचलेली पंचदशी (सर्व उपनिषदांचे सार काढून लिहिलेला संस्कृत भाषेतील हा ग्रंथ अद्वैतावर सर्वमान्य ग्रंथ आहे. सहजासहजी समजण्यास मात्र तो फार कठीण आहे.) ज्याच्याकडून समजावून घ्यावी ते दादासाहेब खापर्डे मशिदीत येताच गप्प बसत असत. शब्दब्रह्माचे (वेदांचे) तेज कितीही असले तरी ते शुद्धब्रह्मापुढे (सत्य, ज्ञान व आनंदस्वरूप शुद्ध चैतन्यापुढे) निस्तेज होत असते. साईमहाराज साक्षात तेजस्वी परब्रह्म होते. विद्वत्ता त्यांच्यापुढे लाजत असे (नामोहरम होत असे). (ओ. १३९-१४६)

दादासाहेब खापर्ड्यांचे शिरडी येथे चार महिने राहणे झाले होते आणि त्यांचे कुटुंब सात महिने राहिले होते. दोघांनाही शिरडीत फार उत्साह वाटला. त्यांचे कुटुंब मोठे निष्ठावंत (श्रद्धाशील) होते आणि साईचरणी त्यांचे अत्यंत प्रेम होते. त्या मशिदीत स्वतः हातात बाबांसाठी नैवेद्याचे ताट घेऊन येत असत. (त्या त्या काळच्या **'वऱ्हाडच्या नवाबा'**च्या पत्नी होत्या ना! पहा, 'पन्नास वर्षांपूर्वी', 'सकाळ', ता. ४-७-१९८८) जोपर्यंत बाबा नैवेद्य तोंडात टाकीत नसत (न नैवेद्यग्रहण) तोपर्यंत बाई उपाशी राहत असत. महाराजांनी तो खाल्ल्यावरच मग बाईंचे जेवण असे. असो. एकदा बाईंची भाग्याची वेळ आली आणि त्यांची अढळ श्रद्धा पाहून परम भक्तवत्सल बाबा त्यांना परमार्थाचा उत्तम (स+उज्ज्वल) मार्ग दाखविते झाले. अनेक संतांच्या अनेक तऱ्हा असतात. परंतु बाबांची उपदेशाची तऱ्हा अगदी वेगळी (न्यारी) होती. ते हसत-खेळत

असा अनुग्रह देत (वितरत) असत की तो ऐकणाऱ्याच्या हृदयात पक्का (दृढ) ठसत असे. एकदा बाईंनी सांजाशिरा (रवा तुपात भाजून, नंतर त्यात गूळ किंवा साखर घालून केलेले पक्वान्न) व पुऱ्या, वरणभात आणि खीर (दुधात तांदूळ, साखर इत्यादी घालून उकळून केलेले पक्वान्न), तसेच सांडगे (कोहळा, भोपळा, काकडी इत्यादींच्या फोडींत तिखट-मीठ घालून, वाळवून व नंतर तळून केलेले तोंडी लावणे), पापड व कोशिंबिरी इत्यादींनी भरून जेवणाचे ताट आणले. असे ते ताट येताच बाबा मोठ्या हपापल्या (उत्कंठित) मनाने, कफनीच्या बाह्या वर सारून, आपल्या आसनावरून (बैठकीवरून) उठले. मग जेवणाच्या जागी जाऊन बसले, ताट आपल्यासमोर ओढून घेतले आणि वरचे झाकण (आच्छादन) बाजूला सारून ते अन्न खाण्यास तयार झाले (अन्नसेवनी उद्युक्त). इतर पुष्कळ, यापेक्षाही अति चांगले (सरस अपरिमित) नैवेद्य येत असत आणि कित्येक वेळा ते तसेच पडून राहत असत. मग या नैवेद्यावरच एवढे प्रेम (हेत) का? असल्या आवडनिवडीच्या गोष्टी संसारात असतात (ही तो प्रपंचाची वार्ता), संताच्या मनाला त्या का बरे शिवाव्यात (त्यांचा स्पर्श का बरे व्हावा)? माधवराव जवळ होते. ते साईसमर्थांना म्हणाले, ''हा भेदभाव (विषमता) कशाकरिता हो? काहींची ताटे बाजूला ठेवून देता. कोणाची चांदीचीसुद्धा दूर उडवून देता (भिरकाविता). मात्र, या बाईचे येताच उठता आणि खाऊ लागता. आश्चर्य आहे हे! हिचेच अन्न काय इतके गोड असते? देवा! हे आम्हाला मोठे कोडे (गूढ) वाटते. तुझे हे काय डावपेच (गारूड) आहेत? असली आवड-निवड तुम्हाला का बरे असावी?'' बाबांनी उत्तर दिले, ''काय सांगू या अन्नाची अपूर्वाई! पूर्वजन्मी ही एका वाण्याची (वैश्य दुकानदाराची) फार लठ्ठ व पुष्कळ दूध देणारी (दुधाळ) गाय होती. मग ती कोठे नाहीशी झाली व एका माळ्याकडे (फुलवाल्याकडे किंवा बागवानाकडे) जन्माला आली. तीच पुढे एका क्षत्रियाकडे गेली आणि मग एका वाण्याची (वैश्याची) पत्नी झाली. आता ही ब्राह्मणाच्या पोटी जन्माला आली (उपजली) आहे (आणि ब्राह्मणाची पत्नी झाली आहे). बऱ्याच काळानंतर माझ्या दृष्टीस पडली आहे. (तिच्याकडून मिळालेले) प्रेमाचे दोन घास पोटात जाऊ दे आणि मनाला सुखसमाधान लाभू दे!'' असे म्हणून बाबा मनसोक्त पोटभर (यथा+इष्ट) जेवले, तोंड व हात धुतले आणि साहजिकच समाधानाचे (तृप्तीचे) ढेकर (पोट भरल्यामुळे पोटातील वायू तोंडाने बाहेर येताना होणारा आवाज) दिले आणि गादीवर येऊन बसले. बाईंनी (खापर्ड्यांच्या पत्नीने) मग नमस्कार करून बाबांचे पाय चेपण्यास सुरुवात केली (साई+चरण+संवाहन आरंभिले). ती संधी साधून बाबा तिला तिच्या कल्याणाची गोष्ट (हितगूज) सांगू लागले. ज्या हातांनी बाई त्यांचे पाय दाबीत होत्या (चूरी) तेच हात बाबा आपल्या हातांनी (स्व+करीं) दाबू लागले. अशी देवभक्तांची परस्पर चाकरी (सेवा) पाहून शामा त्यांची मस्करी (थट्टा) करीत म्हणाला, ''देवा, ठीक चालले आहे की! काय मौजेचे दृश्य हे! एकमेकांचे प्रेम पाहून मनाला अत्यंत कौतुक (नवलावा) वाटते.'' बाईंची सेवा करण्याची आसक्ती (सेवा+काम) पाहून बाबांचे मन (अंतर्याम) प्रसन्न झाले. ते हळूच तिला म्हणाले, **''राजाराम राजाराम''** असे तोंडाने म्हणत जा! नेहमी (नित) असे म्हणत जा! म्हणजे आई! तुझे जीवन सफल होईल. तुझे मन शांत होईल आणि अमर्याद (अ+परिमित) कल्याण प्राप्त करशील.'' काय त्या शब्दांचा चमत्कार (मात)! ते हृदयात जाऊन खोचत असत आणि लगेच (क्षणार्धात) जणूकाय शब्दांनीच शक्तिपात (गुरूकडून शिष्याला नुसत्या स्पर्शाने किंवा दृष्टीने आपली शक्ती देणे) करीत असत. असा कृपाळू आणि शरण आलेल्यांचा सांभाळ करणारा (प्रणत+पाळ) हा समर्थ साईनाथ सदा भक्तांचे मनोरथ पुरवीत असे आणि त्यांचे कल्याण साधून देत असे. (ओ. १४७-१६९)

(या लक्ष्मीबाई खापर्डे यांचे पुढे खरोखरीच मोठे कल्याण झाले. त्यांना मरणही पती दादासाहेब खापर्डे यांच्यादेखत व सर्व मुले, सुना व नातवंडे यांच्या हजेरीत अगदी शांत चित्ताने आले. त्यांना आपल्या मरणाची कल्पना आलेली होती. मरणाआधी आठ दिवस दादासाहेब संध्या करीत बसलेले असताना त्या त्यांच्याजवळ गेल्या आणि देवाची पूजा करतात त्याप्रमाणे त्यांची (आपल्या पतिदेवाची) पूजा केली. दादसाहेबांनी त्यांच्या या वागण्याचे कारण विचारले असता त्या म्हणाल्या, ''आता मला या जगातून सुखाने जावयाचे आहे.'' काही आठवड्यांपूर्वी लक्ष्मीबाईंनी आपले दाग-दागिने व किंमती कपडे आपल्या सुनांना व नातवंडांना वाटून दिले होते. आता त्यांनी औषधपाणी घेण्याचे थांबविले होते. त्यांना आपल्या सद्गुरु साईबाबांचे दर्शनही झाले आणि शेवटी दिनांक २० जुलै, १९२८ रोजी त्या साईचरणी विलीन झाल्या. साईभक्ताला याहून चांगले मरण कोणते हवे असणार!)

आता श्रोत्यांना अत्यंत नम्रपणे (लीन) व अत्यंत प्रेमाने त्यांच्या अत्यंत हिताच्या गोष्टी सांगतो. त्या त्यांनी मनात ठसवून ठेवाव्यात, अशी सलगीची (लडिवाळपणाची) विनंती करतो. गुळाच्या गोडीला आसक्त (लंपट) झालेली मुंगी, जशी मुंडी (शीर) तुटून पडली, तरी तो गूळ सोडत नाही (न सांडी), तशी तुम्ही साईचरणी शरणागती (दढी) द्या, म्हणजे तो साई मोठ्या कृपेने (कृपा परवडी) तुमचे रक्षण करील. गुरू व शिष्य वेगळे नाहीत. दिसायला जरी ते भिन्न (आगळे) दिसले, तरी ते एकांगी (एक+अंगी: अंगात सारखेच गुण, बुद्धी किंवा ज्ञान असलेले) आहेत. त्यांना जो हट्टाने वेगळे करू पाहील, त्याचा अभिमान गळून पडेल (त्याला ते शक्य होणार नाही). त्या दोघांपैकी एकावाचून एक राहिला (ठेला), तर तो गुरू कच्चा (आत्मज्ञानात पूर्णत्वाला न पोहोचलेला) आणि तो चेलाही (शिष्यही) कच्चा (अर्धवट ज्ञान पावलेला) जाणावा. जो पक्क्या गुरूच्या पदरी तयार झालेला (केला) असतो, त्याला द्वैत (वेगळेपणा) स्पर्शही करीत नसतो (अबोला तयासि). गुरूने एका गावी राहावे आणि शिष्याने दुसऱ्या गावी राहावे, असे ज्यांना पसंत असेल (मन+भावी), ते दोघेही लबाड (मान+भावी) असतात. मुळातच जर दोन नाहीत, तर त्यांच्यात वेगळेपणा तो कोठला! एक दुसऱ्याशिवाय क्षणभरही दूर राहू शकत

नाही, इतके ते दोघे एकरूप (अनन्य) असतात. गुरू व भक्त यांच्यातही मुळीच दूरपणा (अंतर) नसलेले सतत (निरंतर) राहणे (वास्तव्य) असते. भक्ताने गुरूच्या चरणी मस्तक ठेवणे हाही स्थूलबुद्धीचा (मी आत्मा नसून देहच आहे, अशा अज्ञानाचा) व्यावहारिक पूजेचा प्रकार (उपचार) आहे. भक्त गुरुचे एकात्मतेने भजन करणारा (अद्वैत+भजन+पर) आणि गुरुही भक्ताला एकात्मतेच्या भावनेने पाहणारा (अद्वैत+भक्त+पर), असे जर दोघे एकमेकांत समरसलेले (मीनतां परस्पर) नसतील, तर तो केवळ नावाचा (किंचित् उपयोग नसलेला) व्यवहार होय! (ओ. १७०-१७७)

खायला अन्न व नेसायला वस्त्र (अन्न+आच्छादन) कसे मिळेल, याची क्षणमात्रही काळजी करू नका. हे तर नशिबावर (प्रारब्ध+अधीन) अवलंबून असते व प्रयत्न केल्याशिवाय मिळणारे (प्रयत्नावीण+आपाद्य) असते. प्रयत्न करून जर का ते मिळवू पाहाल, तर ते फुकटचे श्रम (व्यर्थ शीण) होतील. प्रयत्नच करायचे तर परमार्थ साधण्यासाठी करा व रात्रंदिवस त्याचीच चिंता करा! **'उत्तिष्ठत** (उठा)' आणि **'जागृत** (जागे व्हा)', अशी श्रुतिमाउली जोरजोराने ओरडून सांगत आहे आणि भक्तांना जागवीत आहे. (पहा, कठोपनिषद, अ. १, वल्ली ३ **उत्तिष्ठत जाग्रत प्राप्यवरान्निबोधत। क्षुरस्य धारा निशिता दूरत्यया दुर्गं पथस्कवयो वदन्ति॥१४॥** हे मनुष्यांनो! उठा, जागे व्हा! श्रेष्ठ महापुरुषांजवळ जाऊन त्यांच्या उपदेशाने आपल्या कल्याणाचा मार्ग समजावून घ्या! तो मार्ग तलवारीच्या तीक्ष्ण धारेवर चालण्यासारखा अत्यंत कठीण आहे, असे ज्ञानीजन सांगतात.) म्हणून जे लोक सर्व अनर्थांचे बीज असलेल्या जन्मजन्मांतराच्या अज्ञान (अविद्या) रूपी निद्रेत लोळत पडलेले आहेत त्यांनी वेळीच सावध (जागृत) होऊन गुरूकडून ज्ञानरूपी अमृताचे सेवन करावे. त्यासाठी अति नम्र (विनीत) होऊन गुरूच्या चरणी शरण जावे. त्या एकट्यालाच योग्य कोणते व अयोग्य कोणते (विहित+अविहित), ते ठाऊक असते. आम्ही तर अजाण बालके आहोत (नेणत लेकरें). तुटपुंज्या ज्ञानाचा मीपणा असलेला जीवात्मा (किंचित्+ज्ञ साहंकार जीव) आणि सर्वकाही जाणणारा मीपणा नसलेला परमात्मा (निरहंकार सर्वज्ञ शिव) ह्या दोघांत एकात्मतेची भावना (अभेद+भाव) होण्यासाठी गुरू हाच एक उपाय आहे. अज्ञानाची उपाधी (त्रास) असलेला आत्मा, जो जीव आणि मायेची उपाधी (त्रास) असलेला आत्मा, जो शिव यांच्यातील भेदभाव घालविण्याला एकटा गुरूराजच समर्थ असतो. मन शंकाकुशंका करणारे (संकल्प+विकल्प+अधीन) असते, त्याला साईचरणी अर्पण करा, म्हणजे तेथून जे जे करण्याची स्फूर्ती होईल, त्याचे कर्तृत्व (अहंपण) त्याच्याकडे (साईबाबांकडे) जाईल. तसेच कार्य करण्याची आपली सगळी शक्ती (क्रिया+शक्ती) तीही साईबाबांनाच समर्पण करा व मग ते जशी आज्ञा करतील (आज्ञापी), त्या तऱ्हेने वागावे. या जगात सर्व सत्ता साईंचीच आहे, हे लक्षात ठेवा. म्हणून त्यांच्यावर सर्व भार (जबाबदारी) टाकून कोणतेही कार्य अभिमान न धरता केले तर संपूर्ण (अ+विकल) सिद्धी हातात येईल. परंतु हे कार्य मी करीन, असे म्हणाल आणि किंचितही अभिमान धराल, तर एका क्षणाचा विलंब न लागता त्याचा परिणाम (फल) दिसून येईल (कार्य सिद्धीस जाणार नाही). मायेने (ईश्वराच्या मोह घालणाऱ्या शक्तीने) उत्पन्न केलेल्या मोहाच्या (अज्ञानाच्या) रात्री (निशीस) शरीराला या कुशीहून त्या कुशीला (बाजूला) आळेपिळे देत असताना (म्हणजे सहजगत्या) हेमाडपंतांना हरि व गुरू यांची कृपा लाभली. तीही केवळ दैवयोगाने (अदृष्टवशे), मेहनत किंवा प्रयत्न केल्याशिवाय लाभली. त्यांनीच (म्हणजे हरिगुरूंनी) आपल्या उद्देशासाठी त्याला मोठेपणा दिला (गौरविले), असे वाटते. भक्तांचा उद्धार करण्यासाठी आपले चरित्र प्रसिद्ध करण्याचा निश्चय (निर्धार) करून त्याच्याकडून बळजबरीने हे सविस्तर चरित्र लिहविले. तेव्हा अखंड ध्यानरूपी दोऱ्यात (अनुसंधान सूत्र) अनन्य प्रेमरूपी नानाप्रकारच्या रंगीबेरंगी (विचित्र) फुलांचा मनोहर हार गुंफून आदरपूर्वक साईंना अर्पण करू या आणि आत्मस्वरूपरूपी स्वराज्याचे सिंहासन (स्वराज्य+सिंहासन) मिळवू या, मग त्या सिंहासनावर (स्व+पदी) स्थिर होऊन शोभायमान (विराजमान) होऊ या, अहंकाराशिवायच्या आत्मानंदाचा उपभोग घेऊ या आणि आपल्या हृदयात (निज+अंतरी) सुखी होऊ या! (थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, साईबाबांचे अनन्य प्रेमाने व पूज्य भावाने आपण ध्यान करू या! जेणेकरून आपले मन आत्मस्वरूपी स्थिर होईल आणि मग आपल्याला आत्मानंदाचा उपभोग मिळून आपले मन सुखी होईल.) (ओ. १७८-१९३)

असे हे साईबाबांचे अगाध (ज्याचा कधी अंत लागत नाही असे) चरित्र आहे. पुढील कथा तर याहून आश्चर्यकारक (विचित्र) आहेत. श्रवणेंद्रिय (कान) शुद्ध करण्यासाठी क्षणभर इकडे लक्ष द्या (दत्त+अवधान व्हा)! पुढे तीन अध्याय (अध्याय+त्रयी) येतील. त्यात बाबा आपल्या जागच्याजागी बसून दृष्टांताची (भूत, भविष्य इत्यादी गोष्टींचे सूचक स्वप्न) अपूर्वाई (नवलाई) दाखवितील. त्यातील सुरवातीच्या अध्यायात लाला लखमीचंदाचा विषय आहे. त्याच्या पायाला प्रेमरूपी दोरीने (सूत्रें) बांधून त्याचे आश्रयस्थान (निज+स्थान) त्याला दाखविले. बऱ्हाणपूर (मध्यप्रदेशातील खांडवा जिल्ह्यातील तालुक्याचे गाव) येथे राहणाऱ्या एका बाईच्या खिचडीसाठी (तांदूळ व डाळ यांची शिजविलेली मिसळ) आसक्त (कामुक) होऊन बाबांनी तिला आपल्या दर्शनाला उत्सुक केले आणि तिच्या प्रेमाचे (भक्तीचे) कौतुक करून दाखविले. पुढे मेघा नावाच्या एका निःसीम भक्ताला स्वप्नात भिंतीवर त्रिशूळ (तीन फाळ असलेले शंकराचे शस्त्र) काढण्याचा दृष्टांत झाला आणि त्यापाठोपाठ एकाएकी (अकस्मात) शंकराचे लिंग (विशिष्ट प्रकारची प्रतिमा) त्याला प्राप्त झाले. अशा अनेक कथा येथून पुढे आता येतील. श्रोत्यांनी भक्तिपूर्वक ऐकल्या तर त्या ऐकण्याचे सार्थक होईल. मिठाचा खडा जसा सागरात बुडाल्यावर (सैंधव सिंधु+निमज्जन) त्याच्याशी एकरूप होतो, त्याप्रमाणे सोहंभावाच्या अभिन्नपणे (''तो ब्रह्म मीच आहे'' या एकात्मच्या भावनेने), हेमाडपंत साईंना अनन्यपणे नमस्कार करीत आहेत. शिवाय प्रेमाने विनंती करीत आहेत की,

''आम्हाला साईंचे रात्रंदिवस (अहः+निश) ध्यान लागो, त्यांच्याशिवाय दुसरे काही मनात न येवो (न रिघो आन) आणि मन सदा सावधान राहो. तसेच भूतकाळ खोडला (पुसला) जावो (परिहार), भविष्यकाळचा शेवट पुढे ढकलला जावो (निर्दळून जावा पार) आणि शिल्लक राहिलेला मधला वर्तमानकाळ (अवशेष मध्यंतर) गुरूचरणी सतत राहो. (ओ. १९४-२०२)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंतांनी रचलेल्या, श्री साईसमर्थ यांच्या सत्यचरित्राचा **'दीक्षा+अनुग्रह+दानं'** (शामाला विष्णुसहस्त्रनामाची दीक्षा देणे आणि खापर्डेंच्या पत्नीवर अनुग्रह करणे) नावाचा सत्ताविसावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरू साईनाथांना अर्पण असो.**
**सर्वत्र मंगल असो.**

## अध्याय २७ची आणखी टीका

या अध्यायाचा विषय बाबांच्या भक्तांवर अनुग्रह करण्याच्या तऱ्हेचे उदाहरणांसह वर्णन आहे. सद्गुरू एकदा का प्रसन्न झाले की त्या भक्ताला अनेक प्रकारे अनेक युक्त्या करून त्याचा उद्धार करण्याचा ते प्रयत्न करतात. तसेच एखाद्या भक्ताला त्याने स्वतः निवडलेला मार्ग आवडत असला; पण सद्गुरूच्या मते तो मार्ग त्या भक्तासाठी अयोग्य असेल, तर ते त्याला त्याबाबतीत उत्तेजन न देऊन त्यापासून परावृत्त करतात. साईबाबांचे तसेच होते.

पहिल्या उदाहरणात भक्त धार्मिक पुस्तके बाजारातून आणून बाबांच्या हाती देत व प्रसाद म्हणून ती परत घेण्याची इच्छा बाळगीत. त्यांना वाटे की असे केले म्हणजे आपले त्या पुस्तकांचे पारायण यथास्थित व अर्थ नीट समजून होईल. पण बाबा ते ग्रंथ सर्वांनाच परत करीत नसत. भक्ताची बुद्धी, ग्रहणशक्ती व स्वभावाचा खरा कल पाहूनच ते देत असत व बाकीची शामाकडे संग्रहासाठी देऊन टाकीत असत.

पण शामाने वाचण्यासाठी हातात घेतलेले काका महाजनींचे एकनाथी भागवत बाबांनी पाहण्यासाठी मागून घेतले आणि त्यालाच ते परत दिले. कदाचित शामाची ते वाचण्याची चांगली इच्छा झाली ती पक्की करण्यासाठी तर बाबांनी असे केले नसेल ना! बाबांना कल्पना होती की ते पुस्तक शामाचे नसून काका महाजनींचे होते. आपणच ते त्यांना पूर्वी दिले होते. परंतु याक्षणी त्या पुस्तकाची गरज शामाला जास्त होती. म्हणून बाबांनी ते शामाला दिले असावे, असे वाटते. काका महाजनींना पुढे दुसरे भागवत बाबांनी दिलेच आणि कळकळीने सांभाळून ठेवण्यास सांगितलेच ना!

बापूसाहेब जोगांच्या 'गीतारहस्या'च्या पार्सलाविषयी घ्या. ज्याअर्थी ते पार्सल कसले, हे जोग पोस्टात उत्सुकतेने पाहू लागले होते, त्याअर्थी त्यांनी ते पुस्तकविक्रेत्याला मागणी पाठवून मागविलेले नव्हते. कोणीतरी त्यांना पाठविलेले असावे किंवा बाबांनी तर ही व्यवस्था केली नसेल ना! नमस्कार करताना नेमके ते बाबांच्या चरणी पडावे आणि बाबांनी त्याची चौकशी करावी, ही घटना आश्चर्याचीच! मला तर वाटते, बाबांची इच्छाच होती की टिळकांचे 'गीतारहस्य', म्हणजे कर्मयोगशास्त्रावरचे हे पुस्तक, जोगांनी जरूर वाचावेच; कारण जोगांची पत्नी जिवंत असताना अलीकडे त्यांच्या मनात संन्यास घेण्याचे विचार येत होते. सर्वज्ञ बाबा जाणत होते की त्या गोष्टीला अजून उशीर आहे. तोवर सध्या जोगांनी आपली संसारातील कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. म्हणून तर बाबांचा हा उपद्व्याप नसेल ना! पुढे जोगांच्या पत्नी वारल्या आणि पुढे अ. ४४, ओ. १४३ ते १४६ मध्ये म्हटल्याप्रमाणे जोगांनी खरोखरीच संन्यास घेतला. गावठी शामाला एकनाथी भागवत वाचवयाला आणि सुशिक्षित जोगांना 'गीतारहस्य' वाचण्यास सांगण्यातही बाबांचा भक्तांचा अधिकार पाहून अनुग्रह करण्याचा चोखंदळपणा दिसून येतो.

शामाला विष्णुसहस्त्रनामाची पोथी देण्यात तर बाबांची भक्तांबद्दल अनन्य कळकळ दिसून येते. त्यासाठी बाबा रामदाश्याकडे पोटात कळ आली म्हणून खोटे तर बोललेच; पण त्याच्या पोथीची चोरीही केली. सद्गुरू किंवा देव भक्तासाठी काय करणार नाही! महाभारतातील युद्धप्रसंगी अर्जुनाला वाचविण्यासाठी श्रीकृष्ण भगवान स्वतः भीष्मावर सुदर्शन चक्र घेऊन चालून गेले आणि आपली शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा मोडली ना!

नंतर रामदाश्यालाही क्रोध न करण्याची व कसलाही लोभ न धरण्याची, रामदासी पंथाला शोभेल, असे वागण्याची शिकवण बाबांनी दिली. धन्य बाबांची उपदेश करण्याची युक्ती!

सौ. लक्ष्मीबाई खापर्डे यांना त्यांच्या भोळ्या निःस्सीम भक्तीचे फळ बाबांनी दिले. कित्येक जन्मांचा ऋणानुबंध होता ना! शामाचाही ऋणानुबंध मोठा, म्हणजे पुढे अ. ३६, ओ. १४० मध्ये म्हटल्याप्रमाणे ७२ पिढ्यांचा. दोघांनाही नामस्मरणाचा सोपा आणि सरळ मार्ग बाबांनी सांगितला. बहुतेक काहीच न शिकलेल्या सौ. खापर्ड्यांना नुसता ''राजाराम राजाराम'' हा मंत्र सांगितला. बाबा कोणालाही कानमंत्र देत नसत; पण या बाईसाठी तो निश्चय त्यांनी मोडला आणि तोही कशाप्रकारे! आपले पाय दाबीत असलेल्या भक्ताचे हात दुखत असतील म्हणून ते स्वतःच्या हाताने दाबून प्रेमपूर्वक दिला. असा उपदेश किंवा दीक्षा भक्ताच्या मनात ठसल्याशिवाय राहील का! या बाईचा उद्धार कसा झाला, हे आपण वर अध्यायातील ओ. १६९च्या टीकेत वाचलेच आहे.


स्वतः खापर्डे इतके ज्ञानी, धर्मशास्त्रांचा इतका खोल अभ्यास केलेले विद्वान; परंतु त्यांना बाबांनी कधीकधी फक्त यौगिक दृष्टिक्षेप करून स्वानंदाचा अनुभव दिला. हेतू हा की त्या सुखद अनुभवाच्या आशेने खापर्ड्यांनी आपले धंद्याकडील व मोठेपणा मिळविण्याकडील लक्ष्य परमार्थाकडे वळवावे; पण ज्ञानी माणूस सहज आपला अहंकार टाकून इकडे वळत नसतो. असो.

एवढे मात्र खरे,

**''हरी निजभक्तांचा केला।**
**भाळ्या भोळ्यांचा भुकेला।**
**प्रेमालागीं समूळ विकला।**
**सदा हठेला दांभिकां॥९॥**

—अध्याय ३

ग्रंथ परिचय – साईशा



# प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती

## 'प्रस्थान' ते 'योगी'

जीवनाचे अंतिम साफल्य कशात आहे आणि त्यायोगे आपले कल्याण कसे करून घ्यावे हे मनुष्यप्राण्याने ओळखावे यासाठी या पृथ्वीतलावर परमेश्वराने वेळोवेळी अवतार घेतलेले आहेत. या भारतभूमीतही कित्येक संत किंवा सद्गुरू अवतीर्ण झाले व त्यांनी भक्तीचे, पर्यायाने मोक्षाचे द्वार आपल्यासारख्या सामान्यांसाठी खुले करून ठेवले आहे.

खरोखरच संतांचा महिमा काय वर्णावा! **''संत धर्माचे धर्मक्षेत्र। संत स्वरूपाचे सत्पात्र। नांतरी पुण्याची पवित्र पुण्यभूमी॥''** किंवा श्रीमद्भगवद्गीतेत श्रीकृष्ण परमात्म्याने म्हटल्याप्रमाणे **''संत म्हणजेच माझा आत्मा। संत ही माझी सजीव प्रतिमा। संत सप्रेमा तोच मीच।''** अशारीतीने ज्यांचे वर्णन केले जाते त्या संतांचे चरित्र तर अद्भुतच; पण त्यांच्या वचनांचे सामर्थ्यही तितकेच अद्भुत असून त्यांच्या श्रवणाने आणि अभ्यासाने स्वानंदस्वरूप परमात्म्याची प्राप्ती होते. चरित्रकारांना म्हणूनच तर अशा संतांचे चरित्र लिहीणे म्हणजे मोठे धाडसच वाटते. कारण ह्या थोर विद्वज्जनांच्या मते, सामान्यांच्या बुद्धीची मर्यादा जिथे संपते तिथेच सत्पुरुषांच्या चरित्राला प्रारंभ होतो. किंबहुना, **''ज्यांचे चरित्र संपलेले असते तेच खरे सत्पुरुष होत''** असे यथार्थ उद्गार एका थोर सत्पुरुषानेच काढले आहेत.

श्रीमद्यतींद्र स्वानंदसम्राट श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वती हे याच कोटीतले परमात्मा होत. त्यांचे चरित्र आणि कार्य अद्भुत तर आहेच; त्याहीपेक्षा त्यांची ग्रंथवाङ्मयनिर्मिती हा त्यांच्या चरित्रापेक्षाही 'मोठा चमत्कार' मानावा लागेल. साधकांसाठी अगदी प्रथमावस्थेपासून शेवटच्या अवस्थेपर्यंत उत्तम मार्गदर्शन करणारी, तसेच सामान्यांनाही साधनेचा निश्चित मार्ग दाखवणारी अनेकतऱ्हेची ग्रंथनिर्मिती त्यांनी केली आहे. त्यांचे **एकूण वाङ्मय सुमारे ५॥ हजार पाने** भरतील एवढे असून त्यांचे अनुग्रहीत शिष्य श्री. वामन द. गुळवणी महाराज, पुणे यांनी ते सर्व १२ खंडांत प्रसिद्ध केले आहे. निष्ठावंत साधकांकरिता स्वामींचे हे चरित्र म्हणजे एक चमत्कार असून 'एक ज्ञानदीपच' आहे. गुळवणी महाराज म्हणतात त्याप्रमाणे **''सर्व भूतहिते रता:''** या भूमिकेवर नित्य असणाऱ्या सत्पुरुषांची चरित्रे ही संसारसमुद्रातील दीपस्तंभाप्रमाणे खरी 'मार्गदर्शक' होत.

---

**पुढील पंक्तींमध्ये वासुदेवानंद सरस्वती यांच्या विचार-आचारांची झलक पहावयास मिळते :**

**सदा संतांपाशीं जावें।**
**त्यांच्या जवळी बैसावें॥१॥**
**उपदेश ते न देती।**
**तरी ऐकाव्या त्या गोष्टी॥२॥**
**तेचि उपदेश होती।**
**त्यांहीं कष्ट नष्ट होती॥३॥**
**वासुदेव म्हणे संत।**
**संगें करिती पसंत॥४॥**

**बाबांनीही आपल्या भक्तांना प्रत्यक्ष उपदेश दिल्याच्या गोष्टी अत्यल्प आहेत. प्रत्यक्षात त्यांची अधिकारयुक्त दिव्य वाणी व त्यांची अलौकिक कृती यातूनच प्रत्येक भक्ताला अप्रत्यक्षरीत्या उपदेश मिळत असे. त्यांच्या कथा म्हणजेच विविध भक्तांना वेळोवेळी आलेले विविध अनुभव होत. ह्या कथा म्हणजे अनमोल भांडार आहे. त्या कथामृताचे कितीही पान केले तरी सदा अपुरेच रहाणार, इतकी त्या कथांची महती आहे. तेव्हा हेमाडपंत म्हणतात त्याप्रमाणे जयांसी साईंचे प्रेम पूर्ण। तयांसी हे कथांचे साठवण। देईल पदोपदी आठवण साईचरणपंकजांची॥ (अ. १४)**

**नित्य पडता या कथा श्रवणी।**
**साई दिसेल नित्य नयनी।**

मनी ध्यानी दिवा रजनी।
स्मरणी चिंतनी राहील।। (अ. १४)

गोड संतांचे आहार विहार।
सहजोद्गारचि गोड।। (अ. १४)

केवल संतांचे दर्शन।
करी सकल दोषांचे क्षालन।
जयांसी त्यांचे नित्य संन्निधान।
काय ते पुण्य वर्णावे।। (अ. २०)

बाबा जे जे बोल वदत।
बोल नव्हे ते ब्रह्मलिखित।।
(अ. २०)



संत सहज उद्गारले तरी।
ती वाणी होणार खरी।।
(अ. २६)

परिसतां तव कथा निर्मळ।
स्वेद अंगीं फुटो निखळ।
नेत्रीं दाटो प्रेमजळ।
प्राण पांगुळला राहो।। (अ. २७)

**श्री वासुदेवानंद सरस्वतींनी सांगितलेल्या संतांच्या महतीप्रमाणे बाबा आपल्या वाणीतून व कृतीद्वारे पुन्हा पुन्हा हेच सांगत होते. केवळ संतांच्या सहवासामुळेदेखील माणसाची 'आत्मोन्नति' होते आणि परमस्थिती प्राप्त होते.**

अशा या 'दत्तसाक्षात्कारी' थोर महत्पुरुषाचे चरित्र मूळात अद्भुत आणि अवघड. एकूणच सत्पुरुषाच्या जीवनावर काही लिहीणे म्हणजे वाटते तितकी सोपी गोष्ट मुळीच नाही. श्री. विद्याधर भागवत, सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग यांनी श्री वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबेस्वामी यांच्या लौकिक चरित्राच्या आधारे त्यांच्या खडतर जीवनावर कादंबरी लिहीण्याचा एक स्तुत्य प्रयत्न केला; आणि त्यात ते पूर्ण यशस्वीही झाले आहेत. मूळातच चरित्र आणि कादंबरी हे साहित्यातील दोन भिन्न प्रकार आहेत. त्यातून 'संतचरित्र' हे सामान्यजनांच्या चरित्रापेक्षा निश्चितच वेगळे, अद्भुत, अलौकिक, चमत्कृतीपूर्ण आणि म्हणूनच आपले निराळेपण जपणारे असते. त्यात चरित्रनायकाच्या किंवा नायिकेच्या जीवनाचा संपूर्ण तपशील शक्यतो संगतवार, सविस्तर असा असतो. त्यामुळे तो विस्तृतही असतो आणि सत्यही असतो (असे गृहीत धरले जाते). संतचरित्र अभ्यासताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती अशी की संतचरित्र हे उघड व निखळ असे असते. त्यात लपविण्यासारखे काहीही नसते. कारण त्यांचे जीवन हे ईश्वरव्याप्त असते. तो एक शुद्ध, स्वच्छ, निखळ, अत्यंत पवित्र आणि अमोलिक अशा भावनांचा आविष्कार असतो. 'भक्ती' हा त्याचा गाभा असतो. थोडक्यात, आपल्यासारख्या सामान्यांनाही ह्या चरित्रांपासून नवी प्रेरणा, एक नवे जीवनाचे मृत्यूंजय आणि स्फूर्तीदायक तत्वज्ञान प्राप्त होण्यास निश्चितच मदत होते आणि त्यापासून प्राप्त होणारी स्वानंद अनुभूती ही आपल्या भावी आयुष्यात प्रपंचातून परमार्थ कसा साधावा याला मार्गदर्शक ठरते. तसेच साधकांच्या दृष्टीनेही ते एक वरदानच असते.

कादंबरीचे तसे होत नाही. मूळातच ते काही चरित्र नव्हे. त्यामुळे नायक किंवा नायिकेच्या आयुष्यातले सर्व तपशील कादंबरीत आले पाहिजेत असा आग्रह धरण्याचेही कारण नसते. एखाद्या लहानश्या घटनेवरूनही कादंबरी विस्तृत करता येते. त्यातील घटना सत्य किंवा काल्पनिक कशाही असू शकतात. कादंबरी अधिकाधिक चित्तवेधक कशी होईल याकडेही लेखकाला लक्ष द्यावे लागते. भाषा मोहून टाकणारी हवी म्हणून तो तिला विविध शब्दालंकारांनी नटवतो आणि आकर्षक बनवतो. थोडक्यात, कादंबरी म्हणजे सत्य व कल्पनेचा मेळ असतो किंवा फक्त कल्पनेचाच खेळ असतो, मनोरंजनाचा वा अंतर्मुख करण्याचा प्रयत्न असतो. श्री. विद्याधर भागवत यांनी श्री वासुदेवानंद सरस्वतींवर लिहिलेल्या 'प्रस्थान' व 'योगी' ह्या कादंबऱ्यांच्या दिशेने वाटचाल करण्याआधी श्री वासुदेवानंद सरस्वतींचे चरित्र आजवर त्यांच्यावर प्रसिद्ध झालेल्या लिखाणाच्या आधारे अभ्यासणे अधिक श्रेयस्कर होईल. विशेषत: त्यांचे बालपण, जे श्री भागवतांनी सुरवातीलाच कादंबरीची मर्यादा ठरविल्याने त्याला अनुसरून वगळले आहे. त्याच्याविषयी कादंबरीच्या प्रारंभी थोडे कळणे आवश्यक वाटते. अर्थात, प्रसंगानुरूप त्यांच्या बालवयातील घटनांचा थोडाफार उल्लेख आलेला आहे. त्यांच्या जीवनातील तरूणपण आणि उत्तरार्ध हे दोन टप्पे अधिक महत्त्वाचे असल्यामुळे आणि कादंबरी लिहायची म्हणजे त्याला कुठेतरी मर्यादा घालून घेणे आवश्यक ठरल्यामुळे त्यांना असे करणे भाग पडले असावे.

रत्नागिरी जिल्ह्यातील 'सावंतवाडी' या नावाच्या छोट्याशा सरहद्दीनजीक एक हरिभट्ट टेंबे नावाचे सच्छिल वैदिक ब्राह्मण रहात असत. त्यांनी स्वहस्ते गुरुचरित्राची पोथी लिहिली होती. त्याला दीडशे वर्षेही आता उलटून गेली तरी अद्यापपर्यंत ती सुस्थितीत आहे, असे म्हणतात. कालांतराने ते गाव सोडून सावंतवाडीपासून ८-९ मैलावर असलेल्या माणगावी वेदशास्त्री सीतारामभट्ट कोनकर यांच्याकडे आश्रयाला आले व नंतर तेथेच स्थायिक झाले. वेदशास्त्री कोनकरांनी आपली मुलगी वेदशास्त्री हरिभट्ट यांच्या गणेश नावाच्या मुलाला दिली. लग्नानंतर तिचे नाव रमाबाई झाले. या पुण्यवान जोडप्याला पहिला मुलगा शके १७७६ (इ.स. १८५५), श्रावण वद्य पंचमीला रविवारी सकाळी झाला. या मुलाचे नाव 'वासुदेव' ठेवण्यात आले. हेच पुढे श्री वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबेस्वामी म्हणून प्रसिद्धीस आले.

गणेशभटजी बारा वर्षे गाणगापूरला होते. तेथे १२ वर्षे सेवा केल्यावर श्री दत्तमहाराजांनी त्यांना दृष्टांत दिला.... **''मी तुमच्यावर प्रसन्न झालो आहे. तुम्ही आता घरी जाऊन रहा! याउपर गाणगापुरी येण्याचे कारण नाही.''** त्यानंतर वासुदेवांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण खासगी शाळेत वयाच्या तिसऱ्या वर्षीच सुरू झाले. अगदी लहानवयातच त्यांनी समासचक्र, रूपावली, अमरकोश इत्यादींचा अभ्यास आपल्या आजोबांच्या हाताखाली पूर्ण केला. नवव्या वर्षी मुंज झाल्यावर संध्या, गुरुचरित्र-वाचन, वेदाध्ययन इत्यादी सुरू केले. पुढे हरिभट्ट वारल्यामुळे घरचे शिक्षण बंद झाले. त्यानंतर वेदशास्त्री तात्याभटजी उकिडवे व वेदशास्त्री ओळकर गुरुजी यांच्याकडे त्यांनी वेदाध्ययन केले. ते सोवळ्यात राहून वेदाध्ययन करीत असत. नित्य नैवेद्य, वैश्वदेव करूनच भोजन करीत. या कडक शास्त्रशुद्ध आचरणामुळेच वेदमंत्रांची शक्तिसिद्धी बालपणातच त्यांना प्राप्त झाली. त्या मंत्रांचा प्रत्ययही त्यांना येऊ लागला. त्यानंतर त्यांनी याज्ञिकाचा व त्यानंतर वेदशास्त्री शंभूशास्त्री साधलेंकडे संस्कृत व ज्योतिषाचा अभ्यास केला. त्यांचे आचरण अत्यंत कडक असे. एकादशीस कडकडीत उपवास असे. परान्न कधीही घेऊ नये, कोणाबरोबर वाद घालू नये, पादत्राणे वापरू नयेत, असत्य बोलू नये, आईविषयी अत्यंत नम्रता बाळगावी, त्रिकालस्नान करावे, असे त्यांचे सुरवातीस आचरण असे.

वयाच्या २१ व्या वर्षी रांगणगड येथील श्री. बाबाजीपंत गोडे यांच्या येसूबाई या मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला. त्यांच्या मनात विवाह करायचे नव्हतेच; पण वेदशास्त्री ओळकर व वेदशास्त्री उकिडवे ह्या गुरूंच्या शब्दाला मान देण्याकरिता त्यांनी होकार दिला. ही मुलगी सुरूप नसून, पायात थोडा अधूपणा होता. लग्नानंतर लगेच त्यांनी स्मार्ताग्नीची दीक्षा घेतली व गायत्री मंत्राचे एक पुरश्चरणही केले. पेडणे येथे वेदशास्त्री साधले यांच्याकडे ते ज्योतिषाचा अभ्यास करण्यासाठी गेले असता वडील वारले म्हणून त्यांना परत यावे लागले. त्यानंतर सर्व जबाबदारी त्यांच्यावरच पडली. घरात सासू-सुनेचे अगदी खडाष्टक होते. तरीही दत्तमहाराजांची **''तुझ्या आईला जप! तिला केव्हाही दुखवू नकोस!''** ही आज्ञा शास्त्रींनी तंतोतंत पाळली. त्यामुळे कित्येक प्रसंगी त्यांना आत्यंतिक मनस्ताप सहन करावा लागे. सौ. अन्नपूर्णाबाई खूपसे समजुतीने घेई; पण सासूच्या जाचाने तीही बेजार होई. वासुदेवशास्त्रींचे सर्व अध्ययन सदाचारपूर्वक शास्त्रशुद्ध आचरणाने झालेले असल्यामुळे तरूणवयातच त्यांना वेदमंत्राची सिद्धी प्राप्त झाली, हे वर सांगितलेच आहे. त्याचे प्रत्यंतर माणगावातल्या लोकांना येऊ लागले. सापाला जागच्याजागी खिळवून ठेवणे, दंगेखोर गाईला शांतपणे दूध देण्यास लावणे, पिशाच्चबाधा दूर करणे, असे मंत्रसिद्धीचे अनेक चमत्कार त्यांच्याकडून होत असत. अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह, सत्य आणि ब्रह्मचर्य हे पाच यम महाराजांनी नुसते आचरले नव्हते, तर पातंजली योगशास्त्रात सांगितल्याप्रमाणे देश-काल-परिस्थितीचा विचार न करता आचरल्यामुळे त्या पाच यमांना महाराजांच्या जीवनात सार्वभौम महाव्रताचे स्वरूप सहज प्राप्त झाले होते. ज्ञानेश्वरांनी वर्णन केलेल्या 'महाविदेहा' नावाच्या अत्युच्च स्थितीप्रत ते जाऊन पोचले होते. अंतर्बाह्य शुचिता पाळून केलेल्या वेदाध्ययनामुळे वेदमंत्र सिद्धी तर त्यांना प्राप्त होतीच; पण हळूहळू ते त्यामुळे साधकावस्थेतून अधिकाधिक उच्च पातळीवर जाऊ लागले. केवळ योगाभ्यासाने प्राप्त होणाऱ्या सिद्धी ह्या गौण आहेत; कारण आत्म्याच्या विकासासाठी ह्या सिद्धींचा मुळीच उपयोग होत नाही. त्यासाठी आत्मज्ञानाचीच सिद्धी हवी. या काळात महाराज योगसिद्धींच्याही पलीकडे गेले होते. याच काळामध्ये महाराज कधीकधी माणगावातून सावंतवाडीस अळवणी वैद्यांकडे येत असत. त्यावेळी 'विष्णुपंत आणावकर' या गृहस्थाची त्यांच्याशी गाठ पडत असे. यांच्या अंगात पूर्वजांपैकी एका अतृप्त, पण अत्यंत विद्वान अशा गृहस्थाच्या जीवात्म्याचा संचार होत असे. त्याच्या अंगात संचार झाल्यावर तो जे बोलत असे त्यावरून त्या समंधाचे ते आत्मनिवेदन अर्थपूर्ण, तसेच रहस्यपूर्णही असल्याचे जाणवत असे. महाराजांना त्या समंधाच्या शास्त्रज्ञानाचे मोठे कौतुक वाटे. या समंधासारखा ज्ञानी, प्रत्येक पदार्थमात्राचे भूत, भविष्य बिनचूक सांगणारा आत्मा याचवेळी भेटला. पुढे प्रथम संन्यास घेण्याच्या महाराजांच्या इच्छेला यानेच मोडता घातला व त्यावेळी त्याने, **''संन्यास घेण्यापूर्वीची करावयाची कार्ये अजून बरीच आहेत; संन्यास घेण्याची वेळ अजून आलेली नाही''**, असे म्हटले. त्या समंधाच्या परचित्तज्ञानाचे महाराजांना कौतुक वाटून श्री दत्तदेवांची आज्ञा नाही, असे समजून त्यांनी तेव्हा संन्यास घेण्याचा विचार सोडून दिला. पुढे महाराजांच्या मनात **''नरसोबाच्या वाडीला जाण्याची आपली इच्छा' पूर्ण कर!''** असा श्री दत्तगुरूंचा दृष्टांत झाल्याप्रमाणे आईची संमती घेऊन ते तेथे गेले. वाडीला महाराजांना दत्तप्रभूंनी श्री गोविंदस्वामींचे दर्शन घडवले. हे श्री

गोविंदस्वामी एक श्रेष्ठ अधिकारी व ब्रह्मनिष्ठ अशी महान विभूती होती. श्री दत्तगुरूंनी महाराजांना स्वप्नात दिलेला मंत्रोपदेश जाणण्याचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ होते. म्हणून अशा थोर विभूतीची दत्ताने महाराजांच्या 'गुरूस्थानी' योजना केली होती. पुढे त्यांनी महाराजांना मौनीमहाराजांकडे पाठवले. त्यांनीही महाराजांच्या मनात दुसऱ्यांदा आलेला संन्यास घेण्याचा विचार खोडून काढला. **''इतक्यात संन्यास घेण्याची गडबड नको''**, असे ते म्हणाले. परत माणगावी जाताना कागल येथे एका सोनाराने आपण होऊन दत्तमूर्तीची भेट त्यांना दिली. यथावकाश देऊळ होऊन तेथे त्या मूर्तीची स्थापना झाली. एकदा महाराज काही बोलून गेले की **''या घरात** (त्यांच्या स्वत:च्याच) **कोणी नांदणार नाही. तेथे धर्मशाळा होईल.''** पुढे महाराजांची वाणी खरी झाली. पण त्याची शिक्षा म्हणून महाराजांनी 'चांद्रायण' व्रतास प्रारंभ केला व अत्यंत कडक अशा या व्रतात, त्रिकालस्नान, मौन, नित्य चालू असलेले आन्हीक व दिनक्रम यांच्यात अजिबात खंड पडला नाही. शेवटी त्यांच्या शरीराचे अतोनात हाल होऊ लागले. या अवस्थेतही त्यांनी त्यांचा मनोनिग्रह कायम ठेवला आणि यात आपले देहपतन झाले तरी हरकत नाही, अशी भूमिका स्वीकारली. महाराजांवर साक्षात् अनुग्रह करावा, असे श्री दत्तप्रभूंच्या मनात आल्यावर त्या दिशेने भगवंताच्या लीला सुरू झाल्या. पातंजली योगशास्त्रातील 'प्राथमकल्पिक' आणि 'मधुमति' ह्या दोन भूमिका महाराजांनी केव्हाच ओलांडल्या. त्यामुळे त्यांचे शरीर आणि मन अत्यंत शुद्ध झाले होते. तसेच प्राणायामादी प्रक्रियांमुळे पार्थिव शरीर मलशून्य बनले होते. 'प्रज्ञाज्योती' या योगमार्गातील तिसऱ्या श्रेणीपर्यंत ते पोहोचले होते आणि 'विवेकख्याति' या श्रेणीतही त्यांनी लवकरच प्रवेश केला. या श्रेणीत सत्पुरुषांच्या चित्तातील रागद्वेषादिजनितक्लेश आणि मोह हे सर्वथा नाश पावलेले असतात. अविद्यानिर्मित असा हा संसार जीवन्मुक्तांच्या दृष्टीने संपलेलाच असतो. महाराज आता जीवन्मुक्तीकडे वाटचाल करू लागले. ते देवळातच राहू लागले. त्यांची प्रत्येक गोष्ट दत्तांच्या आज्ञेनुसार होत असे. सतत दृष्टांत देऊन श्री दत्तप्रभू आपले अस्तित्व त्यांना जाणवून देत आणि त्याप्रमाणेच महाराज वागत. त्यांच्या आयुष्याची सर्व सूत्रे श्री दत्तमहाराजांनी शेवटपर्यंत हलविली. म्हणून त्यांचे चरित्र हे पर्यायाने दत्तमहाराजांचे चरित्र, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. काही क्वचित् प्रसंगी महाराज मातोश्रींच्या आग्रहास्तव वागलेले दत्तगुरूंना खपत नसे. कधीकधी दत्तप्रभूंनाही महाराजांची परीक्षा म्हणा किंवा विनोद म्हणा करण्याची लहर येत असे.

या सुमारास महाराजांकडून एक विलक्षण घटना घडली. श्री दत्तप्रभूंनी महाराजांना मराठी गुरूचरित्राचे 'संस्कृत' भाषेत रूपांतर करण्याची आज्ञा केली. तसेच माध्यान्हकाळी एकदा श्री दत्तप्रभूंची आरती चालली असता महाराजांच्या मुखातून उत्स्फूर्तपणे आरती बाहेर पडू लागली. हठयोगातील प्राणायामाचे सर्व प्रकार, तसेच योगसाधना, योगमुद्रेतील अत्यंत महत्त्वाची व अतिशय अवघड अशी खेचरी मुद्रा आणि हठयोगात सांगितलेल्या धौति, नेति इत्यादी षट्क्रिया महाराजांनी आत्मसात केल्या होत्या. महाराज पूर्ण अंतर्ज्ञानी बनले होते. त्यांना भूत-भविष्य सर्व ज्ञात होते. ते आपणहूनच आलेल्या माणसास सर्व सांगत व मार्गदर्शन करीत. पातंजलीने सांगितल्याप्रमाणे प्रारब्धानुसार येणारी दु:खे ही भोगूनच संपवावी लागतात, हे जाणून महाराज त्याप्रमाणे वागत. त्यांनी नामस्मरण किंवा नामजपाला अधिक महत्त्व दिले. कित्येक संकटे त्यांनी नामजपाने

---

**श्रीमत्परमहंस वासुदेवानंद सरस्वतींप्रमाणेच श्री साईबाबांनीही नामस्मरणाचे महत्त्व भक्तांच्या हृदयात ठसवून दिले आहे. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन ह्या नवविधा भक्तींमधील तिसरी स्मरण ही अनुस्यूत, म्हणजेच व्यापून राहिलेली भक्तीच मुख्य आहे. कारण तिच्याशिवाय बाकीच्या आठही भक्ती शुष्कच होऊन जातील. म्हणून सर्व साधुसंतांनी, मुमुक्षू साधकांनी या भक्तीचाच आश्रय घेऊन परमपदाची प्राप्ती करून घेतली आहे.**

**स्मरण हे मनाचे कार्य आहे, तसेच ईश्वराप्रत पोचण्यासाठी ते एक अत्यंत सुलभ-सोपे असे साधन आहे. आपल्याला जी इष्ट देवता प्रिय असेल, तिचे नामस्मरण अथवा नामाचा संकल्प करून ते घेतल्यास फळ लवकर मिळते. हीच महत्त्वाची गोष्ट त्यांनी भक्तांच्या मनात पुन्हा पुन्हा ठसविली आहे.**

**बाबा नेहमी म्हणत 'साई साई' नित्य म्हणाल। सात समुद्र करीन न्याहाल॥ (अ. १३) जो जो मजलागी अनन्यशरण। विश्वासयुक्त करी मद्भजन। माझे चिंतन माझे स्मरण। तयांचे उद्धरण ब्रीद माझे॥ (अ. ३) साईसाईति नामस्मरण। करील सकल कलीमलदहन। वाणी श्रवणशतपापभंजन। एक लोटांगण घालीता। (अ. ३) देऊनिया संकटा तोंड। करीता साईस्मरण अखंड। होतील सकळ उपाय दुखंड। शक्तीही प्रचंड नामाची॥ (अ. २९) जया माझे स्मरण। निरंतर आठवण मज त्याची॥ (अ. ४०)**

**नामस्मरणाचे महत्त्व बाबांनी न्यायमूर्ती रेगेंना राधाकृष्णामाईंतर्फे कसे पटवून दिले, तसेच पारमार्थिक साधन कोणते असावे व जप कोणाचा व कसा करावा, हेही अप्रत्यक्षपणे कसे मनावर बिंबविले, तो प्रसंग 'राधाकृष्णामाई', ले. ना. वा. गुणाजी, श्री साईलीला, सप्टें., १९९० या लेखात फार सुंदररीतीने**

**वर्णन केला आहे. त्यावेळेस राधाकृष्णामाई न्या. रेगेंना म्हणाल्या की स्तोत्रे, भजने, गाणी ही आपापल्यापरीने चांगली असली तरी पुढील उन्नतीसाठी ती पुरी पडत नाहीत. बाह्य लोकांचे मन ती बरेच आकर्षून घेतात. तेव्हा जप हेच त्याकरिता साधन आहे.**

**श्री रमणभगवानांच्या उपदेश-सारांतील याविषयीचे श्लोकही हेच सांगतात. त्या दोन श्लोकांचा अर्थ असा: (१) शरीराचे कार्य पूजन, वाणीचे कार्य जप आणि मनाचे कार्य चिंतन ही क्रमाने एकाहून एक श्रेष्ठ आहेत. (२) वाचिक जप (मोठ्याने उच्चारला जाणारा जप), दुसऱ्यास ऐकू न जाईल (हलक्या स्वरात पुटपुटून) केलेला जप, म्हणजेच उपांशु जप, यांच्यापेक्षा मनातल्या मनात केलेला मानसिक जप (म्हणजे ध्यान) उत्तम होय!**

**श्री वासुदेवानंद सरस्वतींनी नामस्मरणाबरोबरच कोटी संख्या जपाचे महत्त्व सांगितले आहे. तर बाबांनी संख्या जपापेक्षा केवळ नामस्मरणाला (जे सहजसाध्य आहे) अधिक महत्त्व दिलेले आहे. थोडक्यात, परमपदप्राप्तीसाठी जाणारा हा सर्वात सुलभ व सहजसाध्य असा मार्ग आहे, हेच त्यांनी पटवून दिले आहे.**

---

निस्तरली. नामजपाने 'नैष्कर्म्यसिद्धी' अथवा 'मोक्षसिद्धी' प्राप्त होते. इतकेच नव्हे तर नामजपाने प्रारब्धरेषाही पालटून टाकता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले. **''सगुण भक्ती ही देहाभिमानियांना सुलभ व साध्य आहे व नामस्मरण हे तिचे सुलभ साधन आहे. आपणास जी इष्ट व प्रिय देवता असेल तिच्या नामाचा संकल्प करून ते ध्यावे म्हणजे फळ लवकर मिळते. कुंडलीतील द्वादशस्थानांपैकी प्रत्येक स्थान प्रत्येक कोटीने शुद्ध होते. नामानुष्ठानाने द्वादशस्थानांची शुद्धी झाली, म्हणजे मनुष्याची चिंता व दैन्य यापासून सुटका होते. जो आपला मंत्र असेल त्या मंत्राच्या अक्षरांप्रमाणे तितके कोटी जप करावा''**, असे त्यांचे सांगणे असे. संकटांमध्ये, उदाहरणार्थ: प्लेगची साथ गावात आली असता इतर उपायांबरोबरच **'श्री दत्त नामस्मरण'** अखंड करण्यास लोकांना सुचविले. ते म्हणत, **''नामस्मरण हे औषध नाही; पण नामस्मरणाने स्मरणशक्ती वाढते, तसेच नैतिक बळही वाढते.''** भूतबाधा नष्ट होण्यासाठीही त्यांनी लोकांना रोज घरी नियमाने नैवेद्य, वैश्वदेव आणि विष्णुसहस्त्रनामाच्या कमीतकमी बाराशे तरी आवृत्त्या कराव्या, असे सुचविले होते.

हळूहळू माणगावात श्री. साधले या गृहस्थांच्या कल्पनेप्रमाणे दुसरे दत्तमंदिर स्थापन झाले. वेदांचे, पंडितांनाही सहजासहजी न उलगडणारे अर्थ महाराजांना अगदी सहजपणे आपोआप उलगडत. महाराजांच्या ज्ञानदानाला व अन्नदानाला

---

**श्री साईबाबा कित्येकदा आपण स्वत: हंडीत अन्न शिजवीत आणि आपल्या हातांनी आग्रहाने गोरगरीबांना खाऊ घालीत असत. तसेच गहू आणून स्वत: दळीत व त्याची लापशी करून दीन–अनाथांना खाऊ घालीत असत.**

**श्री वासुदेवानंद सरस्वती महाराजांनीही अन्नदानाला फार मोठे महत्त्व दिले होते. त्यांच्या चरित्रात वर्णन आहे.... गरूडेश्वरी शेवटच्या चातुर्मासात यात्रा जमू लागली तेव्हा कामेही खूप वाढली. परंतु येणारी मंडळी आपला मोठेपणा बाजूला ठेवून तेथे वाटेल ती कामे करीत असत. श्री दत्तप्रभूंचा नैवेद्य झाल्यावर सर्वांचे जेवण होत असे. महाराजांच्या पुढे येणाऱ्या पैशांतून सर्व खर्च चालत असे. ''आज अमुक मंडळी येणार आहेत, अशा पद्धतीचा स्वयंपाक करा'', असे महाराज सकाळीच सांगत.**

**ह्या दोघांचा कृपाशीर्वाद असलेले अन्न कधी अपुरे पडत नसे.**

---

सीमाच नव्हती. लोकोपचाराची अखंड पाणपोयीच महाराजांनी माणगावी सुरू केली होती. अन्नपूर्णाबाईंनाही आता सहजसमाधीस्थितीचा अनुभव मिळाला होता. महाराजांनी आयुष्यातला पहिलाच व शेवटचा क्षण अर्पण केल्यावर अन्नपूर्णाबाईंना दिवस राहिले. एके दिवशी सावंतवाडीच्या नारोपंत उकिडवेंना महाराज माणगाव सोडून इतरत्र जाण्याची तयारी करीत आहेत, असे स्वप्न पडले. नारोपंतांकरवी दत्तप्रभूंनी महाराजांनाही सूचना दिली होती. आईचे जिव्हास्त्र तर तीक्ष्णच झाले होते, तेव्हा फक्त देव व आपले कुटुंब त्यांनी बरोबर न्यायचे ठरविले आणि महाराजांच्या सांगण्यावरून फक्त मंगळसूत्र अंगावर ठेवून तिने व महाराजांनी आईला वंदन करून माणगावाहून 'प्रस्थान' केले. यानंतर महाराजांचे या भागात पुन्हा कधीही येणे झाले नाही.

शके १८११ च्या पौषमासात महाराजांनी माणगाव सोडले. तेथून ते सहकुटुंब नरसोबाच्या वाडीस आले. महाराज दत्तमंदिरात व अन्नपूर्णाबाई नारोपंतांकडे उतरल्या. पुढे अन्नपूर्णाबाई प्रसूत होऊन त्यांना मुलगा झाला; पण त्याने लगेचच इहलोक सोडला. महाराजांना पुढे होणाऱ्या ह्या गोष्टी माहीत होत्याच. वाडीस आल्यानंतर गोविंदस्वामींचा निर्याण काळ जवळ आला, तेव्हा त्यांनी महाराजांना बोलावून दशोपनिषदे सांगितली व उपनिषदाच्या पोथ्या व शाळीग्राम त्यांना दिला. त्यानंतर त्यांनी महाराजांना मननातील रहस्य समजावून दिले व पूर्ण आशीर्वाद दिला. त्यांचा समाराधनाविधी महाराजांच्या हस्ते झाला. वाडीला वर्षभर राहिल्यावर दत्तआज्ञेप्रमाणे ते कुटुंबाबरोबर निघाले. कोल्हापूर, भिलवडी, औदुंबर, पंढरपूर, बार्शी असे करीत गोदावरीतिरी 'गंगाखेड' येथे आले. तेथे महाराजांना दृष्टांत

झाला की आजपासून चौथ्या दिवशी तुम्हाला दोघांनाही नेण्याकरिता आम्ही येऊ! त्यावर महाराज म्हणाले, ''मला संन्यास घ्यावयाचा असल्याने मी येणार नाही. तिला वाटल्यास न्या! माझी हरकत नाही.'' त्याप्रमाणे अन्नपूर्णाबाईंनी शके १८१३, वैशाख वद्य चतुर्दशी, शुक्रवारी आपली जीवनयात्रा संपविली. तेरा दिवसापर्यंत त्यांचे विधी करून चौदाव्या दिवशी महाराजांनी संन्यास घेतला. तीन वेळा याआधी त्यांनी संन्यास घेण्याचा प्रयत्न केला होता; पण देवाची आज्ञा नव्हती म्हणून सफल झाला नव्हता. त्यानंतर देवाच्या आज्ञेप्रमाणे महाराजांनी उज्जयिनी येथे 'नारायणानंद सरस्वती' यांच्याकडून दंड घेतला व त्यांचे नाव 'वासुदेवानंद सरस्वती' असे झाले. आता ते गुरूपदावर अधिष्ठीत होऊन आपल्या आयुष्यातील मुख्य कार्याला सिद्ध झाले. दंडग्रहण झाल्यावर महाराजांना श्री दत्तप्रभूंची आज्ञा झाली, **''सर्वत्र वर्णाश्रमलोप झालेला आहे; तरी सर्व भरतखंडात पायीच संचार करून सर्व लोकांना उपदेश करावा व धर्ममार्गाची स्थापना करावी.''** महाराजांनी श्री दत्तप्रभूंची आज्ञा नेहमीप्रमाणेच शिरसावंद्य मानून आपले संपूर्ण आयुष्य आर्य संस्कृतीचा आदर्श उभा करण्यात घालवले. धगधगीत वैराग्याने जीवन जगले. येथेच (उज्जयिनी) महाराजांनी पहिला चातुर्मास संपविला. त्यानंतर सारंगपूर, पिछोरा, खरेरा, काशी, जालवण येथून महाराज ब्रह्मावर्तास पोहोचले. येथे महाराज १॥ वर्षे राहिले. नाहीतर एका गावी चातुर्मासाशिवाय इतर वेळी ३ दिवसांपेक्षा अधिक रहायचे नाही व केवळ दक्षिणी ब्राह्मणाच्या घरचीच

**श्री वासुदेवानंद सरस्वती नियमाप्रमाणे तीन दक्षिणी ब्राह्मणांच्याच घरी भिक्षा मागत असत व ती भिक्षा एकत्र करून शिजवून खात असत. भिक्षेची सोय नसल्यास उपवास करीत. कित्येकदा तर त्यांना ४० दिवसही उपवास घडला होता.**

**श्री साईबाबा ५ घरी भिक्षा मागून आणत. बाबा जी भिक्षा मागत ती बहुधा शिजविलेल्या अन्नाची असे.**

भिक्षा घ्यावयाची, असे व्रत असे. ब्रह्मावर्तास ८ महिने महाराजांनी एका झोपडीत राहून तपश्चर्या केली व पुढे चातुर्मासात पुराण सांगितले. वेदांत, योग, ज्योतिष ह्या विषयांवर प्रवचने दिली. येथेच **गंगातिरी** महाराजांनी **'दत्तपुराण'** नावाचा ३॥ हजार श्लोकांचा एक संस्कृत ग्रंथ लिहिला. ब्रह्मावर्ताहून महाराज गोकुळ, मथुरा, वृंदावन करून शके १८१५, वैशाखी पौर्णिमेस हरिद्वारास आले. त्यावेळी तेथे असलेले शारदापीठाधीश शंकराचार्य यांना चातुर्मासात महाराजांनी उपनिषद्भाष्य ऐकविले व चातुर्मास संपल्याबरोबर ते बद्रीनारायणाच्या यात्रेस निघाले. हृषिकेश, प्रयाग करून पुढे जात असता दत्तप्रभूंनी नरनारायणाचे दर्शन देऊन तृप्त केले. हिमालयातील ह्या यात्रा चालू असताना अत्यंत थंडी व बर्फ यामुळे गंगोत्री येथे स्नान करताच भयंकर थंडीने महाराजांची हालचाल बंद पडली. त्यावेळी कोणीतरी आणून ठेवलेल्या शेगडीचा शेक मिळाल्यामुळे महाराजांच्या शरीरात ऊब आली. अग्निस्पर्श करू नये, हा महाराजांना दत्तप्रभूंचा आदेश होता. त्याविरूद्ध वागण्याचा प्रसंग महाराजांच्या संपूर्ण जीवनचरित्रात केवळ एकदाच नाईलाजाने घडला आहे. त्यानंतरचे दोन चातुर्मास महाराजांनी हिमालयात अज्ञातवासात कोठेतरी पार पाडले. हिमालयात याप्रमाणे दोन वर्षे संचार व चातुर्मास करून महाराज शके १८१८, वैशाख पौर्णिमेला हरिद्वार येथे आले व येथेच त्या वर्षीचा चातुर्मास केला. तेथून ते पुन्हा ब्रह्मावर्तास आले; पण यावेळी वाटेत दक्षिणी ब्राह्मण कोणी नव्हते, त्यामुळे बरेचदा उपवासच घडले. ब्रह्मावर्तास पोचेपर्यंत महाराजांना एकूण १८ उपवास घडले. ब्रह्मावर्त येथे महाराजांचा मुक्काम असताना एका अनधिकारी व्यक्तीने त्यांचे तीर्थ घेतले; तेव्हा महाराजांच्या अंगावर सर्वत्र फोड उठले. त्वचारोगाने पीडित नर्मदा नदीत ३ दिवस स्नान केल्यास शरीर पूर्ववत होईल, असा दृष्टांत झाल्यामुळे नर्मदातिरी जाऊन त्यांनी **'नर्मदालहरी'** या स्तोत्राने नर्मदेची स्तुती केली. ब्रह्माणी घाटावर महाराज पाय घसरून पडले, तेव्हा नर्मदा मातेने कुमारिका बनून मंत्रविलेले भस्म महाराजांच्या कमरेला लावले व ते बरे झाले. तेथून नेमावर, उज्जयिनी, ओंकारेश्वर, मंडलेश्वर, महेश्वर येथून मही नदीच्या तीरावर **पेटलाद** या गावी महाराज येऊन पोहोचले. तेथेच त्यांनी **'दत्तलीलामृतसिंधू'** हा प्राकृत एक हजार ओव्यांचा ग्रंथ लिहिला. चिखलदा येथे महाराजांनी लोकांना सगुण परमेश्वराची उपासना करण्याचे महत्त्व पटवून दिले. तेथून ते नर्मदातीरावरील तिलकवाडा येथे आले व येथील मारूतीमंदिरात त्यांचा शके १८२० चा चातुर्मास पार पडला. तेथून ते शिनोरास गेले. येथे महाराजांचे प्रसिद्ध शिष्य श्री गांडामहाराज यांना महाराजांचे प्रथम दर्शन

**परमार्थात प्रगती होण्याकरिता श्री साईबाबांनी उपासनी महाराजांना खंडोबाच्या देवळात ३ वर्षे ठेवून घेतले होते. अर्थात्, बाबांनी त्यांची अध्यात्मातील प्रगती पाहूनच त्यांना तसे सांगितले होते. अध्यात्मात अधिकाधिक प्रगती होत असलेल्या आपल्या काही श्रेष्ठ भक्तांनाही बाबांनी आपल्यापासून दूर ठेवून, सगुण-निर्गुण दोन्ही रूपातील भक्ती करून पारमार्थिक प्रगती व आत्मोन्नती साधून घ्यावी म्हणून अप्रत्यक्षरीत्या पोषक वातावरणच निर्माण केले होते.**

**श्री वासुदेवानंद सरस्वतींनीही त्यांचे एक प्रसिद्ध शिष्य श्री. गांडाबुवा यांना निकोदा येथील शिवालयात शंकरासमोर योगाभ्यास करण्यास सांगून खात्री दिली, श्रद्धेप्रमाणे शंकर परमात्मा फळ देतील.**

घडले. महाराजांनी त्यांना निकोदा या गावी राहून शंकरासमोर योगाभ्यास करण्याचा सल्ला दिला. तेथून महाराज निघाले व

गिरनारहून प्रभासपट्टण येथे आले. तेथे त्यांनी 'द्विसाहस्त्री गुरूचरित्रावर' संस्कृत टीका लिहिली. तेथून ते प्राचीसरस्वतीस आले. पुढे ते द्वारका (येथे त्यांनी टीका पुरी केली.), राजकोट, विरमगाव, सिद्धपूर, डाकोर, सिनोरा करीत चिखलदाला पोहोचले. तेथेच त्यांनी शके १८२२ चा चातुर्मास केला. त्यानंतर मंडलेश्वरी जाऊन तेथे त्यांनी उत्स्फूर्तपणे 'कृष्णावेणीपंचगंगा युतिस्थं' हे वाडीवर्णनात्मक स्तोत्र रचले.

महाराजांच्या जीवनातील प्रत्येक बारीकसारीक गोष्टींकडे प्रभूंचे अत्यंत बारकाईने लक्ष असे व महाराज प्रभूंच्या आज्ञेप्रमाणेच वागत, याचे खूपच पुरावे चरित्रात आढळतात. मंडलेश्वराहून उज्ञयिनीस व तेथून महत्पुरास येऊन तेथे महाराजांनी शके १८२३ चा चातुर्मास केला. त्यानंतर आलोट, सारंगपूर, भेलसा येथून ते जालवणास आले. तेथून पुन्हा ब्रह्मावर्तास तिसऱ्या खेपेस आले. तेथे शके १८२४-२५-२६ असे ओळीने तीन चातुर्मास पार पडले. यावेळी नेहमीप्रमाणे ताक न पिता पाणी प्यायले गेल्याने महाराजांना वरचेवर शौचास जावे लागे. त्यानंतर प्रत्येक वेळी तापलेली वाळू तुडवत गंगाप्रवाहापर्यंत जाऊन स्नान करून परत यावे, याप्रमाणे चालत असे. नंतर काही काळाने तेथे प्लेगची साथ आली. महाराजांनाही प्लेग झाला. त्यातच देवाच्या आज्ञेप्रमाणे महाराजांनी 'समश्लोकी गुरुचरित्र' लिहिले. त्याची रचना कशी असावी वगैरे गोष्टी देवांनी सांगितल्या. हा ग्रंथ ६७५० श्लोकांचा आहे. तो महाराजांनी ४५ दिवसांत पूर्ण केला. काशीस रहाणारे

---

**बाबांना गुरूत्वाचा अहंभाव कधीच नव्हता. ते शिष्यांकडून आपणहून कधीच सेवा घेत नसत. त्यांना कशाचीच गरज नसे. स्वत: जात्यावर दळण-कांडण करीत असत व गोरगरीबांना खाऊ घालीत असत. शिष्यांना ते ईश्वरासमानच (भगवद्रूप) मानीत असत. स्वत:ची पर्वा न करता इतरांचे संकट आपल्या अंगावर झेलून निजांगाने ते त्याचे निवारण करीत असत. त्यांची दुखणी-खुपणी अंगावर घेत असत. त्यांच्या ठिकाणी विषयाचा भोग नव्हता. भक्तांनी गाद्या-गिरद्या आणल्या, तरी ते साध्या तरटावरच बसत. दुपारची आरती झाल्यावर गाद्या व चांदीची प्रभावळ उचलून नेत असत व त्यानंतर दुसऱ्या दिवशीच्या माध्यान्हीच्या आरतीच्या वेळेपर्यंत बाबा तरटावरच बसलेले असत. अंगात पायघोळ कफनी असे. तिच्या चिंध्या होईपर्यंत ती वापरीत असत. दक्षिणा घेत; पण तिचा संग्रह ते करीत नसत. सकाळपासून सायंकाळपर्यंत जमलेली दक्षिणेची रक्कम वाटून टाकून ते सायंकाळपर्यंत खलास करून टाकीत असत. त्यांच्यापुढे भक्तांनी आणून ठेवलेल्या नानाप्रकारच्या खाण्याच्या वस्तूंपैकी किंवा फळफळावळ यापैकी कशासच ते (सहसा) शिवत नसत. देह गादीवर बसो, वा तरटावर पडो, त्या सुखदु:खाकडे बाबांनी कधीच लक्ष दिले नाही. त्यांना गृहासक्ती नव्हती. जात-पात-धर्म यांच्यातील द्वैतभाव त्यांच्याकडे कधीही नव्हता. त्यामुळे त्यांच्याकडे कोणाच्या प्रेमाची आसक्तीही दिसली नाही. कधीकधी ते अत्यंत कोपायमान होत असत. तेव्हा ते भयंकर उग्र दिसत असत. कधी कधी त्यांची कृती सामान्यजनांस वेड्यासारखीही वाटत असे. लोकांचे उद्धरण हेच त्यांचे ब्रीद होते. कसलीही आसक्ती त्यांना कधीच नव्हती; पण आपल्या वेड्या भक्तांच्या प्रेमाखातर, लोकसंग्रहास्तव ते भक्तांच्या इच्छेला मान देऊन, त्यांच्या मनातील भाव ओळखून, त्यांच्याकडून आपले कोडकौतुक पुरवून घेत असत.**

---

**दोन सत्पुरुषांच्या भेटी म्हणजे एक डोळ्यांचे पारणे फेडणारा परम आनंदाचा सोहळा असतो. तो ज्यांनी अनुभवला ते धन्य धन्य होत.**

**श्री साईबाबांच्या दरबारात अनेक सत्पुरुष बाबांच्या भेटीसाठी येऊन गेले. बाबा शिरडीत आल्यावर सुरवातीच्या काळात पहिले संत, ज्यांनी शिरडीस भेट दिली, ते रामानंद बीडकर महाराज होत. हे स्वामी समर्थ (अक्कलकोट) महाराजांचे शिष्य होते. त्यांनी १८७३ मध्ये बाबांची भेट घेतली.**

**दुसरे थोर सत्पुरुष बाबांच्या भेटीस आले १८८५ साली. ते आनंदनाथ महाराज होत. ते बाबांचे परमभक्त माधवराव देशपांडे, नंदू मारवाडी, दगडू भाऊ गायके यांच्याबरोबर बैलगाडीतून शिरडीस आले होते.**

**तिसरे संत म्हणजे पुणतांब्याचे प्रसिद्ध वैष्णवपंथी गंगागीर बाबा होत.**

**इसवी सन १९१० मध्ये संत राममारूती महाराज व श्री साईबाबांची भेट घडून आली. त्या दिवशी बाबा अत्यंत आनंदात होते. "उद्याचा दिवस सोन्याचा आहे. उद्या माझा भाऊ मला भेटावयास येणार आहे. उद्या माझी दिवाळी आहे रे!" असे म्हणून सारखे भजनच चालले होते. ते येण्यापूर्वीच बाबा नानासाहेब चांदोरकरांना म्हणाले, "बघ, मारूती येतो आहे." ते मशिदीत आले तेव्हा बाबांची आरती होत होती. दर्शने झाली. राममारूती महाराज बाबांचे दर्शन घेण्यास आल्यावर बाबांनी चालू असलेली आरती प्रथमच थांबविली. राममारूती महाराजांना बाबांनी घट्ट कवटाळून पोटाशी धरले. राममारूती महाराज आनंदाने उड्या मारू लागले व बाबांचे लाड करू लागले. अशाप्रकारे कडकडून भेटल्यावर बाबांनी त्यांना आपल्या अर्ध्या आसनावर बसवून पुन्हा आरतीस**

**प्रारंभ करण्यास सांगितले. त्यांना नंतर बाबांनी चांगले चौदा दिवस ठेवून घेतले.**

---

शांताश्रमस्वामी या वेळेस महाराजांसमवेत ब्रह्मावर्तावर ४ महिने राहिले. महाराजांनी येथे **'सप्तशती गुरूचरित्र'** हा सातशे ओव्यांचा प्राकृत ग्रंथ तयार केला. तेथून पुन्हा महाराज कालपी, पिछोरा, रावेर, भेलसा, होशंगाबाद करून नरसोबाच्या वाडीस आले. याच मुक्कामात महाराजांचे प्रिय शिष्य श्री दीक्षितस्वामी यांना महाराजांनी दंड दिला व त्यांचे नाव 'नृसिंहसरस्वती' ठेवले. याच मुक्कामात महाराजांचा प्रथम फोटो घेण्यात आला. तसेच याच मुक्कामात **''सदाचार न सोडता श्रींची सेवा करावी, म्हणजे सर्व संकटांतून पार पडाल. नित्य ब्रह्मकर्म झाल्यावर थोडेतरी गुरूचरित्र वाचल्याशिवाय अन्न घेऊ नका, म्हणजे काही कमी पडणार नाही,''** असा उपदेश महाराजांनी लोकांना केला. वाडीहून शिरोळ, मिरज, अक्कलकोट या मार्गाने महाराज गाणगापूरला आले. तेथे **संगमावर** श्री प्रभूंचे दर्शन झाले. या प्रवासात श्री कृष्णामाईने त्यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन दत्तप्रेरणेने **'कृष्णालहरी'** हे काव्य लिहून घेतले. पुढे हुमणाबाद, गंगाखेड, परळी-वैजनाथ, माहूर, औंढ्या नागनाथ इत्यादी गावे करून महाराज **'नरसी'** गावात राममंदिरात राहिले. या ठिकाणी **'दत्तचंपू'** हे काव्य तयार झाले. तेथेच चातुर्मास करून ते गोटेगाव, वाशिम, कारंजा, अमरावती, भेलसा, बासोदा, मुगावली इत्यादी गावे पालथी घालून पुन्हा ब्रह्मावर्तास पोहोचले. तेथे त्यांना एका परमहंसाचे दर्शन झाले. तेथून काशीस आल्यावर त्यांना श्री स्वयंप्रकाशस्वामी (हे ८० वर्षांचे होते.) यांनी त्यांची थोरवी जाणून साष्टांग नमस्कार घातला. तेथून ते जालवण, सिप्रि, इंदूर, ओंकारेश्वर करून बढवाईस आले व तेथेच शके १८२८ चा चातुर्मास केला. या चातुर्मासात ठिकठिकाणची अनेक भक्तमंडळी बढवाईस आली होती व तेव्हा चमत्कार असा झाला की या मंडळींपैकी जी काही आजारी मंडळी होती, त्यांचे रोग ती घरी जाईपर्यंत महाराजांनी रोखून धरले होते. एकदा महाराजांना ते प्रात:काळी स्नानाकरिता कृष्णातिरी आले असता श्री दत्तप्रभूंनी प्रत्यक्ष दर्शन दिले. त्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत महाराज समाधीस्थितीतच होते. तथापि, त्याचदिवशी दुपारी काही लोकांनी महाराजांना कालकुंद्रीकरांच्या घरी जाऊन भिक्षा केली, तेही पाहिले.

उपासनेबद्दल महाराज म्हणत **''ब्राह्मणाला गायत्री हाच मुख्य मंत्र असल्याने त्याचेच पुरश्चरण करावे व कार्यसिद्धी करून घ्यावी. आपल्या कुळातील कोणी पुरुषांनी जी देवता प्रसन्न करून घेतली असेल तीच आपली कुलदेवता. ती त्या कुळातील माणसांचे रक्षण करते.''**

यानंतर महाराजांनी वाडीहून कुरुंदवाड, तेरवाड, मलिकवाड, संकेश्वर, केंगेरी करून गुर्लहोसूर व त्यानंतर **शेषाचलपर्वतावर** येऊन कार्तिकस्वामींचे दर्शन केले व या ठिकाणी **'कुमारशिक्षा'** हा ग्रंथ लिहिला. तेथून पवित्र ठिकाणी दर्शन करीत ते **तंजावरला** आले व तेथेच शके १८२९ चा चातुर्मास केला. या ठिकाणी महाराजांनी **'संस्कृत समश्लोकी गुरूचरित्राची चूर्णिका'** लिहिली. तसेच **'कृष्णालहरी'**वर संस्कृत टीका लिहिली. त्यानंतर जंबुकेश्वर, कोटीलिंग, श्रीरंग, सत्यमंगल, नेलोर, त्रिपुरासूर ह्या गावांवरून महाराज **मुक्त्याला** आले व तेथे शके १८३० चा चातुर्मास झाला. याच मुक्कामात महाराजांनी **'युवशिक्षा' 'वृद्धशिक्षा'** व **'स्त्रीशिक्षा'** हे ग्रंथ लिहिले. त्यानंतर महाराजांना श्री दत्तप्रभूंनी दृष्टांत दिला, **''आता आपण सरळ काश्मिर प्रांतात चलावे.''** हे ऐकून महाराजांनी देवांना स्पष्ट सांगितले, ''आपण काश्मिरकडे जाऊ इच्छित नाही. वाटत असेल तर तंतुक किंवा गंगानुज यांच्याप्रमाणे कोठेही नेऊन ठेवा.'' महाराजांनी मग गोदावरीतीरावरच संचार केला. त्यानंतर पौष वद्यात पीठापूरला श्रीपाद श्रीवल्लभांच्या जन्मगावी महाराजांनी पादुकांची स्थापना केली. पुढे फिरत फिरत ते कालेश्वर येथे आले. तेथेही देवांच्या आज्ञेविरुद्ध महाराजांनी चातुर्मास करायचे ठरविले. तेव्हा श्री दत्तप्रभू अत्यंत कोपायमान झाले व उग्र स्वरूपात त्यांनी महाराजांना दर्शन दिले. तेव्हा महाराजांनी ''तव कोपा वंदू रूद्रा'' या अभंगाने प्रभूंची स्तुती करून त्यांना आळविले. मग प्रभूंचा राग शांत झाल्यावर ते त्यांच्या आज्ञेप्रमाणे पुढे निघाले. वैनगंगेच्या तिरी पवनी येथे पोहोचल्यावर महाराजांनी शके १८३१ चा चातुर्मास केला. त्यावेळेस आसपासच्या गावात प्लेगचा प्रादुर्भाव झाला होता; पण महाराजांच्या आळवणीवरून श्री देवांनी त्यांना अभय दिले होते, म्हणून ते असेपर्यंत प्लेग शिरला नाही; पण तेथून त्यांचे पाऊल

---

**सर्व सिद्धी प्राप्त असूनही श्री वासुदेवानंद सरस्वतींनी काय किंवा श्री साईबाबांनी काय त्यांचा उपयोग स्वत:साठी कधीच करून घेतला नाही. ते देहरूपाने या पृथ्वीतलावर अवतरले असले, तरी प्रत्यक्षात ते अमानवीयच होते. त्यामुळे देहासक्ती असण्याचे कारणच नव्हते. केवळ, सामान्यजनांना प्रपंचाच्या भवसागरातून तारून नेऊन परमार्थाच्या पैलतीराला पोहचविण्याचे कार्य त्यांनी स्वीकारले होते. त्याकरिताच त्यांनी आपल्या सिद्धींचा उपयोग केला. लोकांना नुसते चमत्कार दाखविणे, हा त्यांचा हेतू मुळीच नव्हता. तर त्यांचा उपयोग लोकांना उद्धरण्यासाठीच ते करीत असत.**

---

बाहेर पडताच आत्तापर्यंत थांबवलेला प्लेग जोराने गावात शिरला व खूप संहार झाला. पवनीहून उनकेश्वर, माहूर ह्या गावांवरून महाराज वाडीकडे निघाले, तेव्हा **''तेथे न जाता मागे फिर!''** अशी देवांची आज्ञा झाली; पण त्यांनी त्याकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांना संधिवाताचा भयंकर त्रास सुरू झाला.

तरीही ते त्याच स्थितीत रोज १०-१२ मैल चालतच राहिले. तेव्हा "तू माझे ऐकत नाहीस, तर गोदावरीच्या पलीकडे जाताच तुझ्यावर 'वॉरंट' निघेल", असे देवांनी बजावले. पुढे आजेपूर, रेजापूर, गंगामसले ह्या गावांवरून महाराज निघाले असता त्यांना शौचातून रक्त पडण्यास सुरूवात झाली. तरीही त्यांनी प्रवास चालू ठेवला. पौष शुद्धात ते वाडीस पोहोचले. या मुक्कामात महामारीच्या सार्वत्रिक उपद्रवापासून वाचण्यासाठी त्यांनी श्री दत्त पादुकांवर अभिषेक करण्यास सांगितले. ते म्हणाले, "मृत्यूरूप परमेश्वराच्या महामारी इत्यादी शक्ती आहेत. मृत्यूरूप परमेश्वराला अभिषेकाने शांत केले की त्या शांत होतात." त्याप्रमाणे लोकांनी महारूद्राभिषेक केला व महामारी शांत झाली. तेथून "शृंगेरीस चलावे" या देवांच्या आज्ञेवरून ते पंचगंगा ओलांडून पलीकडे पोहोचले. तेथून टाकळी, बेळगाव, गुर्लहोसूर ह्या गावांवरून ते पुढे धारवाड, हावनूर (तुंगभद्रा तीरावर) करून तुंगभद्रा, वर्धासंगम, कुपेलूर शृंगेरी, बनवासी, गोकर्ण, गलगली करीत कृष्णातीराने मलप्रभा कृष्णासंगमावर आले. पुढे कोपरगाव, कडलूर येथून कुरूगड्डी या श्रीपाद श्री वल्लभांच्या स्थानी येऊन पोहोचले. तेथेच शके १८३३ चा चातुर्मास झाला. तेथेच गुरूद्वादशी करून पुढे निघाले. तुळजापूरास जाऊन त्यांनी जगदंबेचे दर्शन केले. पुढे वांजरातीरावर दत्तजयंती साजरी करून ते गोदातिरी आले. तेथून पुढे परळीवैजनाथाचे दर्शन घेऊन पौषाच्या सुरवातीस ते राजूर या गावी पोहोचले. येथे महाराजांचे बंधू सीतारामबुवा यांनी महाराजांच्या अनुज्ञेने संहितास्वाहाकार केला. तेथून पिंपरीवरून महाराज आवंढ्यानागनाथाच्या दर्शनास गेले. हे १२ ज्योतिर्लिंगांतील एक महत्त्वाचे मुख्य असे स्थान आहे. तेथून उटी, बामणी, हिंगोली, गोपेगाव, मंजीरथ, पैठण, दौलताबाद, वेरूळ ह्या गावांवरून इंदूर संस्थानातील चिखलदा या गावी येऊन ते पोहोचले. तेथे महाराजांनी शके १८३४ चा चातुर्मास केला. तेथून नर्मदातिरी असलेल्या कातरखेडा येथे शूलपाणीस वंदन करून महाराज गरूडेश्वरी आले. तेथे भिल्लाच्या रूपात श्री दत्तप्रभूंनी त्यांना दर्शन दिले. शके १८३५ चा चातुर्मास गरूडेश्वरीच झाला. हाच त्यांचा शेवटचा चातुर्मास होय! महाराज गुरूडेश्वरी आले, तेव्हा तेथे भिल्ल लोकांची फक्त थोडीशी वस्ती होती. पुढे महाराज येताच परिस्थिती बदलत गेली. वैशाखाच्या आरंभी श्री. रामशास्त्री प्रकाशकर महाराजांच्या दर्शनास आले. त्यांनी महाराजांना सांगितले, "येथून आता आपले कोठे जाणे होणार नाही." गुरूडेश्वरी महाराजांनी 'आत्मानात्म विचार' व चित्तसद्बोध नक्षत्रमाला' हे प्राकृत ग्रंथ तयार केले. सौ. महाराणीसाहेब इंदिराबाई होळकर यांची महाराजांच्या ठिकाणी फार मोठी निष्ठा होती. त्यांच्या लग्नासाठीही महाराजांकडून आशीर्वाद मिळाला होता. त्यांनी गरूडेश्वर येथे नर्मदेस घाट बांधला आहे. बडोदे येथील एका सोनाराने बनवून आणलेल्या दत्तमूर्तीची श्री. रामचंद्रशास्त्री प्रकाशकर यांनी आश्विन शुद्ध नवमीला श्री. धोंडोपंत कोपरकर यांच्या हस्ते प्रतिष्ठापना करविली व ब्राह्मणांच्याकडून त्याची पूजा सुरू झाली. नंतर दत्तप्रभूंच्या सांगण्यावरून ही मूर्ती पर्णकुटीमध्ये एका लहानशा सिंहासनावर ठेवून या मूर्तीची यथाविधी अर्चा करण्यात आली व त्रिकाल पूजा इत्यादी उपासना चालू झाली. एक दिवस सकाळी भाष्यपाठ संपल्यावर महाराज म्हणाले,

**"आजपर्यंत जो प्रत्यक्ष उपदेश केला व ग्रंथ लिहिले त्या सर्वांचे सार सांगावयाचे आहे. मुक्तीचा लाभ करून घेणे, हे मनुष्यजन्माचे मुख्य कर्तव्य आहे. त्याकरिता प्रथम मन स्थिर व्हावे, या उद्देशाने, वर्णाश्रमाप्रमाणे आपापल्या धर्माचे आचरण शास्त्रानुसार झाले पाहिजे. वेदांताचे श्रवण, मनन, निदीध्यासन नित्य करावे. मुख्यत: श्रवणाकडे अधिक लक्ष द्यावे. त्यामुळे मनातील आसक्ती कमी होईल. सात्विक प्रवृत्तीमुळेच मानवाची उन्नती होते. अशी प्रवृत्ती होण्याकरिता आपला आहार हितकारक, मर्यादित आणि शुद्ध ठेवण्याकडे लक्ष दिले पाहिजे.**

---

**गावात महामारी किंवा पटकीची – वाख्याची साथ (ही साथ बहुधा शिरडी गावात पाटाचे पाणी येण्यापूर्वी श्री रामनवमीच्या उत्सवानंतर येत असे; कारण त्या सुमारास लेंडी ओहोळात पाणी नसे. ओहोळात पाणी नसल्याने शिवेच्या ओढ्यातच कपडे वगैरे धुण्यात येत असत.) आल्यावर, हे वाख्याचे जंतु उत्पन्न झाल्याचे बाबांना अंतर्ज्ञानाने कळत असे व त्यावर ते योग्य इलाज करीत असत. म्हणजे ज्या ज्यावेळेस ही वाख्याची साथ गावात येत असे त्या त्यावेळेस बाबा स्वत: जात्यावर गहू दळून ते पीठ शिवेच्या ओढ्यावर टाकत असत आणि तसे करण्याचे प्रयोजनही सांगत असत.... "पटकी वगैरे ही क्षुद्र किंवा हलकी दैवते आहेत. त्यांच्या प्रतिबंधनासाठी अथवा शमनासाठी आणि नाशासाठी, प्रथम त्यांना शांत व तृप्त करावे लागते. तसे ने केल्यास "तुझ्या गावात पराड मुडदे पाडीन" अशी त्या देवतांची धमकी असते", असे ते म्हणत असत. याचसाठी पटकीची साथ येण्यापूर्वी श्री साईबाबा शिवेच्या ओढ्यावर पीठ टाकवीत. काही भक्तांना विशिष्ट प्रकारचा काढा शरीरशुद्धीसाठी देत, जेणेकरून ती साथ त्यांना बाधू नये. पीठ टाकल्यावर ते पाणी न पिण्याबद्दल त्यांची सक्त ताकीद असे.**

**उदरनिर्वाहाकरिता व्यापार, शेती, नोकरी कोणताही धंदा केला तरी वेदविहीत कर्म व गुर्वाज्ञापालन कधीही सोडू नये. स्वकर्म केले तरच अंत:करण शुद्ध होते. अंत:करण शुद्ध झाले तर उपासना स्थिर होते. उपासना स्थिर झाली तर मनाला शांती मिळते. मनाची गडबड थांबली म्हणजे आत्मज्ञान होऊन मोक्षाचा लाभ होतो.... याप्रमाणे जो वागेल तो शेवटी पूर्ण सुखी होईल.''**

यानंतर शके १८३६च्या वैशाखात महाराजांना पूर्वीचा अतिसाराचा त्रास पुन्हा सुरू झाला. रोगाने उचल खाल्ली व महाराज दिवसेंदिवस क्षीण होत चालले. भक्तांनी महाराजांना बरे वाटावे म्हणून गुरूपादुकांवर संततधार अनुष्ठान आरंभिले. महाराज त्यांना म्हणाले, ''उगीच देवाला त्रास देऊ नका. हे शरीर अल्पावधीतच पडणार आहे. त्याकरिता औषधोपचाराचे कारण नाही. जन्मापासून ज्या वैद्याला धरले आहे तो यावेळीही आहेच. त्याच्या इच्छेप्रमाणेच होईल.'' त्याचप्रमाणे मूर्तीच्या व्यवस्थेबद्दल ते म्हणाले, ''आम्हाला येथेच राहावयाचे आहे. मूर्ती कोठेही पाठवू नये.'' शेवटी महाराज महिनाभर पडूनच होते. या काळात ते नेहमी ध्यानात निमग्न असत. एखादा अपवाद वगळता सबंध दिवसात ते केवळ ५-१० वाक्येच बोलत. यानंतर शेवटी भीष्माचार्यांनी म्हटलेले श्लोक महाराजांनी सर्वांना म्हणून दाखविले.

प्रथम निर्याणाचा दिवस ज्येष्ठ वद्य अष्टमी हा होता; पण महाराजांची त्या दिवशी जाण्याची इच्छा नव्हती. अष्टमी लागताच महाराज ३ तास समाधीमग्न होऊन बसले. यावेळी त्यांच्या शरीरात उष्णता फार वाढली होती. सारखे थंड पाणी शिंपडावे लागे. मुखाने सारखे ''दत्त दत्त'' असे चालू होते. इतरांनाही ते दत्तनाम घेण्यास सांगत होते. अमावास्या संपून प्रतिपदा लागताच महाराज सिद्धासन घालून देवासमोर बसले. देवाकडे पाहून त्राटक केले व श्वासाचा निरोध करून दीर्घ प्रणवोच्चार करीत महाराजांनी देहविसर्जन केले आणि ते ब्रह्मस्वरूपी लीन झाले. त्यावेळी शके १८३६, आषाढ शुद्ध प्रतिपदा, मंगळवार, आर्द्रा नक्षत्र, उत्तरायण होते व रात्रीची ११ वाजण्याची वेळ होती. दुसऱ्या दिवशी महाराजांच्या पुण्यमय शरीरावर भक्तमंडळींनी वेदोक्त मंत्रांनी अभिषेक केला व षोडशोपचारांनी पूजा केली. बेल, तुळशी, फुले यांच्या माळा महाराजांच्या गळ्यात घालून, फुलांच्या आसनावर बसवून त्यांचे शरीर भक्तांनी नर्मदातिरी नेले व तेथेही त्याची पूजा करून ते परमपवित्र मंगल शरीर शेवटी नर्मदामातेच्या जलात सोडून दिले.

महाराजांचे लौकिक व लोकोत्तर चरित्र येथे संपते.

दत्तप्रभूंची कृपा होऊन त्यांच्याकडून धर्मप्रसाराची आज्ञा झाल्यावर महाराजांनी आसेतु हिमाचल पदभ्रमण करून लोकांना धर्ममार्गाचे प्रत्यक्ष शिक्षण देण्याकरिता आणि परोपकाराकरिता आपली काया चंदनाप्रमाणे कणाकणाने झिजवली आणि कित्येक हजारो मानवांना इहपरसौख्यप्राप्तीकरिता सन्मार्ग दाखवून लोकसंग्रहाचा आदर्श संसार करून दाखविला. श्री दत्तमहाराजांच्या कृपेमुळे महाराज एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी केवळ १-१॥ तासातच पोचत असत. अशी कित्येक उदाहरणे त्यांच्या चरित्रात आढळतात. महाराजांनी आपल्या पदभ्रमणात सर्व महत्त्वाच्या नद्यांच्या तिरी वास केला. त्या नद्यांनीही मातांच्या स्वरूपात त्यांना वेळोवेळी दृष्टांत दिला. प्रत्येक ठिकाणी महाराज तिथल्या देवळात राहात असत. या पदभ्रमणात त्यांनी ठिकठिकाणी दत्तमंदिरे बांधली, उत्सव साजरे केले, महागजर केले, कोटींचे नामजप केले, पारायणे केली, प्रवचने केली, मोठमोठे, असामान्य, अलौकिक, दिव्य ग्रंथ लिहिले. (याबाबतीत महाराज म्हणत की कागद पुढे घेतला की लिहायला सुरवात करण्याआधीच मला कागदावर आपोआप उमटलेली अक्षरे दिसत.) तसेच अनेक दिव्य पुरुषांच्या, महात्म्यांच्या भेटी घेतल्या, त्यांचे दर्शन घेतले; शिवाय कित्येक महात्म्यांच्या समाधीस्थानांचे दर्शन व त्यांच्या पादुकांचे दर्शन घेतले, पादुकांचीही स्थापना केली. कित्येक श्लोक त्यांना आपोआप स्फुरले. हे सर्व करीत असतानाच लोकांना सन्मार्ग दाखविण्याचे, तसेच ब्राह्मणांना आचारधर्म शिकविण्याचे कार्य केले. त्यासाठी कठीण व अत्यंत अवघड अशी व्रते केली. अनेकांवर अनुग्रह केले, पिशाचबाधेतून कित्येकांना मुक्त केले, तर कित्येकांना त्यांच्या आशीर्वादाने संतती प्राप्त झाली. कित्येकांना सुखी होण्यासाठी जपमंत्र सांगितले. कित्येकांना श्लोक लिहून दिले. महाराजांना भूत, भविष्य आणि वर्तमान यांचे पूर्ण ज्ञान होते. हिंदू लोकांप्रमाणे महाराजांचे काही पारशीही भक्त होते. काही मुसलमानही त्यांचे भक्त होते. एकदा रोगपीडित मुसलमान त्यांच्याकडे गेले असता त्यांना औषध व कुराणातील मंत्र सांगून महाराजांनी त्यांना

---

**श्री साईबाबांचा अधिकार विश्वव्यापी होता. झपाटलेली पुष्कळ माणसे त्यांच्याजवळ येत असत आणि आपल्या सामर्थ्याने ते त्यांस बरेही करीत असत. अशा पूर्ण स्वामित्वाच्या अधिकारी पुरुषांचा वरदहस्त माथ्यावर पडल्यावर भुताखेतांसारख्या क्षुद्र योनीचे काही तरी चालणे शक्य आहे काय ! त्यांच्या वरदहस्तातच त्या त्या व्यक्तीस ''मी तुझा सांभाळ करण्यास समर्थ आहे'', असे आश्वासनच मिळत असे.**

---

**श्री साईबाबांनी अब्दुलबाबांना कुराणातील गहन कलमांचा अर्थबोध करविला होता.**

---

बरे केले. महाराजांचा निसर्गावरदेखील अधिकार चालत असे. याचीही काही उदाहरणे त्यांच्या चरित्रात पहावयास सापडतात. एकदा नर्मदेच्या पुराचे पाणी बरेच चढले तेव्हा नर्मदेवर जाऊन ''माते, आता आपला पूर वर येऊ नये'', असे म्हणून महाराजांनी आपला दंड नर्मदाजलात

**सद्गुरूंच्या अलौकिक सामर्थ्याची थोरवी काय वर्णावी! पंचमहाभूतांवरही त्यांची सत्ता चालत असते. याची उत्तम उदाहरणे श्री साईसच्चरितात आपल्याला पहावयास सापडतात. मेघावर, अग्नीवर बाबांची सत्ता चालत असे.**

बुडविला आणि दंडस्पर्श होताच पाणी हळूहळू कमी झाले. महाराजांची अशी दिव्यधारणा शक्ती पाहिल्यावर कितीही तर्ककर्कश माणूस असला तरी त्याचा माफक बुद्धीवाद महाराजांच्या पुढे फिका पडत असे. सगुण उपासनेवर व नामजपावर त्यांचा सदोदीत भर असे. ''सगुण रूपाचा देवाला अभिमान असतो. सगुण भक्ती केल्यावाचून ब्रह्मसाक्षात्कार होणार नाही'', असे त्यांचे लोकांना सतत सांगणे असे. श्री दत्तप्रभूंनी त्यांना आजन्म सोबत करून व त्यांच्या जीवनाचे सूत्रधार बनून त्यांचे चरित्र स्वत: घडविले.

भगवान रामकृष्ण परमहंसांनी स्वत:संबंधी म्हटल्याप्रमाणे महाराजांचीही अवस्था केवळ 'उदाहरणादाखल' अशीच होती, हे त्यांच्या चरित्रावरून लक्षात येईल. एकदम गुप्त होणे, एकदम दूर जाणे इत्यादी अतार्किक चमत्कार त्यांच्याकडून घडत असत. आपण ह्या शक्तींचा

**श्री साईबाबा त्रिकालज्ञानी होते. त्यांना सर्व सिद्धी प्राप्त होत्या. म्हणूनच त्यांचे एक परमभक्त सांताक्रूझचे पाश्चात्य विद्यापारंगत असलेले ॲडव्होकेट श्री. बाळाराम धुरंधर शिरडीस पोहोचण्याच्या आधीच बाबा आनंदाने ''आज माझे दरबारचे लोक येथे येणार आहेत'', असे म्हणाले. ते मशिदीत आल्यावर चरणवंदन वगैरे झाल्यावर बाबा पुन्हा सर्वांस म्हणाले, ''पहा, मी म्हटली होती ती माझ्या दरबारची माणसे आली की नाही!'' नानासाहेब चांदोरकरांची एकदा नंदुरबारहून पंढरपूरला बदली झाल्याचा हुकूम आला म्हणून ते शिरडीलाच प्रथम पंढरपूर मानून बाबांच्या दर्शनासाठी सहकुटुंब निघाले. त्यांनी कोणाला कळवलेही नव्हते किंवा पत्रही टाकले नव्हते; पण बाबा येथे मशिदीत बसून उल्हसित मनाने म्हाळसापती, काशिराम शिंपी व आप्पा शिंदे यांच्यासमवेत.... पंढरपुरला जायाचें जायाचें.... तिथेंच मजला राहयाचें.... तिथेंच मजला राहयाचें.... घर तें माझ्या रायांचे.... असे भजन करू लागले.**

**श्री साईंचे एक थोर जुने परमभक्त श्री. सगुण मेरू नाईक हे, बाबांच्या दर्शनापूर्वी, ते सुमारे १७-१८ वर्षांचे असताना काहीतरी कामधंदा करावा, या उद्देशाने घर सोडून निघाले असता श्री वासुदेवानंद सरस्वतींशी गाठ पडली. तेव्हा ते नरसोबाच्या वाडीस होते. ते सगुण मेरू नाईकांना नेहमी म्हणत, ''अरे, तुला कोणी बोलावं! तू तर मोठ्या दरबारचा माणूस आहेस!'' त्यावेळी या सत्पुरुषाच्या गूढ बोलण्याचा अर्थ त्यांना कळला नाही. पुढे बाबांचे दर्शन झाले आणि बाबांनी त्यांना पूर्वीच्या घटनांवरून खूण पटवून दिली आणि बाबा त्यांना म्हणाले, ''तू मला सांभाळ, मी तुला सांभाळीन.''**

उपयोग फक्त तीन वेळा केला, असे महाराज म्हणत असत.

अशा या लोकोत्तर पुरुषाचे चरित्र भव्य, दिव्य, अलौकिक, असामान्य, तेजस्वी व चमत्कृतीपूर्ण घटनांनी भरलेले आहे. केवळ महाराष्ट्रालाच नव्हे, तर सर्व भारतवासियांना या तेजस्वी महत्पुरुषाचा अभिमान आहे.

आता आपण श्री. विद्याधर भागवत यांच्या 'प्रस्थान' व 'योगी' ह्या पुस्तकांकडे वळू.

त्यांच्या 'प्रस्थान' या कादंबरीचा विषय एका महायोगी, सिद्धपुरुषाच्या आयुष्याचा पूर्वार्ध, म्हणजेच 'गृहस्थाश्रम' हा आहे.

'प्रस्थान'ची सुरवातच लक्षवेधी झाली आहे. एका बालविधवेच्या बद्दल महाराजांनी एक विचित्र निर्णय घेतला होता. तो सिद्ध करण्यासाठी ते रांगणगडावर निघाले होते. तिचा नवरा सर्पदंशाने मेला होता. कुणीसे महाराजांना त्याला जिवंत करण्यास सांगत होते. मंत्रसिद्धी प्राप्त झाल्यामुळे महाराज कोणत्याही, म्हणजे नाग किंवा गाय, तसेच मनुष्यप्राणी आणि निसर्ग यांच्यावर आपला अधिकार दाखवू शकत असत. याचा अनुभव यापूर्वी लोकांना आल्यामुळे आणि **'प्रत्यक्ष दत्त'** त्यांच्या सदैव सहवासात असतो, याची कल्पना आल्यामुळे भोळीभाबडी जनता महाराजांना त्यास जिवंत करण्यास सांगत होती. त्यावर महाराज म्हणाले, ''मंत्राने प्राण आणता येत नाहीत. तो जिवंत असेल तरच विष उतरविता येते. मेलेल्यास जिवंत करण्यास मी परमेश्वर नाही; आणि परमेश्वर झाला म्हणून मेलेल्यास जिवंत करणार थोडाच!'' संत हेच प्रत्यक्ष परमेश्वरावतार असले तरी आपला 'गुरू' म्हणून सदैव ते 'त्याच्याकडेच' बोट दाखवितात. असो. त्यानंतर ती बालविधवा नाहीशी झाली. ती परत आली तेव्हा तिच्यात बदल झाला होता. तिला मिसरूड व दाढी फुटली होती. त्यासाठी ब्राह्मणांनी सांगितलेला गृहशुद्धीकरण यज्ञाचा मार्ग ऐकून महाराज म्हणाले होते, ''शुद्धीकरण दुसऱ्याच गोष्टीचे करायला हवे.'' ते इतरांच्या विरूद्ध असल्यामुळे वेदशास्त्री उकिडवेंनी त्यांना गडावर समक्ष बोलणी करण्यास आमंत्रण दिल्याचा प्रसंग आहे. ती बालविधवा नंतर पुरूष झाली. या बालविधवा गोदावरीचे 'गोविंद' असे

नामकरण महाराजांनी केले. त्यानंतर काही काळ महाराजांच्या घरी त्याने अध्ययन केले.

कादंबरीतील भाषा ही त्या काळातली, सुमारे शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीची, आता नामशेष होत जाणारी वऱ्हाडी ब्राह्मणी भाषा आहे. 'कोकण केंद्रित' अशी ही कादंबरी आहे. त्यामुळे कादंबरी वाचताना आपण त्या काळात गेल्याचा भास होतो आणि प्रसंग जसाच्या तसा डोळ्यांपुढे साकार होऊ लागतो. एखादा प्रसंग रंगवताना लेखक लीलया महाराजांच्या पूर्वायुष्याकडे वळून बघतो. त्यामुळे त्या प्रसंगाच्या अनुषंगाने त्यांच्या पूर्वायुष्याचा चित्रपटही हळूहळू उलगडत जातो. संन्यासी वृत्तीच्या माणसाचे कौटुंबिक जीवन कसे असेल, याची जिज्ञासा असल्याने लेखकाने महाराजांच्या चरित्राचा त्या दृष्टिकोनातून अभ्यास केलेला जाणवतो. ''पिलक्या गो!'' असे त्यांच्या मांजरीला हाक मारून, प्रत्यक्ष पत्नीशी संभाषण न करता त्या मांजरीशी ते संभाषण करीत. ती संभाषणे खरोखर आदर्शवादाचा एक उत्कृष्ट नमुना होतील. तसेच सासू-सुनेचे घरात होणारे सततचे वाद, सासूची वरचढ बाजू, तिचे सुनेवर सतत होणारे असह्य वाक्प्रहार, त्यातून अन्नपूर्णेची, विशेषतः महाराजांची होणारी असह्य कुचंबणा, इतकेच काय, पण त्यामुळे होणारी 'आग्रयणेष्टि' त्यांना एकट्यानेच पत्नी असून करावी लागली होती. तरीही श्री दत्तांच्या आज्ञेप्रमाणे 'मातृदेवो भव' याचे तंतोतंत पालन, त्यातूनच त्यांची संन्यास स्वीकारण्याकडे होणारी वाटचाल, त्यांची ग्रंथनिर्मितीतील प्रगती आणि वेदमंत्रांच्या सहाय्याने श्री दत्ताने लहान-मोठ्या प्रसंगाच्या वेळी त्यांच्याकरवी केलेले चमत्कार इत्यादींचा सुंदर मेळ लेखकाने या कादंबरीत घातला आहे. तसेच एकदा श्री दत्तमहाराजांची आज्ञा पाळावी की आईचे ऐकावे, अशी महाराजांची द्विधा मनःस्थिती झाल्यावर दत्तावर भार टाकून ''योग असला तर प्रवासातही हे दत्तपुराण तयार होईल'', असे म्हणून आईला होकार देऊन टाकला. तिला गोकर्णाला घेऊन जायचे होते तो हा प्रसंग आहे. प्रवासात त्यांच्या पायाला काही चावले व वाडीला पोचेपर्यंत त्यांचा पाय सुजून विष वरवर चढू लागले, तेव्हा ''माझ्यामुळेच हे सर्व रामायण घडलं'' म्हणून आई रडू लागली. सुनेवर सतत वाक्प्रहार करणारी ती, आपल्या मुलासाठी हळवी झाली व त्या दोघांना अर्ध्या वाटेवरून परत यावे लागले. गोकर्णाला जायची देवाची आज्ञा नाही, ते 'दत्तपुराण' आता पुरे करायला हवे, असे लक्षात येताच महाराजांनी दत्तपुराणास आरंभ केला. हा सर्व प्रसंग मोठा हृद्य आहे. फार सुंदररीतीने तो लेखकाने कादंबरीत खुलवलेला आहे.

महाराजांची बऱ्याच वेळा 'दत्तप्रभू की आई' अशी होणारी दोलायमान स्थिती, घरच्या वातावरणाचा महाराजांच्या मानसिक संतुलनावर होणारा परिणाम, त्यामुळेच की काय एका परीने संन्यास घेण्यास तयार होणारे पोषक वातावरण, ह्या सर्वांबरोबरच घरात आल्यापासून दबली गेलेली अन्नपूर्णा, सासूच्या वर्चस्वाखाली असल्यामुळे सतत दडपणाखाली असणारे तिचे मन, मन मारून रहायची तिने स्वतःला लावून घेतलेली सवय, पतीच्या शास्त्रशुद्ध, कडक आचारविचारसरणीमुळे पतीचा सहवास मिळण्यासाठी, त्याच्या एका नजरेसाठी, त्याच्या एका आपल्यासाठी आणि केवळ आपल्यासाठीच मारलेल्या हाकेसाठी होणारे तिच्या मनाचे आंदोलनही कादंबरीत फार सुंदर व्यक्त झाले आहे. या वातावरणातच दिवस जात असताना तिची अध्यात्मात हळूहळू प्रगती होत चाललेली आढळते. ती स्वेच्छेने, पतीच्या वचनावर विसंबून, पती हाच देव, तोच 'श्री गुरूदत्त' या भावनेने त्याच्याबरोबर माणगावाहून प्रस्थान करते. तिचे जीवन हे समर्पित जीवन होते, हे दाखवून तिला न्याय देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. विशेषतः महाराजांनी मौनव्रत सोडताना 'आपल्या नावाचा उच्चार' त्यांनी प्रथम करावा यासाठी तिच्या जीवाची होणारी घालमेल आणि तिला हाक मारल्यावर तिचे ते मोहरणे, हा प्रसंग मनाला चटका लावून जातो.

---

बाबांचे एक थोर परमभक्त श्री. माधवराव देशपांडे एकदा नागपूर वऱ्हाड प्रांताकडून शिरडीस परत आले. द्वारकामाईत प्रथम बाबांच्या दर्शनास आले. आजूबाजूला बरीच मंडळी बसली होती. ''काय शामराव, कोठे-कोठे गेला होतास?'' असे बाबांनी विचारले ''देवा! नागपूरकडे गेलो होतो.'' ''अरे शामा, नागपूरला गेला होतास तर नागपूरच्या दक्षिणेस एक सोन्याचे झाड आहे, ते पाहिलेस काय?'' हे ऐकल्यावर माधवरावांना वाटले की हा उल्लेख नागपूरचे सुप्रसिद्ध वली श्री ताजुद्दीन बाबांचा असावा. माधवरावांनी चट्कन ओळखले व ते म्हणाले, ''होय, होय! बाबा, खरंच, नागपूरास असताना मी नागपूरच्या दक्षिणेस भोसल्यांच्या (राघोजी-राजे) बगिच्यात श्री ताजुद्दीन बाबांच्या दर्शनास गेलो होतो. केशवराव भय्यासाहेबांबरोबर त्यांच्याच गाडीतून गेलो होतो.'' (यावेळी बापूसाहेब बुट्टी शिरडीसच होते.) ''बरं, मग पुढे कोठे गेला होतास?'' बाबांनी विचारले. माधवराव म्हणाले, ''मी नागपूरहून पुढे उमरावतीस गेलो. तेथे बेट केडगावचे श्री नारायण महाराजही आले होते. त्यांचेही दर्शन घेतले. काय हे देवा, नारायण महाराजांचे कसे काय आहे! त्यांच्या दर्शनास कितीतरी मंडळी जातात.'' श्री बाबा यावर काय उत्तर देतात याची त्यांना उत्सुकता लागली होती. पण बाबा कसले वस्ताद! त्यांनी प्रथम उत्तरच दिले नाही. माधवरावांनी पुन्हा पुन्हा तेच तेच विचारले. ५/१० मिनिटांनी बाबा म्हणाले, ''असे आहे शामा, आपला बाप तो आपला बाप, त्याने कितीही मारले, कितीही झोडले, कितीही तोडले, तरी त्याला आपली दया येणार; तशी दुसऱ्याला कशी

**येईल! तुझा बाप मी आहे. तुला दुसऱ्यांशी काय करावयाचे आहे?''**

**एकदा बडेबाबा, मुसलमान होऊन युसुफ खान नामकरण झालेल्या एका हिंदूला घेऊन बाबांकडे आले तेव्हा त्या इसमाच्या चक्क थोबाडीत मारून बाबा क्रोधित होऊन उद्गारले, ''शरम नाही वाटत, आपला बाप बदलायला!''**

**अशाच प्रकारची घटना श्री वासुदेवानंद सरस्वती यांच्या चरित्रात आढळते. ब्रह्मावर्तास एका बाईचा नवरा बाटून मुसलमान झाला होता व तो आपल्या बायकोला घेऊन जाण्याकरिता तेथे आला होता. त्याच्याबरोबर जावे की नाही असे त्या बाईने विचारताच, ''पति प्रायश्चित घेऊन शुद्ध झाल्यावाचून त्याच्याशी संसर्ग ठेवू नये, असे शास्त्र आहे, अशी वासुदेवानंद सरस्वती महाराजांची आज्ञा झाली. त्यामुळे त्या बाईनेही नवऱ्याबरोबर न जाता ब्रह्मावर्तासच राहून हरिभजनात काळ घालविला.**

---

गोविंदाबद्दल गावातल्या लोकांना वाटणारी उत्सुकता, गावातले वादविवाद, महाराजांचे महत्त्व कमी व्हावे म्हणून सूक्तासूक्त मार्गांनी अनेकांनी करून पाहिलेले प्रयत्न; पण दरवेळी या प्रयत्नांतून उलट महाराजांचे महत्त्व अधिकच वाढत जावे, असे प्रसंग, तसेच कित्येक प्रसंगांत त्यांचा मनोनिग्रह, दत्तमहाराजांची आज्ञा किंवा आदेश पाळताना ते एखादी गोष्ट शास्त्रानुसार विसरले तर त्यांना होणारा असह्य मानसिक त्रास यांचेही यथार्थ वर्णन कादंबरीत आले आहे.

श्री. भागवतांनी इतर चरित्रांप्रमाणे कादंबरी लिहीताना त्यांच्या चमत्कारांवरच केवळ भर द्यायचा नाही, तर त्यांच्या जीवनातील सामाजिक आशय जाणून घेऊन त्या चमत्कारांच्या स्वरूपाचे मानसशास्त्रीय विश्लेषण करायचे, हे मनाशी ठरवलेले होते, असे त्यांनी कादंबरीच्या सुरुवातीसच मनोगतात उघड केले आहे. हा त्यांचा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. त्यामुळे त्या महान् योगीपुरुषाच्या गृहस्थाश्रमीचे, सत्यावर आधारित असे कल्पनेने केलेले वर्णन व प्रसंग, प्रत्यक्षातही तसेच घडले असतील, असे वाटू लागते. मात्र काही वेळेस एखादा प्रसंग रंगवताना मूळ घटनेपासून ते थोडेसे दूर जाताहेत का, अशी शंका निर्माण होते. उदाहरणादाखल दत्तपुराण व अन्नपूर्णाबाईंचा मृत्यू ह्या दोन घटना घेता येतील. पण त्याहीबाबतीत एक लक्षात घ्यायला हवे की आत्तापर्यंत बऱ्याच चरित्रकारांनी त्यांचे चरित्र लिहीण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे मूळ घटनेत होणारे थोडेफार बदल गृहीत धरावे लागतील. चरित्रकार हे विद्वान पंडित आणि काही महाराजांचे अनुग्रहीत शिष्य आहेत. महाराजांचे एक अनुग्रहीत शिष्य श्री. गांडामहाराज यांनी लिहिलेल्या महाराजांच्या चरित्रात महाराजांच्या पत्नीच्या मृत्यूची हकिगत थोडी वेगळी व अतिशय हृद्य अशी आहे. ती लेखक श्री. भागवतांच्या **'योगी'** या कादंबरीतही चटका लावून जाते; पण हकिगतीत थोडा बदल जाणवतो. पं. श्रीपादशास्त्री किंजवडेकरांनी लिहिलेल्या टेंबेस्वामींच्या चरित्रातील प्रसंगाशी त्याचे साम्य आहे.

आणखी एक गोष्ट जाणवली, ती म्हणजे महाराजांच्या पूर्वायुष्यातले, म्हणजेच गृहस्थाश्रमातले काही महत्त्वाचे प्रसंग, की ज्या प्रसंगांना महाराजांच्या चरित्रात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे, ते आले असते तर अधिक बरे झाले असते. कारण ही कादंबरी श्री टेंबेस्वामींच्या जीवनावर आधारित आहे. त्यांच्या चरित्राच्या आधारेच ती साकार झाली आहे. तेव्हा काही प्रसंग, उदाहरणार्थ, अणावकरी समंध, महाराजांनी घेतलेले 'चांद्रायण' व्रत असे काही प्रसंग थोड्या-अधिक तपशिलासह आले असते तर कादंबरीत अधिक मोलाची भर पडली असती, असे वाटते. अर्थात, महाराजांचे सर्व चरित्रच तसे महत्त्वाचे, महत्त्वपूर्ण, चमत्कृतीपूर्ण घटनांनी भरलेले, तेव्हा लेखकालाही कुठेतरी स्वत:ला मर्यादा घालून घेणे आवश्यक होते आणि तोच त्या कादंबरीचा जनक असल्यामुळे ती मर्यादा आखून घेणाराही तोच.

महाराजांनी माणगावाहून स्वत:च्या पत्नीबरोबर एक तांब्या, १ पंचा, २ दत्तमूर्ती, १ धोतर व एक लुगडे यानिशी घर सोडून प्रस्थान केले तेव्हापासून त्यांच्या महासमाधीपर्यंतचा भाग, म्हणजेच थोडक्यात त्यांच्या संन्यासाश्रमातल्या जीवनक्रमावर आधारित **'योगी'** ही कादंबरी श्री. विद्याधर भागवतांनीच लिहिली आहे. त्यामुळे 'प्रस्थान' या त्यांच्याच महाराजांच्या पूर्वायुष्यावर आधारित कादंबरीनंतरचा उत्तरार्ध या 'योगी' कादंबरीत आहे. हा महाराजांच्या आध्यात्मिक प्रवासाचा कालखंड आहे. त्यांनी संपूर्ण भारतभ्रमण करून जो प्रवास केला, त्यासाठी स्वत:ची काया झिजवली व त्यातून अल्पबुद्धीच्या सामान्यजनांना मोक्षप्राप्तीचे द्वार खुले करून देण्यासाठी अतोनात कष्ट केले. त्याचे यथार्थ वर्णन 'योगी' या कादंबरीत केले गेले आहे.

वास्तविक या महाराजांच्या उत्तरार्धावर आधारित कादंबरी लिहीणे, हे महाराजांच्या पूर्वार्धावर कादंबरी लिहीण्यापेक्षाही अत्यंत अवघड होते. कारण या कालखंडातील त्यांचे आसेतु हिमाचल पदभ्रमण, त्यांची अनेक तऱ्हेची ग्रंथनिर्मिती, वेगवेगळ्या गावांना भेटी, दत्तमूर्ती, दत्तपादुका व इतर थोर महात्म्यांच्या पादुकांची स्थापना, त्यांचे दर्शन व भेटी, प्रवचने, उपदेश, तत्वज्ञान, धर्ममार्गाचा, सगुण उपासनेचा, नामजपाचा प्रसार, पारायणे, लोकांना सन्मार्गाला लावण्याविषयीची त्यांची कळकळ, अशा अनेक गोष्टी कादंबरी लिहीण्याच्या दृष्टीने अवघडच होत्या. कारण महाराजांसारख्या अलौकिक व दिव्य पुरुषाच्या चरित्रावर कादंबरी, त्यातून त्यांच्या उत्तरार्धावर, म्हणजे कादंबरी थोडी रूक्ष होण्याची भीती होती. पण ह्या दोन्ही कादंबऱ्या वाचताना तसे अजिबात जाणवत तर नाहीच, उलट

लेखकाने त्या आपल्या भाषाशैलीने अधिक चित्तवेधक केल्याचे लक्षात येते. उत्तरार्धातले महाराजांच्या जीवनातले अनेक प्रसंग त्यांनी सहजगत्या उलगडून दाखवले आहेत. 'योगी'ची सुरूवात पत्नी अन्नपूर्णाबाईंच्या प्रसूतीच्या क्षणापासून होते. नरसोबाच्या वाडीला आल्यानंतर गोखलेंच्या घरात तिचे बाळंतपण होते. हे बाळ अत्यंत अल्पायुषी होणार आहे, याची महाराजांना आधीपासून कल्पना होती; पण सत्य विदारक असते आणि ती ते सहन करू शकली नसती म्हणून महाराजांनी त्याबाबत मौन बाळगले होते. त्यामुळे बालक मृत झाले हे कळल्यावर झालेला तिचा आक्रोश, महाराजांचे त्याविषयी दत्तप्रभूंवर रागावणे हा प्रसंग फार सुंदररीतीने मांडला आहे.

ती एक महान पतिव्रता होती, साध्वी होती.. "ती एक पूर्ण स्त्री असून तिची कूस वांझ नाही", हे दत्ताला दाखवून द्यायचे होते. त्यासाठी महाराजांना तिची इच्छापूर्ती करणे भाग पडले. चरित्रकारांनी तिचे वर्णन यथार्थ रीतीने केले नाही, किंबहुना तिच्यावर थोडासा अन्यायच झाला. तिचे जीवन हे एक समर्पित जीवन होते, हे लेखकाला पटवून द्यायचे होते. लेखक यात संपूर्ण यशस्वी झाला आहे, यात शंकाच नाही.

याशिवाय श्री गोविंदस्वामींची भेट, अनुग्रह घेण्याचा त्यांचा ध्यास, पुढे मौनीस्वामींकडून मार्गदर्शन, तसेच गोविंदस्वामींनी समाधी घेण्याचा प्रसंग, नारायणावर महाराजांकडून झालेला अनुग्रह व दीक्षा, स्वामी नारायणानंद सरस्वतींकडून झालेले दंडग्रहण इत्यादी प्रसंग अत्यंत व्यवस्थितपणे मांडले आहेत.

महाराजांना एकदा संधिवाताचा असह्य त्रास सुरू झाल्यावर अन्नपूर्णेने केलेली त्यांची सेवा, त्यावेळचे त्या दोघांचे जवळजवळ प्रथमच इतके प्रेमाचे एकमेकांशी बोलणे, अन्नपूर्णेला पंचगंगेवर कुमारस्वामींनी अचानक दिलेले दर्शन आणि तिच्या मृत्यूचा प्रसंग ह्या सर्वच गोष्टी मनाला चटका लावून जातात.

सारंगपूरला एक योगिनी यमुना व तिचा पती डॉ. केशवराव (हे देवी डॉक्टर होते.) यांची भेट, डॉ. केशवरावांचे अंतर्बाह्य बदलणे, त्यांचा 'अल्पायुषी' मुलगा, जो जन्मत:च अजानबाहू व विलक्षण मेघावी होता, त्याचे अंतिम क्षण, हे सर्व प्रसंग कादंबरीत मोलाची भर घालतात.

महाराजांच्या पदभ्रमण यात्रेत त्यांनी वेळोवेळी अनुभवलेले प्रसंग, ते घडत असतानाच एकीकडे चालू असलेली त्यांची ग्रंथसाधना व निर्मिती, सामान्यजनांचा उद्धार करण्यासाठी घेतलेले व्रत, स्वत:च्या देहाच्या वारंवार होणाऱ्या हालांकडे झालेले त्यांचे दुर्लक्ष, शिष्यांवर अनुग्रह, पिशाच्चबाधेपासून सुटका, तर कोणाला संततीचा लाभ, प्रवचने, पारायणे, दत्तमंदिरे, पादुकांची स्थापना, वेदाध्ययन, कडक धार्मिक आचरण ह्या सर्व गोष्टींचा मेळ लेखकाने सुरेख साधला आहे.

महाराजांच्या निर्याणाचा प्रसंग फारच हृदयद्रावक व अप्रतिम वठला असून त्याने कादंबरीची उंची वाढली आहे.

या लोकोत्तर महत्पुरुषाचे चरित्र खरोखरच विलक्षण आहे. कादंबरीकार श्री. विद्याधर भागवतांनी ही जबाबदारी समर्थपणे पेलली आहे; आणि त्यात ते पूर्ण यशस्वीही झाले आहेत, असे म्हणायला काहीच हरकत नाही. 'प्रस्थान' व 'योगी' ह्या दोन्ही कादंबऱ्या अत्यंत उत्कृष्ट झाल्या असून नीटनेटकी सुबक मांडणी आणि भावमय, काव्यमय व तरल, सोपी, सहजसुंदर भाषा हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. श्रीमत्परमहंस परिव्राजिकाचार्य श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या गृहस्थाश्रमातल्या काळातली त्यांच्या तोंडची शुद्ध मराठी भाषा आणि त्यांच्या सहवासाने कालांतराने त्यांची पत्नी सौ. अन्नपूर्णा हिच्याही भाषेत जाणवू लागलेली विद्वत्ता आणि शुद्धता ह्या दोन्ही गोष्टींचे भान लेखकाने अचूक ठेवले आहे. चरित्राचा उत्तरार्धही पूर्वार्धाप्रमाणेच कुठेही रूक्ष न होता विलक्षण परिणाम साधणारा असाच झाला आहे. शब्दांचे अवडंबर नाही. निर्मळ, निखळ, संवेदनाक्षम असे साहित्य म्हणून या कलाकृतींकडे बोट दाखवता येईल.

त्यांचे पूर्वी प्रसिद्ध झालेले साहित्य म्हणजे 'सागरवेला' हा उत्कृष्ट कवितासंग्रह आणि 'तिळफुले' हा ललीत लेखसंग्रह आणि आता प्रसिद्ध झालेल्या श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या जीवनावर आधारित 'प्रस्थान' व 'योगी' ह्या कोकणची पार्श्वभूमी लाभलेल्या दोन कादंबऱ्या त्यांच्या सहजसुंदर प्रतिभेचा आविष्कार घडवितात. त्यांच्या लिखाणाने मराठी साहित्याला आणखी एक मोलाची 'देणगी' मिळाली, असे म्हटले तर वावगे होणार नाही. एकदा पुस्तक वाचावयास हातात घेतल्यानंतर, संपेपर्यंत ते खाली ठेवू नये, असे वाटणे आणि त्यानंतरही दीर्घकाळ त्या पुस्तकाचा गंध आपल्या मनात दरवळत रहाणे, यातच त्या पुस्तकांचे खरे श्रेय आहे.

पुस्तकाचे नाव : **॥ प्रस्थान ॥**
लेखक : **विद्याधर भागवत**
प्रकाशक : **चिंतामणी साहित्य सहयोग सहकारी प्रकाशन संस्था, मर्यादित**
रविवर्षा, श्रमविहार सोसायटी,
सावंतवाडी,
जि. सिंधुदुर्ग – ४१६ ५१०.
पृष्ठे : २१८
मूल्य : ८५ रु.

पुस्तकाचे नाव : **॥ 'योगी' ॥**
लेखक : **विद्याधर भागवत**
प्रकाशक : **चिंतामणी साहित्य सहयोग सहकारी प्रकाशन संस्था, मर्यादित**
रविवर्षा, श्रमविहार सोसायटी,
सावंतवाडी,
जि. सिंधुदुर्ग – ४१६ ५१०.
पृष्ठे : २२४
मूल्य : रु. ६०

# श्री साईबाबा संस्थान, शिरडीचा चौफेर विकास
# विद्यमान विश्वस्त मंडळाची यशस्वी वाटचाल

समाजामध्ये तीन प्रकारचे लोक असतात; पहिल्या प्रकारात मोडतात ते दुसऱ्यांकडून केवळ स्वत:चा स्वार्थ साधून घेणारे, दुसऱ्या प्रकारातील असतात या हाताने घ्या, त्या हाताने द्या, या वृत्तीचे, तर तिसऱ्या प्रकारचे लोक सतत दुसऱ्यांना मदत करीत असतात, निरपेक्ष बुद्धीने, त्यागाच्या भावनेने. केवळ दुसऱ्यांचाच विचार करणाऱ्या, त्यांच्या सहाय्यार्थ, त्यांच्या कल्याणार्थ सदैव तत्पर असणाऱ्या ह्या लोकांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याएवढीच असते. ते संत-महात्मा असतात, दिशाहीन झालेल्या समाजाला योग्य दिशा दाखविण्यासाठी मनुष्यदेहात या भूमीवर अवतीर्ण होतात. श्रीमद्भगवद्गीतेच्या ४थ्या अध्यायातील ७-८ व्या श्लोकांत त्रेतायुगातील अवतार भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला संबोधून साऱ्या विश्वाला आश्वासन दिले आहे....

यदा यदा हि धर्मस्य
ग्लानिर्भवति भारत:।

अभ्युत्थानं धर्मस्य
तदात्मानं सृजाम्यहम्॥

परित्राणाय साधूनां
विनाशाय च दुष्कृताम्।
धर्म-संस्थापनार्थाय
संभवामि युगे-युगे॥....

भगवान श्रीकृष्णांच्या या वचनानुसार श्री साईबाबांनी कलियुगात मनुष्याच्या रूपात अवतार धारण केला; आणि आपल्या महान कार्याच्या सिद्धीसाठी त्यांनी निवड केली एका छोट्याश्या गावाची.... 'शिरडी'.... हे गाव छोटसं जरी असलं तरी या गावाला फार मोठी पार्श्वभूमी आहे.

साईबाबांचे एक निस्सीम भक्त डॉ. केशव गव्हाणकर आपल्या 'शिलधि' या छोटेखानी पुस्तिकेत लिहितात....

निजधामाला निघून जाण्यापूर्वी भगवान श्रीकृष्णांनी सोन्याची मूळ द्वारका समुद्रात बुडविली होती. काही काळानंतर कलियुगाच्या आरंभी काही निष्ठावान, प्रेमी व ज्ञानी ऋषि-मुनींच्या प्रेमाग्रहाने प्रभावीत होऊन परमात्म्याने समुद्राकडून ही जागा मागून घेतली. आज आपण जी शिरडी पाहत आहोत, ती दुसरी द्वारका आहे, हे श्रीमद्भागवतातील काही कथाभागांवरून अनुभवास येते; आणि श्री साईबाबा तर शिरडीतील जीर्ण-शीर्ण मशिदीला द्वारका, द्वारावती, द्वारकामाई म्हणून संबोधित असत.

संत-महात्मा वेगवेगळ्या देहात वास करीत असल्याने ते अलग अलग आहेत, असा समज सामान्यजन करून घेतात; परंतु वास्तवात ते अभिन्न असतात, त्यांचा 'आत्मा' एकच असतो. वेगवेगळ्या काळी, वेगवेगळ्या जागी, वेगवेगळ्या उद्देश्यांसाठी ते अवतार धारण करतात. संतांच्या मांदियाळीत श्री साईबाबांच्या कार्याला विशेष महत्त्व आहे. ते केवळ त्यांच्या कार्यानेच नव्हे, तर जन्मानेही सर्वधर्मसमभावाचे प्रतीक होते. त्यांचे अवतरण झाले होते, समाजाला बाह्याचारी अवडंबरापासून मुक्त करून उच्च तत्वांकडे घेऊन जाण्यासाठी, सर्व धर्मांचे मूलभूत तत्व एकच आहे, हे समाजाला शिकविण्यासाठी, जाती-पातीची बंधनं तोडण्याचे, शिवा-शिवीचा त्याग करण्याचे शिक्षण समाजाला देण्यासाठी, सारं विश्व हे 'वसुधैव कुटुंबकम्' आहे, हे समाजाला दाखविण्यासाठी, लोकांना सत्यमार्गावर चालायला प्रेरित करण्यासाठी, समुद्रातील ज्योतीस्तंभाप्रमाणे समाजाला सत्यमार्गावर मार्गदर्शक होण्यासाठी.

नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ ओळखणं म्हणजे एक दिव्यच आहे, हे काही खोटे नाही. श्री साईबाबांनी आपल्या जन्माबद्दल कधी कुणाला काही सांगितलं नाही. काही लोकांनी त्यांच्या जन्माचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; परंतु कोणीच जाणून घेऊ शकलं नाही की श्री साईबाबा प्रत्यक्षात कोण होते ? आजपर्यंत कोणीही उकल करू शकला नाही की श्री साईबाबांचा धर्म कोणता होता, त्यांची जात कोणती होती ? ते मुसलमान फकिरासारखा वेश परिधान करीत असत; परंतु त्याचबरोबर हिंदूंच्या रीतिरिवाजानुसार त्यांचे कान टोचलेले होते, त्यांचा संपूर्ण व्यवहार हिंदूंप्रमाणे चालत असे. ते रहात असत मशिदीत; परंतु त्या मशिदीला ते 'द्वारकामाई' नावाने संबोधित असत आणि म्हणत, **"ही ब्राह्मणाची मशिद आहे!"** त्यांनी द्वारकामाईत अखंड धूनी प्रज्वलित केली होती. तेथे ते दळण-कांडण, शंख व घंटानाद, होम, अन्नदान, अर्घ्य द्वारा पूजा आदी विधिविधान करीत असत. ते सुंता करायच्या बाजूने होते, तर हिंदूंप्रमाणे ते कपाळी टिळा लावून घेत असत. **"सबका मालिक एक है", "अल्ला मालिक", "अल्ला भला करेगा", "अनलहक्क", "यादे हक्क"** हे शब्द त्यांच्या ओठावर जसे सतत असत, तद्वतच ते वेदांताची नित्य शिकवण देत असत. त्यांनी शिरडीत उरूस व रामनवमी ह्या दोन भिन्न धर्मीय उत्सवांचा समन्वय केला. त्यांनी आपल्या **'धर्मा'चा परिचय** दिला होता **'कबीर'**, जातीची ओळख दिली होती **'परवर दिगार'** आणि सांगितलं होतं **"मेरी उम्र लाखों वर्ष की है।"** त्यांचा सर्वांसाठी हाच उपदेश होता, **"राम और रहीम एक ही हैं। सब एक-साथ मिल-जुलकर रहो!"**

ते हिंदूंना त्यांच्या धार्मिक ग्रंथांतून, तर मुसलमानांना कुराणातून उपदेश देत असत. त्यांनी नानासाहेब चांदोरकरांना श्रीमद्भगवद्गीतेतील चौथ्या अध्यायातील ३४ वा श्लोक

**"तद्विद्धि प्रणिपातेन
परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं
ज्ञानिनस्तत्त्व दर्शिन:।"**

चा अर्थ समजाविला, तर अब्दुलबाबांना कुराणातील कलमांचा अन्वयार्थ सांगितला.

श्री साईबाबांबद्दल शंकित लोकांना बाबांनी त्यांच्या त्यांच्या इष्ट देवी-देवतांच्या रूपात दर्शन देवून दाखवून दिलं की **"सबका मालिक एक है।"** जवळजवळ ९५ वर्षांचे



## विद्यमान विश्वस्त मंडळाची शिकस्त

- साईभक्तांच्या निवासाकरिता 'साईबाबा भक्त निवास'
- मंदिरपरिसराचा विस्तार
  * 'ध्यानधारणा' सभागृह
  * उपवन
  * प्रतीक्षागृह
- 'श्री साईनाथ' रूग्णालयाचा विस्तार
  * डॉक्टरांच्या संख्येत वाढ
  * तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती
  * मनोजकुमार अतिदक्षता हृदयरोगनिदान विभाग
  * श्रीमती जानकीदेवी सुरी सोनोग्राफी केंद्र
  * राजू बात्रा क्ष-किरण कक्ष
  * वैद्यकीय व परिचारिका महाविद्यालय
- 'प्रसादालय' आधुनिक संयंत्रांनी सुसज्ज
- प्रकाशनांमध्ये वृद्धी व आकर्षकता
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपयोगी शिक्षणक्रमांची भर
- इंग्रजी माध्यमाची शाळा
- कन्याशाळा
- पुरेसे शुद्ध पाणी
- स्वतंत्र अंतर्गत संपर्क व्यवस्था
- संगणकीकरण
- अधिक व्याज देणाऱ्या योजनांमध्ये जमा रक्कम
- विमानतळ
- एस्.टी. आदी परिवहन सुविधांमध्ये गतिमानता व वक्तशीरपणा आणण्यासाठी शासनाच्या मदतीने प्रयत्न
- संस्थानपरिसरात विखुरलेल्या संस्थानच्या विविध विभागांच्या कार्यालयांना एकाच इमारतीत आणणे
- श्री साईबाबांनी हाताळलेल्या वस्तूंच्या सुरक्षिततेसाठी वस्तुसंग्रहालय
- साईभक्तांच्या वतीने संस्थानच्या अध्यक्षांची संस्थानच्या कामकाजाला अधिक गति देण्यासाठी राज्यशासनाकडे २०० एकर जमिनीची मागणी व केंद्रसरकारला सर्वधर्मसमभावाचे प्रतीक श्री साईबाबांवर त्यांच्या ७५ व्या पुण्यतिथीनिमित्त पोस्टाचे एक तिकिट प्रकाशित करण्यात यावं, अशी विनंती

---

वयोवृद्ध विठ्ठलभक्त गौळीबुवा यांनी अनुभव घेतला की श्री साईबाबा खरोखरीच पंढरीनाथ आहेत. त्याचप्रमाणे दासगणू महाराज, काकासाहेब दीक्षित, भगवंतराव क्षीरसागर यांना बाबांनी विठ्ठलाच्या रूपात दर्शन दिलं. दासगणू महाराजांची गंगा व यमुना ह्या नद्यांच्या संगमावर, प्रयागवर स्नान करण्याची इच्छा होती. त्यानुसार तिकडच्या प्रवासाला निघण्यापूर्वी बाबांच्या चरणी ते नतमस्तक झाले, तेव्हा त्यांनी काय पाहिले! बाबांच्या श्री चरणांतून गंगा-यमुनेच्या धारा वहात होत्या. हे पाहून दासगणू महाराज स्तंभितच झाले, त्यांच्या नयनांतून घळाघळ आनंदाश्रू वाहू लागले आणि त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले.... **शिरडी माझे पंढरपूर। साईबाबा रमावर....** तात्या नूलकरांचे एक स्नेही डॉक्टर पंडित यांना बाबांच्या रूपात त्यांचे गुरू श्री रघुनाथ महाराज धोपेश्वरकर उर्फ पुराणिक दिसले व त्यांनी त्यांची गुरुसमान कपाळावर त्रिशूळाकार गंध लावून पूजा केली. बाबांनीही त्या पूजेचा गुरूच्याच भावनेने स्वीकार केला. नाशिकचे एक धर्मनिष्ठ अग्निहोत्री ब्राह्मण मुळेशास्त्री यांना बाबांनी त्यांचे गुरू कैलासवासी घोलपस्वामी यांच्या रूपात दर्शन दिले. एका मामलेदाराच्या मित्राला बाबांनी श्रीरामाच्या रूपात दर्शन दिले. बाबांच्या श्रीमुखातील उपदेश ऐकून पंत नावाच्या एका व्यक्तीला आपल्या सद्गुरूची आठवण झाली. रावबहाद्दूर साठे यांचा स्वयंपाकी व शिवशंभूचा परमभक्त मेघा साईबाबांना साक्षात् शिवशंकराचा अवतार समजला आणि बाबांनीही त्याने त्यांची बेलाच्या पानांनी केलेली पूजा, गंगाजलाने त्यांना घातलेले स्नान, चंदनाचे त्यांना लावलेले त्रिशूळाकार गंध यांचा आनंदाने स्वीकार केला. मद्रासी भजन मंडळातील एका